सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित


सोलापूर | शनिवार, २४ मे २०२५। युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक १९५ । पाने १२ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

### आजचा सामना




पंजाब किंग्ज वि. दिल्ली कॅपिटल्स्
वेळ : रात्री ७.३० वाजता
ठिकाण : सवाई मानसिंग स्टेडियम, जयपूर


## विचारपुष्प



नि ज्या तत्त्वाप्रमाणे व्यवहारात आचरण करता येत नाही त्यांना तत्त्व म्हणून सुद्धा मान्य करता येत नाही. ज्या तत्त्वांना अनुरूप असे आचरण आपणांस करता येत नसेल अशा तत्त्वांसंबंधी केवळ गोष्टी बोलून काय उपयोग! तत्त्वाप्रमाणे आपला प्रत्यक्ष व्यवहार झालाच पाहिजे, यासाठी आपल्या पूर्वजांचा फार आग्रह असे.

**- श्रीगुरुजी**
रा. स्व. संघाचे द्वितीय सरसंघचालक

# यंदा सरासरी १०७ टक्के पाऊस



### रविवारी केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता



### देशभरात पेरणीपूर्व मशागतींना अनेक ठिकाणी आला वेग

**नवी दिल्ली, २३ मे**

भारतीयांसाठी मान्सूनसंदर्भात अत्यंत आनंदाची बातमी आली आहे. भारतीय हवामान विभागाने वर्तविलेल्या नवीन अंदाजानुसार यंदा मान्सून वेळेआधीच रविवारी केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता आहे. आयएमडीने दिलेल्या माहितीनुसार सध्या मान्सूनसाठी अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे येत्या २५ मे पर्यंत मान्सून केरळच्या किनारपट्टीवर दाखल होऊ शकतो.

गेल्या वर्षी ३० मे रोजी मान्सूनचा केरळमध्ये प्रवेश झाला होता. मात्र यंदा वेळेपूर्वीच म्हणजे २५ तारखेला मान्सून केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता आहे. यापूर्वी २००९ साली केरळमध्ये वेळेआधी मान्सून दाखल झाला होता, त्यानंतर आता तब्बल १६ वर्षांनी वेळेपूर्वीच तो केरळमध्ये दाखल होणार आहे.

१५ जूनपर्यंत देशातील बहुतांश भाग मान्सूनने व्यापण्याची शक्यता आहे. दरम्यान यावर्षी सरासरीपेक्षा अधिक पावसाचा अंदाज भारतीय हवामान खात्याकडून वर्तवण्यात आला आहे. यंदा भारतामध्ये सरासरी १०७ टक्के पाऊस पडू शकतो, असा अंदाज आहे. हवामान खात्याने वर्तवलेल्या पावसाच्या अंदाजानंतर शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, पेरणीपूर्व मशागतींना अनेक भागांमध्ये वेग आला आहे.

पुढील काही दिवसांमध्ये मान्सूनचा प्रवेश दक्षिण भारतात होणार आहे. मात्र याच दरम्यान दक्षिण कोकण आणि गोव्याच्या समुद्र किनाऱ्यावर कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे. त्यामुळेच सध्या महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये जोरदार अवकाळी पाऊस सुरू आहे. पुढील छत्तीस तास महत्त्वाचे असून, आयएमडीकडून राज्यातील अनेक भागांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. (वृत्तसंस्था)

### दक्षिण भारतात पडणार मुसळधार

२८ मे दरम्यान केरळ, कर्नाटक आणि दक्षिण भारतातील किनारपट्टी भागात वादळासह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. विशेषतः कर्नाटकच्या किनारी भागात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. दरम्यान, तामिळनाडू, पुद्दुचेरी, आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि रायलसीमा भागातही जोरदार वारे आणि वादळ येण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

### महावितरण 'हायअलर्ट'वर

**मुंबई** : अरबी समुद्रावर कमी दाबाचे क्षेत्र तयार झाल्याने राज्यभरात पुढील चार दिवस मुसळधार पावसाची शक्यता आहे. यामुळे महावितरणने हाय अलर्ट जाहीर केला आहे. महावितरणचे अध्यक्ष लोकेश चंद्र यांनी वीजपुरवठ्याचा आढावा घेत नैसर्गिक आपत्तीमुळे खंडित झालेला वीजपुरवठा सुरू करण्यास सर्वोच्च प्राधान्य द्यावे, मुख्यालय व परिमंडलस्तरावर २४७ आपत्कालिन व्यवस्थापन नियंत्रण कक्षाची लगेचच स्थापना करावी.

# निर्दयी बापाने घराच्या परिसरातच आठ वर्षाच्या मुलीला गाडले!

### दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुसूर येथील धक्कादायक घटना

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ मे-**

अवघ्या सात ते आठ वर्षाच्या स्व:तच्या पोटच्या गोळ्याला निर्दयी बापाने घराच्या परिसरात गाडले. ही काळजाला पिळवटून टाकणारी घटना गुरुवारी रात्री दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुसुर गावात घडली. या घटनेमुळे अवघा तालुका नि:शब्द झाला आहे.



दरम्यान या घटनेची मंद्रुप पोलीस ठाण्यात अकस्मात मयत अशी नोंद झाली आहे. कुसूर गावात अमोघसिध्द कोठे हा कुटुंबासह राहण्यास आहे. गुरुवारी रात्री त्याने त्या आपल्या मुलीला घराच्या परिसरात अज्ञात कारणातून जीवे ठार मारून जमिणीत पुरले. ही माहिती कुसूर येथील पोलीस पाटील महानंदा विठ्ठल पाटील यांना शुक्रवारी सकाळी ११.३० च्या सुमारास समजली. या माहितीची खातरजमा करण्यासाठी पोलीस पाटील या सरपंच पती मनोहर नरोटे, मदुरा खांडेकर असे मिळून रेवणसिध्द कोठे याच्या वस्तीवर गेले. तेथे त्यांनी अमोघसिध्द याच्या घरासमोर बांधकामासाठी खोदलेल्या खड्याची पाहणी केली. त्यावेळी तो खड्डा खोदकाम करून मातीने झाकलेला दिसला. यामुळे पोलीस पाटील आणि इतरांचा आणखीनच संशय बळावला. त्यांनी या प्रकरणाची माहिती मंद्रुप पोलीस ठाण्यातील हवालदार मुलाणी यांना दिली. साधारण तासानंतर मंद्रुप पोलीस घटनेच्या ठिकाणी म्हणजेच कोठे या वस्तीवर आले. त्यानंतर साधारण ३.३० वाजता मंद्रुप तहसिलदार जितेंद्र मोरे, वैदयकीय अधिकारी रुषभ कांबळे, दोन पंच, तलाठी, फोटोग्राफर असे सर्वजण घटनेच्या ठिकाणी हजर झाले. या सर्वांसमक्ष तो खडा खोदून आतील माती बाहेर काढली. त्यावेळी शाळेच्या गणवेशातील सात ते आठ वर्षाच्या मुलीचा मृतदेह बाहेर काढला. पावसाच्या सरी कोसळल्याने तिच्या अंगावर माती चिकटली होती. अल्पवयीन मुलीचा मृतदेह बाहेर काढल्यानंतर पोलीस पाटील, तहसिलदार, वैदयकी अधिकारी सरपंच पती यांच्या व पोलिसांसमक्ष नातेवाईक जयश्री होनमाने, सुनीता वाडियार, आजी मधुरा खांडेकर, आजोबा रेवणसिध्द कोठे व मामा अवधूतसिध्द खांडेकर यांना मुलीचा ओळख पटली. ती अल्पवयीन मुलगी ही अमोघसिध्दची असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर वैद्यकीय अधिकारी भंडारकवठे यांच्या सल्ल्याने पोलिसांनी गावातील लोकांच्या मदतीने मुलीचा मृतदेह शवविच्छेदनाकरीता मंद्रुप येथील ग्रामीण रुग्णालय आणला आहे. या गुन्ह्याचा तपास सपोनि मनोज पवार हे करत आहेत.

### वैद्यकीय अहवालानंतर कारवाई


सध्या त्या मुलीच्या मृतदेहाचे शवविच्छेदन सुरू आहे. मुलीच्या वडीलांकडून काहीही कारण सांगितले जात असले तरी वैदकीय अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

- मनोज पवार, सपोनि, मंद्रुप पोलीस ठाणे

## महत्त्वाचे

### निर्देशांकात ७६९ अंकांनी वाढ

**मुंबई** : निर्देशांक शुक्रवारी तेजीत बंद झाला. निर्देशांक ७६९ अंकांनी वाढून ८१,७२१ वर बंद झाला. तर निफ्टी २४३ अंकांच्या वाढीसह २४,८५३ वर स्थिरावला. आजच्या सत्रात एफएमसीजी शेअर्समध्ये सर्वाधिक तेजी राहिली. सेक्टरल फ्रंटवर निफ्टी एफएमसीजी टॉप गेनर निर्देशांक ठरला. दरम्यान, आजच्या तेजीमुळे गुंतवणूकदारांनी २.९० लाख कोटींची कमाई केली. बीएसईवरील सर्व सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल ४४१.८८ लाख कोटी रुपयांवर गेले. ते २२ मे रोजी ४३८.९८ लाख कोटी रुपयांवर होते. याचाच अर्थ आज बाजार भांडवलात २.९० लाख कोटींची वाढ झाली. पॉवरग्रिड, आयटीसी, बजाज फिनसर्व्ह, नेस्ले इंडिया, ॲक्सिस बँक, अदानी पोर्ट्स, कोटक बँक, एलटी, रिलायन्स, हिंदुस्तान युनिलिव्हर, बजाज फायनान्स हे शेअर्स १ ते२.५ टक्क्यांपर्यंत वाढले. तर दुसरीकडे सन फार्माचा एकमेव शेअर्स २.१ टक्के घसरला.



### देशभरात २५७ कोरोनाबाधित

**नवी दिल्ली** : कोरोना पुन्हा एकदा देशात पसरत असल्याचे दिसून येत आहे. या वर्षी आतापर्यंत भारतात कोरोनाचे २५७ रुग्ण आढळले आहेत. महाराष्ट्र, कर्नाटक, ओडिशा, तामिळनाडू, गुजरात आणि केरळमध्ये ते आढळून आले आहेत. तथापि, रुग्णांमध्ये अनेक लक्षणे दिसत नाहीत ही दिलासादायक बाब आहे. हरयाणातील गुरुग्राम आणि फरीदाबादमध्ये तीन नवीन प्रकरणे नोंदली गेली आहेत, तर गुजरातमध्ये १५ आणि महाराष्ट्रात २६ नवीन प्रकरणे नोंदली गेली आहेत. आरोग्य अधिकाऱ्यांनी लोकांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले आहे. परंतु वर्तमान जेएन १ व्हेरिएंट फारसा गंभीर नाही. त्यामुळे लोकांनी घाबरून जाण्याची गरज नाही, असे आरोग्य अधिकाऱ्यांनी म्हटले आहे.

### छगन भुजबळ यांना अन्न व नागरी पुरवठा खाते

**मुंबई** : राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना शुक्रवारी अन्न आणि नागरी पुरवठा खाते देण्यात आले. हे खाते भुजबळ यांच्याकडे पूर्वी होते. ओबीसी नेते भुजबळ यांनी भाजपाच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारमध्ये अन्न व नागरी पुरवठा खाते देण्यात आल्याची पुष्टी केली. धनंजय मुंडे यांनी या वर्षी मार्चमध्ये राजीनामा दिल्यानंतर या खात्यात मंत्रिपदाची शपथ घेतली होती. भुजबळ यांनी २० मे रोजी मंत्री म्हणून शपथ घेतली होती. गत वर्षी डिसेंबरमध्ये झालेल्या पहिल्या विस्तारात दुर्लक्षित झाल्यानंतर ते मंत्रिमंडळात परतले होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यांच्या मंत्रिमंडळाचा विस्तार केला तेव्हा मंत्रीपद न मिळाल्याने भुजबळ नाराज झाले होते. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुती १.० सरकारमध्ये भुजबळ हे अन्न व नागरी पुरवठा मंत्री होते आणि उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी (मविआ) प्रशासन सत्तेत असताना (२०१९-२२) त्यांनी हेच खाते सांभाळले होते.



# ५१ तोळे सोनं, चांदी, कार हुंड्यात देऊनही मन भरेना!

### हपापलेपणाची हद्द; फरार सासरा, दीर अखेर अटकेत

**पुणे, २३ मे**



वैष्णवी | पती शशांक | सासरे राजेंद्र | दीर सुशील

ज्याच्यावर विश्वास ठेवून प्रेम केले, घरच्यांचा विरोध असतानाही विवाह केला त्या वैष्णवीला पतीसह सासू, दीर आणि नणंद यांनी एवढा शारीरिक आणि मानसिक त्रास दिला की, तिला मृत्यू पत्करावा लागला. विवाहात फॉर्च्यूनर, ५१ तोळे सोनं, चांदीची भांडी देऊनही त्यांची संपत्तीची भूक शमत नव्हती. घटनेपासून फरार झालेला सासरा आणि दीर यांना अखेर शुक्रवारी अटक करण्यात आली आहे. दोघांनाही २८ मेपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसने हकालपट्टी केलेला पक्षाचा तालुकाप्रमुख राजेंद्र हगवणे आणि त्याचा मुलगा सुशील यांना बावधन पोलिसांनी अटक केली आहे. वैष्णवीचा नवरा शशांक, सासू लता आणि नणंद करिश्मा यांना आधीच अटक झाली आहे. हुंडाबळी ठरलेल्या वैष्णवीच्या मृत्यूने अवघा महाराष्ट्र हळहळला. घरच्यांचा विरोध पत्करून सासरी आलेल्या मुलीचा एवढा छळ करण्यात आला की, तिच्या संपूर्ण अंगावर मारहाणीचे व्रण होते. घरच्यांचा विरोध केल्याने झालेला पश्चात्ताप आणि पतीसह सासरकडील माणसांकडून मिळत असलेली अमानुष आणि क्रूर वागणूक अशा मानसिक कोंडीत सापडलेल्या वैष्णवीने १६ मे रोजी मृत्यूला कवटाळले. वैष्णवीच्या मृत्यूनंतर तिच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीनंतर पोलिसांनी पती शशांक, सासू लता आणि नणंद करिश्माला अटक केली.

### वेगवेगळ्या वाहनांमधून केला प्रवास

सात दिवसांच्या काळात राजेंद्र आणि सुशील यांनी लपतछपत प्रवास करताना वेगवेगळ्या वाहनांचा वापर केला. १७ मे रोजी दोघे औंध येथे गेले होते. थार गाडीने प्रवास करीत आळंदी येथील लॉजवर मुक्काम केला. १८ रोजी बलेनो वाहनाने वडगाव मावळ, पवना धरण गाठले तर १९ तारखेला सातारा जिल्ह्यातील पुसेगाव येथे मुक्काम केला. १९ आणि २० मे कोगनोळी येथील हॉटेल तर २१ ला कोगनोळी येथेच मित्राच्या शेतावर रात्र घालविली. २२ मे रोजी पुण्यात परतले.

### जेवणावर ताव मारत असताना अटक

राजेंद्र आणि सुशील दोघेही तळेगाव परिसरात फिरत होते. पोलिस पथक त्यांच्या मागावरच होते. स्वारगेट येथील एका हॉटेलात पहाटे जेवणावर ताव मारत असताना साध्या वेशातील पोलिस धडकले आणि त्यांना बेड्या ठोकल्या. बावधन पोलिस स्थानकात तोंडावर काळा रुमाल टाकून आणले. (वृत्तसंस्था)

# तीन महिन्यांत होणार महाराष्ट्र भोंगेमुक्त!

### किरीट सोमय्या यांचा दावा

**वाशीम, २३ मे**

मशिदींवरील अनधिकृत भोंग्यांचा आवाज राज्यात यापुढे पूर्णपणे संपुष्टात येणार आहे. एक महिन्यामध्ये मुंबई आणि तीन महिन्यामध्ये संपूर्ण महाराष्ट्र भोंगेमुक्त होणार असल्याचा ठाम दावा भाजपाचे किरीट सोमय्या यांनी आज, २३ मे रोजी वाशीम येथे पत्रकार परिषदेत पत्रकाराशी केला.

सोमय्या म्हणाले की, राज्यामधील सर्व मशिदीवरचे भोंगे बेकायदेशीर असून उच्च न्यायालयाने याबाबत आपला निर्णयही दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत गंभीर दखल घेतली आहे. याबाबत कोणाचीही दादागिरी खपवून घेतली जाणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

राज्यातील मशिदींवर लागलेल्या एकाही भोंग्यास परवानगी नाही. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्र तीन महिन्यात भोंगेमुक्त होणार असल्याचेही त्यांनी यावेळी ठामपणे सांगितले. ते म्हणाले, याबाबत मी स्वतः ५० पोलिस स्टेशनमध्ये तक्रार केली असून वाशीम येथे जिल्हा पोलिस अधीक्षकांशी सविस्तर चर्चा केली आहे.



पत्रकारांशी संवाद साधताना किरीट सोमय्या

राज्याच्या विधानसभा निवडणुकीदरम्यान मोठ्या प्रमाणावर घुसखोरांनी जन्माच्या दाखल्यासाठी अर्ज केले. २ लाख २४ हजार लोकांपैकी १ लाख २३ हजार लोकांना जन्माचे दाखले दिले गेले. त्यानंतर देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले आणि त्यांनी याबाबत एसआयटीची स्थापना केली. एसआयटीच्या चौकशीमध्ये दीड लाख लोकांपेक्षाही अधिक अर्ज बोगस असून हे सर्व अर्ज रद्द करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. उर्वरित ७५ हजार बोगस अर्जदार पळून गेले असल्याचे यावेळी किरीट सोमय्या म्हणाले.

वाशीम येथेही याबाबत फार मोठा घोटाळा असून ३,५०० लोकांना बोगस जन्म दाखले दिले गेले आहेत. हे सर्व दाखले परत घेण्याची प्रक्रिया येत्या सोमवारपासून सुरू होणार आहे. बोगस जन्म दाखल्याच्या प्रकरणामध्ये मंगरुळनाथ येथील तहसीलदाराचे कार्य अतिशय अपारदर्शक असून याबाचत आपण महसूल सचिवाकडे तक्रार दाखल केल्याचे सोमय्या म्हणाले.

२०२४ मध्ये दाखल्यासाठी २ लाख २४ हजार अर्ज आले. त्यानंतर २०२५ मध्ये दाखल्यासाठी १ हजारही अर्ज शासनाला प्राप्त झाले नाही. त्यामुळे त्यावेळी बोगस अर्जाची व्याप्ती किती मोठ्या प्रमाणात होती हे लक्षात येईल, असेही ते शेवटी म्हणाले.

यावेळी आ. श्याम खोडे, आ. सई डहाके, जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे, मनीष मंत्री, नवीम शर्मा, राहुल तुपसांडे आदी उपस्थित होते. (तभा वृत्तसेवा)

### १ जूनपासून राज्यात महाराजस्व अभियान

**पुणे** : राज्यातील शेतकरी, सर्वसामान्य नागरिक यांचे महसूल विभागातील विविध कार्यालयात प्रलंबित असलेली प्रश्न निकाली काढण्यासाठी १ जून ते ३१ जुलै दरम्यान महाराजस्व अभियान राबविण्यात येणार आहे. याबाबत महसूल विभागाने अध्यादेश जारी केला आहे.

# अरुंद शेत रस्ते आता होणार १२ फुटांचे

### महायुती सरकारचा क्रांतिकारी निर्णय

**मुंबई, २३ मे**

शेतीच्या बांधावरील पारंपरिक अरुंद शेतरस्ते आता ३ ते ४ मीटर म्हणजे जवळपास १२ फूट रुंद करण्याचा क्रांतिकारी व ऐतिहासिक निर्णय महसूल विभागाने घेतला आहे. महाराष्ट्राचा आधुनिक शेतीकडे वाढता कल, मोठ्या कृषि अवजारांची वाहतूक तसेच शेतीमाल योग्य वेळेत बाजारपेठेत पोहचावा यासाठी हा निर्णय महत्वाचा दुवा ठरणार आहे. याबाबतचा शासन आदेश जारी करण्यात आला.

ट्रॅक्टर, रोटावेटर, हार्वेस्टर यासारखी मोठी कृषी अवजारांची शेतात वाहतूक करताना अडचणी आल्या. शिवाय शेतमाल बाजारपेठेत नेताना अरुंद रस्त्यांनी समस्या निर्माण होत होत्या. या सर्व बाबींचा विचार करून १२ फुटांचा शेतरस्ता करण्याचा निर्णय घेण्यात आला. शेतरस्त्यांच्या जागांमध्ये अतिक्रमणासह भविष्यातील खरेदी विक्रीच्यावेळी अन्य शेतीविषयक वाद उद्भवू नयेत म्हणून या शेतरस्त्याची नोंद जमिनीच्या ७/१२मध्ये करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनातून शेतकरी हिताची पायाभरणी होत आहे. हा निर्णय घेताना सर्वंकष विचार करण्यात असल्याने, पारंपरिक शेत रस्ता बांधणीच्या १९६६ च्या महाराष्ट्र महसूल संहितेतील कलमानुसार प्रथमच, सुमारे ६० वर्षांनी महाराष्ट्राच्या आधुनिक शेतीसाठी हा निर्णय घेण्यात आला.

**आधुनिक शेती व उत्पन्नवाढीसाठी लाभ**

शेतकऱ्यांना आधुनिक शेती व उत्पन्नवाढीसाठी या निर्णयाचा लाभ होईल. प्रथम शेत रस्त्याची आवश्यकता तपासावी, शेजारच्या भूधारकाच्या वहिवाटीच्या हक्कांचा, त्यांच्या अडचणी, अपेक्षांचा विचार करावा. रस्त्याची रुंदी वाढवण्यासाठी यांत्रिकीकरणानुसार निर्णय घ्यावा अनावश्यक रुंदीकरण करू नये, अशा सूचना महसूल अधिकाऱ्यांना देण्यात आल्या असल्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)






सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे...

### होळकर जन्मोत्सव मध्यवर्ती मंडळ अध्यक्षपदी पाटील-बेलाटीकर

**सोलापूर, दि. २३ मे-**

सात रस्ता येथील राजमाता अहिल्यादेवी होळकर जन्मोत्सव मध्यवर्ती मंडळाच्या अध्यक्षपदी विजया पाटील-बेलाटीकर तर सचिवपदी सुनंदा साळुंके यांची निवड करण्यात आली. सात रस्ता येथील मध्यवर्ती मंडळाची बैठक शासकीय विश्रामगृह येथे पार पडली. यावेळी श्रीराम पाटील-बेलाटीकर, सिद्राम चोपडे, भंडारकवठ्याचे माजी बाजार समिती चेअरमन महादेव पाटील, ॲड. शंकर नरोटे, लक्ष्मण भोसले, अप्पाराव हाके, महासिद्ध गायकवाड यांची उपस्थिती होती. इतर पदाधिकारी पुढीलप्रमाणे : उपाध्यक्ष काशिबाई सोलनकर, मुमताज तांबोळी, सहसचिव वंदना भिसे, खजिनदार निलम हाके, सदस्य योगिता गायकवाड यांची एकमताने निवड करण्यात आली. प्रास्ताविक सिद्राम चोपडे यांनी केले. यावेळी अमोगसिद्ध पुजारी, ओगसिद्ध पुजारी, कैलास नरोटे, शिलसिद्ध देशमुख, गेनसिद्ध बोरोळे, राजू दिवाणजी, अप्पाराव हाके, रामदास शिनीवडीयार उपस्थित होते. आभार महासिद्ध गायकवाड यांनी मानले.




### कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे रविवारी जिल्ह्याच्या दौऱ्यावर

**सोलापूर, दि. २३ मे-**

ॲड. माणिकराव कोकाटे कृषी मंत्री महाराष्ट्र राज्य हे दि.२५ मे रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत आहे. त्यांचा दौरा याप्रमाणे : रविवार दि.२५ मे २०२५ रोजी पुणे येथून मोटारीने दुपारी २.३० वा. पंढरपूर शासकीय विश्रामगृह येथे आगमन व श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरा कडे प्रयाण व दर्शनास उपस्थिती. दुपारी ०३.३० वा. पंढरपूर येथून अरण ता. माढा कडे प्रयाण. ०४.०० वा. अरण येथे आगमन घाडगे फार्म पाहाणी व राखीव. ०४.३० वा अरण येथून मोटारीने शेलगाव- वांगी ता. करमाळा कडे प्रयाण . सायं. ०५.३० वा शेलगांव- वांगी येथे आगमन व तालुका फळरोपवाटीका, जेऊर व केळी संशोधन केंद्र शेलगाव येथे भेट व राखीव. सायं. ०६.०० शेलगाव वांगी ता. करमाळा येथून कंदर ता. करमाळा कडे प्रयाण. सायं. ०६.३० कंदर ता. करमाळा येथे आगमन व किरण डोके , फळांचे पुरवठादार यांचे पॅक हाऊस व कोल्ड स्टोरेज प्री कुलिंग पहाणी व राखीव .सायं. ०७.३० वा. कंदर येथून भीमानगर ता. माढा कडे प्रयाण. रात्री ८.०० वा उजनी , शासकीय विश्रामगृह , भीमानगर, ता. माढा येथे आगमन व मुक्काम करतील.

# एनटीपीसीकडून गांधी प्राणी संग्रहालयास ३ कोटीचा निधी

### महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांची माहिती

### पाणीपुरवठा संदर्भातील ८८९ कोटीचा सुधारित आराखडा शासनाकडे पाठविणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मे-**

एनटीपीसीच्या सी.एस.आर फंडाम धून विजापूर रोडवरील महात्मा गांधी प्राणी संग्रहालयासाठी २ कोटी ७९ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. महापालिकेच्या वतीने पाणीपुरवठ्याच्या ८८९ कोटी रुपयांच्या सुधारित आराखडा तयार करून त्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येणार आहे,

#### त्रुटी दूर करून पाणीपुरवठा आराखडा प्रस्ताव पाठवणार

शहरातील अंतर्गत पाणीपुरवठा सुधारण्याच्या दृष्टीने महापालिकेच्या वतीने यापूर्वी ८८९ कोटी रुपयांचा आराखडा तयार करून त्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला होता. या संदर्भात शासनाकडे विविध तीन बैठका देखील झाल्या होत्या. मात्र या आराखड्यामध्ये काही त्रुटी काढून शासनाच्या नगरविकास विभागाने तो महापालिकेकडे परत पाठविला होता. यामधील विविध त्रुटी दूर करून व त्याची पूर्तता करून सुधारणा झालेला आराखडा प्रस्ताव पुन्हा शासनाकडे पाठविण्यात येणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली.

अशी माहिती महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली.

एनटीपीसीचे महाप्रबंधक बीजेसी शास्त्री आणि अधिकाऱ्यांनी काही दिवसांपूर्वी महात्मा गांधी प्राणी संग्रहालयास भेट देऊन पाहणी केली होती.यावेळी एनटीपीसीच्या सी.एस आर फंडमधून महात्मा गांधी प्राणी संग्रहालयासाठी सहकार्य करण्यात येईल, असे स्पष्ट केले होते. त्यानंतर त्यांनी हा निधी मंजूर केला आहे.

विजापूर रस्त्यावरील महापालिकेच्या महात्मा गांधी प्राणी संग्रहालयाच्या विविध विकास कामांसाठी एनटीपीसी कडून २ कोटी ७९ लाख रुपये प्राप्त झाल्याची माहिती महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांनी शुक्रवारी दिली. महापालिकेच्या प्राणी संग्रहालयाची मान्यता विविध बाबी आणि सुधारणा नसल्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून झ्यु एथॉझ्युस केली आहे. जो ऍथॉरिटीच्या नियमानुसार प्राणी संग्रहालयात ज्या ज्या गोष्टी हव्या आहेत त्या गोष्टी पूर्ण करण्यासंदर्भात महापालिकेला कळविण्यात आले होते. यानुसार महापालिकेकडून या कामांची पूर्तता करण्याचा प्रयत्न झाला मात्र विविध कामांसाठी मोठा निधी लागत असल्याने काही कामांना ब्रेक लागला होता. प्राणी संग्रहालयात झोप ए थर्टीने काढलेल्या त्रुटी प्रमाणे विविध १५ कामे पूर्ण करण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून आराखडा तयार करण्यात आला होता. यानंतर महापालिकेने या कामांसाठी सीएसआर फंडातून निधी मिळविण्यासाठी प्रयत्न केले. आता त्यांनी महापालिकेकडे प्राणी संग्रहालयातील विविध सुधारणांसाठी २ कोटी ७९ लाख रुपयांचा निधी सुपूर्द केला आहे. एनटीपीसी कडून निधी मिळाल्यानंतर आता महापालिका प्रशासनाने करण्यात येणाऱ्या विविध कामांची प्रक्रिया वेगाने सुरू केली असून येत्या आठवडाभरात ही प्रक्रिया पूर्ण होऊन त्याची निविदा काढण्यात येईल आणि लवकरच ही सर्व कामे पूर्ण करून झ्यु एथॉरिटीकडे सोलापूर शहरातील महापालिकेच्या महात्मा गांधी प्राणी संग्रहालयाला मान्यता मिळवण्यासाठी पुढील प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांनी दिली.

# 'सेन्ट्रल टेक्स्टाईल' प्रकरणी सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करा


### उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार : आडम मास्तरांचा मूक मोर्चात इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मे-**



अक्कलकोट रोड एमआयडीसी परिसरातील सेन्ट्रल टेक्स्टाईल कारखान्याला लागलेल्या भीषण आगीत कारखान्याच्या मालकसह कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे या कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांची रोजीरोटीचा सवाल निर्माण झालेला आहे. हि चिंताजनक परिस्थिती सोलापूर महानगरपालिकेचे प्रशासक डॉ. सचिन ओंबासे त्यांचे संबंधित सर्व अधिकारी कर्मचारी यांच्या दिरंगाईमुळे निर्माण झालेली आहे. या घटनेला हेच जबाबदार असल्याचा दावा करत यांच्यावर भारतीय दंड विधान संहिता ३०२, नवीन भारतीय न्याय संहिता १०० कलमान्वये सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून खटला न्यायालयात चालविण्यात यावा. जर पोलीस प्रशासनामार्फत सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल न झाल्यास मुंबई उच्च न्यायलयात जनहित याचिका दाखल करणार असल्याची घोषणा मूक मोर्चात ज्येष्ठ कामगार नेते तथा माजी आमदार कॉ. नरसय्या आडम (मास्तर) यांनी केली.

गुरुवार दि. २२ मे २०२५ रोजी सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स सलंग्न लाल बावटा यंत्रमाग कामगार युनियनच्या वतीने सेन्ट्रल कारखाना या घटनास्थळापासून शेकडो कार्यकर्ते काळ्याफिती बांधून काळे झेंडे घेऊन अत्यंत शांततेत सनदशीर मार्गे मूकमोर्चा काढण्यात आला. त्यानंतर मूक मोर्चाचे श्रद्धांजली सभेत रुपांतर झाले. ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार कॉ. नरसय्या आडम (मास्तर) व सिटूचे राज्य महासचिव कॉ. एम.एच.शेख यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाद्वारे सहा.पोलीस आयुक्त प्रताप पोमण व वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद वाघमारे यांना निवेदन देण्यात आले. या प्रसंगी या शिष्टमंडळात माकपाचे जिल्हा सचिव कॉ. युसुफ शेख (मेजर), कॉ. व्यंकटेश कोंगारी, कॉ. किशोर मेहता, कॉ. लिंगव्वा सोलापुरे व मयतांचे कुटुंबीय आदींचा समावेश होता. यावेळी कॉ. एम.एच.शेख म्हणाले, पालिका प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन आणि संबंधित प्रशासनाने ओळखून त्यावर तत्परता दाखवली पाहिजे. परंतु यामध्ये हलगर्जीपणा झालेला आहे. यामुळेच हि दुर्दैवी घटना घडली. याची किमत केवळ शासनाकडून मदत दिल्याने होत नाही. त्यांना न्याय कधी मिळणार असा सवाल उपस्थित केले. त्यानंतर ॲड अनिल वासम, किशोर मेहता, व्यंकटेश कोंगारी, सलीम लोखंडवाला यांनी या घटनेच्या निषेधार्थ टीकेची जोड उठवली.



**सोलापुरात पावसाची रिमझिम...**

**सोलापूर : सोलापुरात शुक्रवारी रिमझिम पावसाच्या सरी कोसळत होत्या. सायंकाळी साडे़पाचपर्यंत ३.९ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे.**

# शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत

### महापालिकेकडून पाणीपुरवठ्याचे सुधारित वेळापत्रक जाहीर

**सोलापूर, दि. २३ मे-**

समांतर जलवाहिनी जोड काम तसेच गळती दुरुस्ती कामामुळे शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. यामुळे महापालिकेने पाणीपुरवठ्याची सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे. रविवार दि. २५ ते २७ मेपर्यंत शहराच्या कुठल्या भागाला पाणीपुरवठा होईल याचे वेळापत्रक महापालिकेने जाहीर केले.

उजनी येथून सोलापूरकडे आलेली दुहेरी समांतर जलवाहिनी पाकणी येथे जोडण्याकरीता व लांबोटी ब्रीजखाली उजनी मेनलाईनला लिकेज असल्याने ते दुरुस्ती करण्यासाठी रविवार दि.२५ मे रोजी उजनी व पाकणी येथील पंप सकाळ पासून ८ ते १० तास बंद राहणार आहे. त्यामुळे उजनी लाईनवरुन व भवानीपेठ पंपहाऊस वरुन व गावठाण भाग एक दिवसाने एक रोटेशन पाणी पुढे जाणार आहे. नागरिकांच्या सोयीकरता पाणीपुरवठा विभागाकडून खालीलप्रमाणे सुधारित पाणी पुरवठ्याचे वेळापत्रक नियोजित आहे.

यानुसार रविवार दि.२५ मे रोजी हायलेव्हल २१ इंचीवरून कन्ना चौक, राजेंद्र चौक, गणेशपेठ, साखरपेठ, बुधवार बाजार, भुलाबाई चौक, मंगळवार बाजार, हायलेव्हल चक्रीवरुन सोमवार पेठ, शनिवार पेठ, भारतीय चौक, विजापूर वेस, रंगरेज बोळ, रहेमानिया बोळ, झोन टाकी येथून धमाका ढोलीबाजा सतनाम चौक, सरस्वती चौक, गुलजार तालीम, १५० एचपीवरुन नवीन भद्रावती टाकीवरुन रविवारपेठ, जोशीगल्ली, २५६ गाळे, विठ्ठल पेठ, कुचन शाळा परिसर, मार्केटयार्ड शांतीनगर या भागाला पाणीपुरवठा होणार आहे. सोमवार दि. २६ मे रोजी हायलेव्हल चक्रीवरुन गुरुवार पेठ, शुक्रवार पेठ, शनिवारपेठ, धाकटा राजवाडा, कोंतम चौक, माणिक चौक, पेंटर चौक, झोन टाकीवरून कोंगाड कुंभार गल्ली, शास्त्री नगर, गुरु वस्ती,१५० एचपीवरुन स्लॉटर हाऊस, विद्या नगर, समर्थ नगर, सिध्दार्थ चौक, सिध्दार्थ हौसींग सोसायटी, पाथरुट चौक, उजनी लाईन वरून दोन नंबर झोपडपट्टी, भूषणनगर, इंदिरानगर, रामलिंग नगर, चुना भट्टी, बेघर वसाहत, विजापूर नाका, सलगर वस्ती, अमोल नगर, गैबीपीर नगर, उपलप वस्ती, सनत नगर, बुवा गल्ली, संजय गांधीनगर, रोनक बेकरी परिसर,भवानी पेठत कस्तुरबा टाकीवरून सम्राट चौक, मराठा वस्ती, काशीकापडे गल्ली, सारडा प्लॉट, स्टेट बँक कॉलनी, रमाबाई आंबेडकर नगर, चाटी गल्ली, बाळीवेस, बुधवार पेठ या भागाला पाणीपुरवठा होणार आहे. मंगळवार दि. २७ मे रोजी हायलेव्हल चक्रीवरुन मुस्लिम पाच्छा पेठ, जेलरोड परिसर, राहुल गांधी झोपडपट्टी, शहापूर चाळ, काडादी चाळ, किडवाई चौक, झोन टाकीवरून अशोकनगर, नळ बाजार चौक, मुर्गीनाला परिसर, सतनाम चौक, उजनी लाईनवरून बाळे शिवाजी नगर, वसंत विहार, भूषण नगर १ ते ६, उत्कर्ष नगर, इरण्णा वस्ती, कोळी समाज सोसायटी, रामलिंग नगर, एक नंबर झोपडपट्टी या भागाला पाणीपुरवठा होणार आहे. नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा वापर काटकसरीने करुन महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन महापालिका सार्वजनिक आरोग्य अभियंता तपन डंके यांनी केले आहे.

### एमआयडीसीतील नियमबाह्य कारखान्यांची

# एनओसी रद्द करण्यासाठी महापालिका देणार प्राधिकरणाकडे पत्र

### महापालिकेच्या पथकांकडून 131 कारखान्यांचे सर्वेक्षण

**सोलापूर, दि. २३ मे-**

अक्कलकोट रोड एमआयडीसी येथील कारखाना जळीत प्रकरणानंतर महापालिकेच्या वतीने या परिसरात सर्व्हे करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे. आत्तापर्यंतच्या १३१ कारखान्यांच्या सर्व्हेमध्ये या ठिकाणच्या कारखान्यांमध्ये अनेक बाबी नियमबाह्य आढळून आले आहेत. यामुळे महापालिका प्रशासनाकडून आता एमआयडीसी परिसरातील नियमबाह्य असलेल्या कारखान्यांची एनओसी रद्द करण्यात यावी अशा संदर्भातील पत्र देण्यात येणार आहे, अशी माहिती डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली.

#### कारखान्यात राहणाऱ्यांना खाली करण्याच्या नोटिसा बजावणार

महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली एकूण ९ पथकांच्या माध्यमातून आतापर्यंत करण्यात आलेल्या सर्वेक्षणामध्ये १३१ कारखान्यांमधील १६ कारखान्यांमध्ये त्रुटी आढळून आल्या. १७ कारखान्यांमध्ये लोक राहत असल्याचे आणि ८२ कारखान्यांमध्ये अग्नि सुरक्षा व्यवस्थाच नसल्याची बाब निदर्शनास आली आहे. केवळ दोन कारखान्यांमध्ये सुरक्षा व्यवस्थेसह सर्व नियम पाळण्यात आल्याचे देखील दिसून आले आहे. ४७ कारखान्यांच्या ठिकाणी अर्धवट व्यवस्थाच आहे. ज्या ठिकाणी कारखान्यांमध्ये रहिवास आढळून आला आहे, त्यांना नोटिसा बजावून खाली करण्यासंदर्भात कळविण्यात येणार आहे.

अक्कलकोट रोड एमआयडीसी जाळीतग्रस्त कारखान्याला भेट देऊन पाहणी केली असता त्या ठिकाणी आग लागल्यानंतर रेस्क्यू करण्यासाठी जागाच नव्हती. याचा अहवाल अग्निशामक दलाकडून प्राप्त झाला आहे. फ्रंट मार्जिन मध्ये कार्यालय थाटले होते. इतर ठिकाणी खुल्या जागेत देखील साहित्य ठेवण्यात आल्यामुळे आज विझवण्यासाठी अडचणी आल्या होत्या. जागा सोडली असती तर आग विजविण्याचे कार्य गतीने करता आले असते.

त्या परिसराची पाहणी केली असता असेच प्रकार अनेक कारखान्यांमध्ये दिसून आले. एमआयडीसीतील परिसरात महापालिकेकडे रस्ते, पाणी, ड्रेनेज याच्या व्यवस्थेचीच जबाबदारी आहे. उर्वरित या परिसरातील इतर सर्व परवानगी व बाबी या एमआयडीसी प्राधिकरणाकडेच आहे. अग्निशामक सेवा मात्र महापालिका देत असते. ज्या कारखान्यांमध्ये नियमबाह्य प्रकार आढळून आला आहे अशा कारखान्यांना एमआयडीसी प्राधिकरणाने दिलेली एनओसी रद्द करण्यात यावी अशा प्रकारचे पत्र महापालिकेच्या वतीने देण्यात येणार आहे. एमआयडीसीतील ज्याचे प्लॉट एक एकराचे आहे त्यांना मात्र विविध नियम अटींसह कारखान्याचे भाग सोडून दूरवर रहिवास करता येणार असल्याचे नियम असल्याचेही महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी स्पष्ट केले.

### मिरवणूकीच्या खर्चाला फाटा देत सामाजिक कार्य ही सामाजिक बांधिलकी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मे-**

शंभुराजे छावा जन्मोत्सव मध्यवर्ती मंडळाचे हे १७ वे वर्ष असून या सतरा वर्षात मंडळाच्या वतीने एकदाही मिरवणूक काढली नाही त्यामुळे ध्वनी प्रदूषण, वायु प्रदुषण याचबरोबर रयतेला होणारा त्रास, पोलिस प्रशासनावर येणारा प्रचंड ताण या सर्व गोष्टी टाळून मिरवणूकीवर होणारा खर्च न करता मध्यवर्ती मंडळाच्या वतीने वर्षभर सामाजिक उपक्रम राबविले जातात ही खरी सामाजिक बांधिलकी असून हे कार्य खरोखरच कौतुकास्पद आहे असे गौरवोद्गार सोलापूर तालुका पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राहुल देशपाठे यांनी काढले.

शंभूराजे युवा संघटन महाराष्ट्र प्रणित शंभूराजे छावा जन्मोत्सव मध्यवर्ती मंडळाच्या वतीने चार हुतात्मा चौक येथे छत्तपती सभाजीराजेंच्या मूर्तीची प्राण प्रतिष्ठापणा करण्यात आली. यावेळी देशपांडे बोलत होते प्रारंभी शंभूराजेच्या मुर्तीचे पुजन वरिष्ठ पोलिस निरीक्षक राहुल देशपांडे, शिवप्रताप तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रतापसिंह चौहान, शंभूराजे मध्यवर्ती मंडळाचे संस्थापक अध्यक्ष नितीन भैय्या चव्हाण, उपाध्यक्ष अभिजीत पवार, उत्सव समीती अध्यक्ष आशिताष इगवले यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. या प्रसंगी संघटनेचे सरचिटणीस राहुल पवार, उत्सव समिती उपाअध्यक्ष प्रताप खंदारे, सचिव राहुल पाटील, खजिनदार हर्षीकेश सुरवसकर, प्रसिद्धी प्रमुख अनिल कवडे, शंभूराजे युवा संघटनेचे शहराध्यक्ष प्रशांत गुंडला, सोशल मीडिया प्रमुख नितेश माने आदी उपस्थित होते.

# विजेच्या प्रश्नी आडम मास्तरांनी घेतली बारामतीच्या मुख्य अभियंता यांची भेट

### स्मार्ट मीटरची सक्ती नको, डिजिटल मीटरच बसवा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ मे-**



महाराष्ट्र राज्य वीज वितरण महामंडळामार्फत राज्यात सध्या अस्तित्वात व सेवेत असलेले नियमित चालणारे डिजिटल मीटर काढून स्मार्ट मीटरची सक्ती करत आहेत. याच्या विरोधात सबंध राज्यात प्रखर विरोध होत असताना २३ एप्रिल रोजी सोलापूरातील २१ हजार वीज ग्राहकांनी स्मार्ट मीटर सक्तीच्या विरोधात मा. अधीक्षक अभियंता यांना वैयक्तिक तक्रारी अर्ज दाखल करून वीज मंडळा समोर प्रचंड निदर्शने केले. मात्र त्यावर कोणतीच कार्यवाही झालेली नाही. उलटपक्षी स्मार्ट मीटरची सक्ती वाढत आहे. याचा थेट परिणाम सोलापूर शहरासह रे नगर व कॉ. गोदुताई नगरवर होत आहे. यामुळे नागरिकांचा प्रचंड असंतोष वाढला आहे. हि वस्तुस्थिती सांगण्यासाठी वीज वितरण महामंडळाचे विभागीय कार्यालय बारामती येथील मुख्य अभियंता श्री. पेठकर यांना भेटून स्मार्ट मीटरची सक्ती नको, डिजिटल मीटरच बसवा ही जनतेची व वीज ग्राहकांची मागणी ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ. नरसय्या आडम (मास्तर) यांनी केली.

गुरुवार दि. २२ मे २०२५ रोजी वीज वितरण महामंडळाचे विभागीय कार्यालय बारामती येथील मुख्य अभियंता श्री. पेठकर यांना ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ. नरसय्या आडम (मास्तर) यांच्या मार्गदर्शनाखाली शिष्टमंडळाद्वारे निवेदन देऊन सविस्तर चर्चा करण्यात आली. या शिष्टमंडळात वीरेंद्र पद्मा, नरेश दुगाणे, राजेंद्र गेंटयाल, वसीम देशमुख आदींचा समावेश होता.

यावेळी मुख्य अभियंता यांच्याशी सल्लामसलत करताना कॉ. आडम मास्तर यांनी मांडणी केली कि, मौजे कुंभारी तालुका दक्षिण सोलापूर जिल्हा सोलापूर येथे रे नगर कॉ. ऑप. हौसिंग सोसायटी फेडरेशनच्या माध्यमातून ३० हजार असंघटीत कामगारांचा महत्वाकांक्षी, पथदर्शी एकात्मिक गृहनिर्माण प्रकल्प उभारलेला आहे. या प्रकल्पातील लाभार्थ्यांची महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मार्फत डिजिटल मीटर लावण्याची मागणी आहे. या संदर्भात सोलापूर येथील आपल्या कार्यकारी अभियंता कार्यालयाकडे संपर्क केले असता डिजिटल मीटर उपलब्ध नाहीत असे सांगण्यात येते. या ठिकाणी घरकुलाचा ताबा घेतलेल्या लाभार्थ्यांना जर अत्यावश्यक सेवेतील वीज पुरवठा मिळत नसेल तर प्रकल्पाचे उद्दिष्ट साध्य होणार नाही. तसेच लाभार्थ्यांना तातडीने वीज पुरवठा करून घरांचा ताबा देण्यासंबंधित पंतप्रधान आवास योजना कार्यालयाकडून तगादा आहे. तसेच मा. जिल्हाधिकारी यांनी या संदर्भात दि. ६ मे २०२५ रोजी रे नगर फेडरेशनला पत्र दिले आहे.

# सोलापुरात जीएसटीचे कोट्यावधींचे रॅकेट उघड

### वकील साजिद अहमद शेखला अटक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ मे -**

सोलापुरात जीएसटीचे बनावट रॅकेट चालवणाऱ्या साजिद अहमद शेख या वकिलाला कोल्हापूरच्या केंद्रीय जीएसटी गुप्तचर यंत्रणेने गुरुवारी धडक कारवाई करत अटक केली. साजिद शेख याला न्यायालयात हजर केले, त्यावेळी त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी ठोठावली आहे. त्यानंतर त्याची रवानगी कोल्हापूर येथील कळंबा मध्यवर्ती कारागृहात करण्यात आली आहे. आतापर्यंत केलेल्या तपासात सुमारे ५० कोटी रुपये बनावट पावत्यांद्वारे त्याने वापरले गेल्याचे निष्पन्न झाले आहे.

साजिद याने सोलापुरात ३० कंपन्यांचे जाळे तयार केले. त्यातील निम्म्याहून अधिक कंपन्या बनावट आहेत. मालाचा पुरवठा न करताच तो लोकांना बिले द्यायचा. काही दिवसांपूर्वी केंद्रीय जीएसटी गुप्तचर यंत्रणेने साजिद याच्या सोलापूर येथील कार्यालयावर छापा टाकला होता. छाप्यात त्याचा कॉम्पुटर, मोबाईल आदी वस्तू जप्त केल्या होत्या.

साजिद शेख याने ३० कंपन्यांच्या माध्यमातून सोलापुरात रॅकेट चालवले. त्या कंपन्या ज्यांच्या नावे आहेत, त्या सर्वांची माहिती गुप्तचर विभागाने संकलित केली आहे. त्यांच्याकडेही आता तपास सुरू असून या रॅकेटमध्ये सहभागी असलेल्यांवर कारवाई होण्याची शक्यता आहे.

जप्त वस्तूंची फॉरेन्सिक उकल करण्यात आली. त्यातून जीएसटी गुप्तचर यंत्रणेने सोलापुरातील एकाच दिवशी १२ कंपन्यांच्या ठिकाणी छापे टाकून सर्च ऑपरेशन केले होते. या सर्व माहितीच्या विश्लेषणातून साजिद याने १२ कंपन्यांमार्फत सुमारे ५० कोटींचा कर बनावट पावत्यांद्वारे वापरला गेल्याचे निष्पन्न झाले आहे. सोलापुरातील साजिदच्या एकूण ३० कंपन्यांच्या तपासातून हा आकडा १०० कोटीपर्यंत जाण्याची शक्यता अधिकाऱ्यांनी वर्तविली आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# ...तर पाकिस्तानवर पुन्हा कधीही होऊ शकतो हल्ला

## ● ऑपरेशन सिंदूर अद्याप संपलेले नाही ● एस. जयशंकर यांचा स्पष्ट इशारा

◆ **नवी दिल्ली, २३ मे**



पहलगाम हल्ल्यानंतर सुरू करण्यात आलेले ऑपरेशन सिंदूर अद्याप संपलेले नाही. ही मोहीम अद्याप सुरूच आहे. जर पाकिस्तातून हालचाली करणाऱ्या अतिरेक्यांनी पुन्हा भारतावर दहशतवादी हल्ले केले तर भारत त्याला सडेतोड उत्तर देईल आणि दहशतवाद्यांचा सफाया करेल, असा रोखठोक इशारा परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी दिला. डच माध्यमांना दिलेल्या एका मुलाखतीत जयशंकर यांनी भारताची भूमिका स्पष्टपणे स्पष्टपणे मांडली.

पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानातील अतिरेक्यांचे अड्डे उद्ध्वस्त करण्यासाठी ऑपरेशन सिंदूर राबवले. त्यानंतर पाकिस्तानने शस्त्रसंधीची विनंती केल्यानंतर शस्त्रसंधीही झाली. त्यामुळे दोन्ही देशांनी एकमेकांवर हल्ले करणं थांबवले आहे. पण भारताने हल्ले पूर्णपणे थांबवले आहेत का? असा प्रश्न केला असता परराष्ट्रमंत्र्यांनी उपरोक्त उत्तर दिले.

पाकिस्तानचे फिल्ड मार्शल आसिम मुनीरच्या लष्कराचे दहशतवाद्यांशी थेट संबंध असल्याचे आता उघड झाले आहे. पाकिस्तानी लष्कर दहशतवादामध्ये आकंठ बुडाले आहे. पाक आर्मी आणि दहशतवादी यांना वेगळे करता येणे शक्यच नाही, असे जयशंकर यांनी म्हटले आहे.

एस. जयशंकर पुढे म्हणाले, १९४८ पासून जम्मू आणि काश्मीरमध्ये पाकिस्तानी सैन्याकडून अशांतता निर्माण केली जात आहे. पाकिस्तानकडून वातावरण खराब केले जात आहे. त्याच्याशी भारत अजूनही संघर्ष करीत आहे. पाकिस्तानकडून कट्टरपंथी आणि धार्मिक अजेंडाही चालवला जात आहे. दहशतवादी पाकिस्तानात फिरत आहेत. आम्हाला त्यांचे तळ माहीत आहेत. त्यांनी परत आमच्यावर हल्ला केला तर आम्ही त्यांना घुसून मारू, असा रोखठोक इशारा त्यांनी दिला.

**सर्वाधिक प्रतिबंधित दहशतवादी पाकिस्तानातच**

पाकिस्तानला आपल्या भूमीवर सुरू असलेल्या दहशतवादी कारवायांबाबतची माहिती नाही, अशी एक धारणा निर्माण करण्यात आली होती. ही धारणाही पराष्ट्रमंत्र्यांनी खोडून काढली. पाकिस्तानी सेना आणि सरकार दोघेही दहशतवादी कारवायांमध्ये गुंतलेले आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाने प्रतिबंधित केलेले सर्वाधिक दहशतवादी पाकिस्तानातच आहेत. हे दहशतवादी मोठ्या शहरात राहत असून दिवसळाढवळ्या कारवाया करीत आहेत. त्यांच्या लपण्याच्या जागा आम्हाला माहीत आहेत. त्यांच्या हालचालींचीही माहिती आहे. त्यांचे एकमेकांशी असलेले संपर्कही जगजाहीर आहेत, असे जयशंकर त्यांनी सांगितले. ◀(वृत्तसंस्था)

### आठ दशकांपासून दहशतवादाचा सामना

दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपातील देश स्थिरता आणि शांततेच्या वातावरणात जगत आहेत. विशेषतः १९९१-९२ पासून परिस्थिती अधिक चांगली झाली आहे. परंतु गेल्या ८० वर्षांपासून आम्ही अशा संघर्षांना तोंड देत आहोत. तुम्ही (युरोपीयन देश) दहशतवाद नाकारत राहिले पण आम्ही गेल्या आठ दशकांपासून याच्याशी झुंज देत आहोत. तुम्ही आज जे सत्य म्हणून सांगत आहात त्याचा आम्ही बऱ्याच काळापासून प्रत्यक्ष सामना करीत आहोत, असेही जयशंकर मुलाखतीत म्हणाले. ■

### राष्ट्रीय सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य

आमचे दोन कठीण शेजारी आहेत - चीन आणि पाकिस्तान. आमच्यासाठी, पाकिस्तानकडून होणाऱ्या या दहशतवादाची समस्या नेहमीचीच आहे. अशा परिस्थितीत, आमच्यासाठी राष्ट्रीय सुरक्षा हा आर्थिक समृद्धी आणि स्थिरतेपेक्षा अधिक महत्त्वाचा मुद्दा आहे. भारताचे सुरक्षा आव्हान युरोपपेक्षा खूप मोठे आहे. या परिस्थितीमुळे आपल्याला सुरक्षेला प्राधान्य द्यावे लागेल, असे जयशंकर म्हणाले. ■

# राष्ट्रपतींच्या हस्ते सैनिकांना कीर्ती आणि शौर्य चक्र प्रदान

### वीरमातांचे केले सात्वन

◆ **नवी दिल्ली, २३ मे**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुरुवारी राष्ट्रपती भवनात पहिल्या टप्प्यातील शौर्य पुरस्कारांचे वितरण केले. कर्तव्य बजावताना असाधारण शौर्य, समर्पण आणि बलिदान दाखवणाऱ्यांना हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. राष्ट्रपतींनी सहा कीर्ती चक्र प्रदान केली. यापैकी चार जणांना मरणोत्तर पुरस्कार देण्यात आले. या काळात ३३ शौर्य चक्र देखील प्रदान करण्यात आली. यापैकी सात जणांना मरणोत्तर पुरस्कार देण्यात आले.

कीर्ती चक्र हा भारताचा दुसरा सर्वोच्च शांतताकालीन शौर्य पुरस्कार आहे. राष्ट्रपती भवनाच्या प्रजासत्ताक मंडपात झालेल्या समारंभात पंतप्रधान मोदी, उपराष्ट्रपती जगदीप धनकड, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह उपस्थित होते. या दरम्यान, शीख लाईट इन्फंट्री १९ राष्ट्रीय रायफल्सचे मेजर आशिष धोनचक (सेना पदक) आणि शिपाई प्रदीप सिंग यांना मरणोत्तर शौर्य चक्र प्रदान करण्यात आले.



शौर्य चक्र प्राप्त करणाऱ्यांमध्ये स्क्वॉड्रन लीडर दीपक कुमार, राजपूत रेजिमेंट ४४ व्या बटालियन राष्ट्रीय रायफल्सचे मेजर विजय वर्मा, डेप्युटी कमांडंट विक्रांत कुमार, सीआरपीएफचे जेफरी हमिंगचुल्लो, इन्स्पेक्टर (जीडी), जम्मू आणि काश्मीर पोलिसांचे विशेष पोलिस अधिकारी अब्दुल लतीफ, पॅराशूट रेजिमेंटचे लेफ्टनंट कर्नल सीव्हीएस निखिल, आर्मी सर्व्हिस कॉर्प्सचे मेजर तृप्तप्रीत सिंग यांचा समावेश आहे.

जम्मू आणि काश्मीर आणि ईशान्येकडील दहशतवादविरोधी कारवाईदरम्यान दाखवण्यात आलेल्या शौर्याबद्दल जवानांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या कारवाईदरम्यान दहशतवाद्यांना निष्क्रिय करून अटक केली. तसेच शस्त्रास्त्रे आणि दारूगोळा जप्त केला. भारतीय नौदलाच्या अधिकाऱ्यांनी चाचेगिरीविरोधी मोहिमांचे नेतृत्व केले, ज्यामुळे चाच्यांनी आत्मसमर्पण केले आणि ओलिसांची सुटका केली, तसेच जळत्या तेल टँकरवर अग्निशमन मोहिमेदरम्यान शौर्य दाखवले. भारतीय हवाई दलातील पुरस्कार विजेत्यांनी जीवघेण्या परिस्थितीतही विमानाच्या बचावकार्यात अत्यंत धैर्य दाखवले आणि नागरी क्षेत्रांपासून दूर जाऊन जीवित किंवा मालमत्तेचे नुकसान टाळले. तिन्ही सेनादलातील सैनिक आणि अधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला त्याप्रसंगी वातावरण अत्यंत भावूक झाले होते. देशासाठी सर्वोच्च बलिदान दिल्याचा अभिमान वाटत असतानाच जवळचा आप्त गेल्याचे दुःखही चेहऱ्यावर दिसून येत होते. ◀(वृत्तसंस्था)

### व्यासपीठावरून खाली उतरून केले सांत्वन

जेव्हा हुतात्मा सैनिकांच्या आई आणि पत्नी पुरस्कार स्वीकारण्यासाठी आल्या. तेव्हा समारंभात राष्ट्रपती मुर्मू दोनदा व्यासपीठावरून खाली आल्या. राष्ट्रपतींनी त्यांना मिठी मारून त्यांचे सांत्वन केले. ■

## इस्रोच्या यशात महिला कर्मचाऱ्यांचे योगदान

◆ **कोलकाता, २३ मे**

इस्रो या प्रमुख अवकाश संशोधन संस्थेच्या कार्यामध्ये महिला कर्मचाऱ्यांचा वाटा सुमारे २० टक्के आहे आणि त्या उत्कृष्ट काम करत आहेत. भविष्यात इस्रोमध्ये महिला कर्मचाऱ्यांची टक्केवारी ४० टक्क्यांहून अधिक वाढली पाहिजे, असे प्रतिपादन इस्रोचे अध्यक्ष व्ही. एन. नारायणन यांनी केले आहे.

येथे एका खाजगी शाळेने आयोजित केलेल्या कार्यक्रमादरम्यान इस्रोचे अध्यक्ष व्ही. नारायणन् पत्रकारांशी बोलत होते. भारतासारख्या देशात ५० टक्के महिला लोकसंख्या आहे. महिलांनी महत्त्वपूर्ण योगदान दिल्याशिवाय देश प्रगती करू शकत नाही, असेही ते म्हणाले.

इस्त्रोमध्ये महिला कर्मचाऱ्यांची संख्या खूप आहे. महिला उत्कृष्ट काम करत आहेत व त्यांना त्यांच्या योगदानात प्रोत्साहन दिले पाहिजे. हळूहळू ही संख्या वाढली पाहिजे. सध्या, कदाचित २० टक्के महिला शास्त्रज्ञ असतील पण ती ४० टक्क्यांहून अधिक वाढावी, असेही ते म्हणाले. ◀(वृत्तसंस्था)

# पावसामुळे यूपी आणि राजस्थानात ६० नागरिकांचा मृत्यू

### झाडे उन्मळून पडली, जनजीवन विस्कळीत

◆ **नवी दिल्ली, २३ मे**

उत्तर प्रदेश आणि राजस्थानात गेल्या दोन दिवसांपासून वादळ आणि पावसाने धुमाकूळ घातला आहे. पावसाशी संबंधित घटनांमध्ये उत्तर प्रदेशात ५८ आणि राजस्थानमध्ये दोघांचा मृत्यू झाला. अवकाळी पावसाने पीकांचे मोठे नुकसान झाले असून जनावरांचाही मृत्यू झाला आहे. नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश प्रशासनाने दिला आहे.



फतेहपूरमध्ये ६, काशगंज येथे ५ तर मिरत, कानपूर, बुलंदशहर, एटाह आणि औरिया जिल्हयात प्रत्येकी चार जणांचा मृत्यू झाला. गौतम बुध्द नगर आणि कनौज येथे प्रत्येकी ३ तर गाजियाबाद, फिरोझाबाद, कानपूर ग्रामीण आणि इटवाह येथे प्रत्येकी दोन नागरिकांचा मृत्यू झाला. याशिवाय अलीगड, हाथरस, चित्रकुट, आंबेडकर नगर, अमेठी, झांशी, आग्रा, उन्नाव, बागपत, आझमगड आणि अयोध्या येथे पाऊस आणि वादळामुळे प्रत्येकी एका नागरिकाला प्राणाला मुकावे लागले.

हवामान खात्याने शुक्रवारी देशातील २८ राज्यांमध्ये वादळ आणि पावसाचा इशारा जारी केला. हिमाचल प्रदेशात गारपिटीचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान, मध्य प्रदेश आणि राजस्थानसह १२ राज्यांमध्ये उष्णतेच्या लाटेबाबत अलर्ट जारी करण्यात आला. याशिवाय, राजस्थानातील १९ जिल्ह्यांमध्ये वादळ आणि पावसाचा यलो अलर्ट आहे

राज्याच्या पश्चिमेकडील जिल्ह्यांमध्ये धुळीच्या वादळाचा इशारा देण्यात आला आहे. तीन शहरांमध्ये लाल उष्णतेच्या लाटेचा इशारा आहे. एका जिल्ह्यात ऑरेंज आणि १२ जिल्ह्यांमध्ये यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. उत्तर प्रदेशातील ६४ जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस पडला. गोरखपूरमध्ये सर्वाधिक ७४ मिमी पाऊस पडला. नोएडामध्ये ८० किमी प्रतितास वेगाने वारे वाहत होते. वादळ आणि पावसामुळे भोपाळ, इंदूर आणि रायसेनमध्ये अनेक झाडे उन्मळून पडली. राज्यावरून जाणाऱ्या मजबूत प्रणालीमुळे, पुढील काही दिवस असेच हवामान राहू शकते, असा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. ◀(वृत्तसंस्था)

## मुंबई व्यावसायिकाची १७.५ लाखांनी फसवणूक

◆ **ठाणे, २३ मे**

नवी मुंबईतील व्यावसायिकाची हरियाणातील पेट्रोल पंप घेण्यास मदत करण्याचे आश्वासन देणाऱ्या व्यक्तीने १७.५ लाख रुपयांनी फसवणूक केल्याची माहिती एका अधिकाऱ्याने शुक्रवारी दिली. तक्रारदार, याचा ट्रान्सपोर्टचा व्यवसाय आहे. त्याने डिसेंबर २०२० ते यावर्षी जानेवारी दरम्यान अनेक व्यवहार करून हरियाणातील हिस्सार येथील रहिवासी असलेल्या आरोपीला पैसे हस्तांतरित केले. मात्र, पेट्रोल पंप दिले नाही. व्यावसायिकाच्या तक्रारीवरून पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. ◀(वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### बिग बॉस- १९ चा सिझन लवकरच




**मुंबई** : बिग बॉसचा १९ वा सीझन आता निश्चित झाला आहे. खास गोष्ट म्हणजे यावेळीही सलमान खान हा शो होस्ट करणार आहे. सलमान जूनच्या शेवटच्या आठवड्यात कार्यक्रमाच्या पहिल्या प्रोमोचे चित्रिकरण सुरू करू शकतो, असे सांगितले जात आहे. हा शो जुलैमध्ये प्रसारित होऊ शकतो. दरम्यान, कार्यक्रमाच्या निर्मात्यांकडून अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. याआधी असे वृत्त आले होते, की शोच्या प्रमुख प्रायोजकांनी माघार घेतल्याने त्यांचे बजेट अडचणीत आले आहे. या कारणास्तव शो बंद करण्याची चर्चा होती. ■

### स्ट्रेन्जर थिंग्जचा येणार शेवटचा सीझन




**मुंबई** : डफर ब्रदर्स यांच्या दिग्दर्शनाखाली तयार झालेली ही सीरीज २०२४च्या शेवटी चित्रिकरण पूर्ण करून पोस्ट-प्रोडक्शनसाठी गेली आहे. सीझन ५ हे सीरिजचा ग्रँड फिनाले ठरणार आहे. त्यामुळे यामध्ये भव्यदिव्य व्हिज्युअल्स, दमदार कथा आणि पात्रांची भावनिक गुंतवणूक पाहायला मिळेल. हा सीझन केवळ थरारक नाही तर अत्यंत भावनिक असेल. यामध्ये मैत्री, त्याग आणि परिपक्व होण्याच्या प्रवासाला अनोखे वळण मिळेल. हा शेवट चाहत्यांसाठी एक भेटवस्तूसारखा असेल, असे डफर ब्रदर्सनी सांगितले. ■

### स्पिरिट चित्रपटातून दीपिका बाहेर

**मुंबई** : दीपिका पादुकोण स्पिरिट चित्रपटात दिसणार होती, पण तिच्या वाढत्या डिमांडला कंटाळून दिग्दर्शक संदीप रेड्डी वांगाने मोठा निर्णय घेतला आहे. तिला स्पिरिट या चित्रपटातून हटवल्याची माहिती मिळत असून यामध्ये साऊथ स्टार प्रभासची मुख्य भूमिका आहे. संदीप यांचा स्पिरिट हा चित्रपट जगभरात प्रदर्शित होणार आहे. यापूर्वी दीपिका पदुकोण मुख्य भूमिकेत होती. पण अनप्रोफेशन डिमांड म्हणत दिग्दर्शकाने तिला या भूमिकेतून काढल्याचे म्हटले जात आहे. ■




# वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या तरुणीवर सामूहिक अत्याचार

## सांगलीतील घटना, तीन विद्यार्थ्यांना अटक

◆ **सांगली, २३ मे**

राज्यासह देशभरात महिलांवरील अत्याचाराच्या घटना दररोज घडत असून पुण्यातील वैष्णवी हगवणे आत्महत्त्या प्रकरण ताजे असताना सांगली येथे वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या युवतीवर अत्याचार करण्यात आल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी तीन विद्यार्थ्यांना अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार युवती ही एमबीबीएसच्या तिसऱ्या वर्गाला शिकत आहे. महाविद्यालयातील काही विद्यार्थ्यांसोबत तिची ओळख झाली आणि मैत्रीही झाली. तीन मित्रांनी तिला चित्रपट पाहण्यासाठी जाऊ, असे सांगितले. सर्वजण दुचाकीवरून वान्लेसवाडी येथे आले. चारही जण एका फ्लॅटवर आले. तिघांनी तिला शितपेयातून गुंगीचे औषध दिले. शुद्ध हरपल्यानंतर मित्रांनी अत्याचार केला. काही वेळाने युवती शुद्धीवर आली असता मित्रांनी केलेल्या प्रकारामुळे तिला चिड आली आणि थेट पोलिस ठाणे गाठले. विश्रामबाग पोलिसांनी तक्रार दाखल करून घेत तपासाला प्रारंभ केला आणि अवघ्या काही तासांमध्येच सर्व आरोपींना अटक करण्यात आली. पुणे, सोलापूर आणि सांगली येथील हे तिन्ने आरोपी आहेत. अटक करून न्यायालयासमोर उभे केले असता आरोपींना २७ तारखेपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. ◀(वृत्तसंस्था)

### युवकांनी दिली होती धमकी

अत्याचार केल्यानंतर झालेल्या प्रकाराची कुठेही वाच्यता न करण्याची धमकी आरोपींनी दिल्याचे युवतीने सांगितले. पण, धमकीला न घाबरता तिने पोलिस स्टेशन गाठत तक्रार दिली. आरोपी २० ते २२ वर्षे वयोगटातील आहेत, असे पोलिसांनी सांगितले. मूळ कर्नाटकातील बेळगाव येथील रहिवासी असलेल्या पीडितेने नंतर तिच्या पालकांना ही घटना सांगितली, त्यानंतर त्यांनी विश्रामबाग पोलिस ठाण्यात धाव घेतली.आरोपींवर सामूहिक बलात्कार आणि इतर आरोपांसाठी भारतीय न्याय संहिता कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ■

# राम दरबारचा ५ जूनला होणार प्राणप्रतिष्ठा सोहळा

◆ **अयोध्या, २३ मे**

२३ मे रोजी राम मंदिराच्या पहिल्या मजल्यावर राम दरबारची मूर्ती स्थापित करण्यात आली. ही मूर्ती जयपूरमध्ये तयार करण्यात आली. ती मकराना येथील पांढऱ्या संगमरवरापासून बनवलेली आहे. यामध्ये भगवान श्रीराम आणि सीता सिंहासनावर विराजमान आहेत. भरत आणि हनुमानजी भगवान श्रीरामांच्या पायाजवळ बसले आहेत.

लक्ष्मण आणि शत्रुघ्न भगवान रामाच्या मागे उभे आहेत. मूर्तीच्या स्थापनेची तयारी पूर्ण झाली आहे. राम दरबारचा प्राण प्रतिष्ठा सोहळा ३ ते ५ जून दरम्यान होणार आहे. हे छायाचित्र अयोध्येच्या कालेरम मंदिरात स्थापित केलेल्या राम दरबाराचे आहे. अयोध्येतील कालेरम मंदिरात काळ्या शालिग्रामच्या एकाच दगडावर जवळजवळ असाच राम दरबार बांधला आहे. रामलालाच्या दर्शनासाठी येणारे भक्त या राम दरबाराला नक्कीच भेट देतात. आता, राम मंदिरात राम दरबाराची मूर्ती स्थापित झाल्यानंतर, त्यांना राम दरबाराला भेट देण्यासाठी इतर कोणत्याही ठिकाणी जावे लागणार नाही.

मंदिर ५ जूनपर्यंत पूर्णपणे तयार होईल. राम दरबाराचा प्राणप्रतिष्ठा सोहळा ३ जूनपासून सुरू होईल. मुख्य कार्यक्रम ५ जून रोजी होणार आहे. या संकुलात इतर



सात मंदिरे देखील बांधण्यात आली आहेत आणि त्या मंदिरांसाठी धार्मिक विधी देखील त्याच वेळी केले जातील, असे श्रीराम मंदिर भवन निर्माण समितीचे अध्यक्ष नृपेंद्र मिश्रा म्हणाले.

**.कार्यक्रमाला कोणीही व्हीआयपीला नाही**

या कार्यक्रमात राज्य किंवा केंद्र सरकारच्या कोणत्याही व्हीआयपी व्यक्तीला आमंत्रित केले जाणार नाही. राज्य किंवा केंद्रातील प्रतिष्ठित व्यक्तींना पाहुण्यांच्या यादीत समाविष्ट केले जाणार नाही. कदाचित त्या समारंभात ते वेगवेगळ्या धर्मातील अनेक आध्यात्मिक नेत्यांना आमंत्रित केले जाण्याची शक्यता नाही. ५ जून रोजी होणाऱ्या समारंभाच्या एका आठवड्यात मंदिराचा नवीन भाग भाविकांसाठी खुला होण्याची अपेक्षा आहे. ◀(वृत्तसंस्था)

# अजंठा गुफेतील चित्रावरून बांधले आयएनएसव्ही कौंडिण्य

◆ **छत्रपती संभाजीनगर, २३ मे**

जगप्रसिद्ध अजंठा गुफेत चितारलेल्या पाचव्या शतकातील व्यापारी जहाजाच्या चित्रावरून भारतीय नौदलाने आयएनएसव्ही कौडिंण्य या जहाजाची निर्मिती केली आहे. या जहाजाचे शुक्रवारी कारवार येथील नौदल तळावर लोकार्पण करण्यात आले आहे. केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंह शेखावत कार्यक्रमाचे अध्यक्ष होते.

सागरावर हुकूमत गाजवणारे भारतीय खलाशी कौंडिण्य यांचे नाव या जहाजाला देण्यात आले. पाचव्या शतकातही जहाजांच्या मार्फत व्यापार सुरू असे. अशाच एका जहाजाचे चित्र अजंठा येथील १७ व्या क्रमांकावरील गुफेत कोरण्यात आले आहे. त्यामुळे आयएनएसव्ही कौडिंण्य हे या गुफेला समर्पित आहे. कौडिंण्य यांनी हिंदी महासागरावर कधीकाळी हुकूमत गाजविली आहे. त्यांनी हिंदी महासागराच्या माध्यमातून दक्षिण-पूर्व आशियाचा प्रवास केला आहे. गुफेत काढलेल्या चित्रावरून अगदी पाचव्या शतकातही भारताचा पाश्चिमात्य देशांसोबत व्यापार सुरू होता, हे सिद्ध होते, असे भारतीय पुरातत्व खात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

भारतीय इतिहासकार सायली-पलांडे दातार यांनी गुफेतील जहाजाचा संबंध पूर्णा अवधान कथेशी जोडला आहे. पूर्णा आणि भाविला हे दोन बंधू चंदन लाकडांचा व्यवसाय करीत होते. ते शूरपारका म्हणजेच आताचे मुंबईतील सोपारा येथील रहिवाशी होते. दोघेही उत्तम खलाशी होते. त्यांनी एकूण सहा सागरी मोहिमा पार पाडल्या. पुढे पूर्णा याने बौध्द धर्म स्वीकारला आणि सोपारा येथे स्थायिक झाला तर भाविलाने सातवी सागरी सफर केली. ◀(वृत्तसंस्था)

### पारंपरिक पद्धतीने बांधलेल्या जहाजाचे लोकार्पण



### अजिंठा येथे होते उपेंद्रगुप्तची सत्ता



ज्येष्ठ इतिहासकार वॉल्टर स्पिंक यांनी अजंठाः अ ब्रीफ हिस्ट्री ॲण्ड गाइड या पुस्तकात १७ व्या क्रमाकांच्या गुफेतील चित्राची माहिती दिली आहे. पाचव्या शतकातील अजंठा येथील राज्यकर्ता उपेंद्रगुप्त याच्या काळात गुफेत चित्र कोरण्यात आले. मात्र, अस्माक यांनी उपेंद्रगुप्तचा पराभव केला. परिणामी कोरीव काम अर्ध्यावरच थांबले, असेही पुस्तकात नमूद करण्यात आले आहे. ■

## अग्रलेख...

# सुगीची हंगामगाथा!

मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्याची सुरुवात झाली की मनाला नकळत एक अस्वस्थता जाणवू लागते. हा अनुभव प्रत्येकास येत असला, तरी त्या अस्वस्थतेचीही गेल्या काही दशकांत एवढी सवय झालेली असते की मानसिक अवस्थेतील या संथ बदलाची फारशी जाणीवपूर्वक दखलही घेतली जात नाही. उन्हाच्या काहिलीने हैराण झाल्यावर थंड वाऱ्याची एखादी झुळूक मनाला आणि शरीराला समाधानाचा अनुभव जेव्हा देते, तेव्हा अस्वस्थतेची ती जाणीव जागी होते. मे महिन्याच्या अखेरच्या आठवड्याच्या सुरुवातीलाच अशी एक दिलासादायक झुळूक मनाला सुखावून देणारी ठरली आहे. खरे म्हणजे, वर्षाकाठी येणाऱ्या प्रत्येक ऋतूने विक्रमाचा नवा उच्चांक करण्याचा जणू ध्यासच घेतला असावा असा अतिरेक सुरू केल्यापासून, ऋतुमानासोबत येणाऱ्या दिलाशाच्या आणि समाधानाच्या पातळीत काहीसा बदलही होऊ लागला आहेच आणि नव्याने दाखल होणाऱ्या ऋतूच्या अनुभवाचा आनंद घेण्याची मानसिक तयारी होत असताना, नव्या ऋतूत सारे काही ठाकठीक असेल ना, या शंकेचे सावटही मनामनावर दाटू लागले आहे. यंदाच्या भाजून काढणाऱ्या उन्हाळ्यापाठोपाठ येऊ घातलेल्या पावसाळ्याची रूपे कशी असतील, याची काळजी उमटू लागलेली असतानाच, मावळत्या उन्हाळ्याला निरोप देण्यासाठीच जणू आकाशात ढगांची रांगोळी उमटू लागली असून, उन्हाळ्याच्या हंगामाची अखेर पावसाच्या सरींनी होणार अशी चिन्हे दिसू लागल्याने, समाधानाच्या त्या संथ जाणिवादेखील जिवंत होऊ लागल्या आहेत आणि त्यातच नव्या हंगामाची सुचिन्हे स्पष्ट झाल्याने मौसमी पावसाच्या आगमनासोबत सुगीचे दिवसही सुरू होणार अशा सुवार्ताही येऊ लागल्या. राज्य सरकारने त्यावर शिक्कामोर्तबही केले आणि नवा सुगीचा हंगाम महाराष्ट्रासाठी पीकपाण्याची बरकत घेऊनच येणार असल्याची आनंदवार्ता सरकारनेच जाहीर केली. मावळत्या उन्हाळ्याच्या काहिलीवरील हा शीतल शिडकावा नव्या सुगीच्या हंगामाला आनंदाची झालर लावणारा ठरणार आहे.

गेल्या काही दशकांपासून हवामान बदलाच्या विचित्र बातम्यांनी जग धास्तावून गेले आहे. प्रत्येक ऋतूमध्ये हवामानाच्या अतिरेकी उच्चांकामुळे जीवसृष्टीच्या अस्तित्वावर नैसर्गिक आपत्तींचे सातत्यपूर्ण सावट दाटून राहिले आहे. जागतिक भाषेत ज्याला क्लायमेट चेंज असे म्हणतात, तो वातावरणातील बदल आता आपल्या अगदी उंबरठ्याशी येऊन ठेपला असून, तो जीवघेणा ठरू पाहात आहे. निसर्गाचे स्वतःचे काही नियम असतात. त्याचा ऋतुकाळ ठरलेला असतो. म्हणजे, त्या त्या ऋतूच्या काळातच हवामानातील अपेक्षित बदल घडत असतात. अलिकडे मानवनिर्मित कारणांमुळे त्याची तीव्रता कमीअधिक होत असते, पण तो दोष निसर्गाचा नसल्याने अशा वेळी निसर्ग सहसा तटस्थ राहात असतो. त्यामुळे, उन्हाळा हा नेमेचि येणाऱ्या पावसाळा, हिवाळ्यासारखाच एक नैमित्तिक हंगाम असूनही, त्याच्या चटक्यांची तीव्रता वाढताना निसर्ग त्यामध्ये ढवळाढवळ करत नाही. हवामानबदलाची जी चर्चा अलिकडे जगभर ऐकावयास येत असते, त्यास निसर्ग कारणीभूत नसून मानवाच्या अनिर्बंध वर्तणुकीचाच मोठा वाटा आहे, हे आता सिद्ध झालेले असल्याने, हवामान बदलाचे जे फटके माणसासह अन्य सजीवांना भोगावयास लागत आहेत, ते निसर्ग तटस्थपणे पाहात असतो. म्हणूनच सध्या उन्हाळ्याचे जीवघेणे फटके सोसावे लागत असताना, निसर्गास दोष देण्याची माणसाची हिंमत राहिलेली नाही. हा दोष आपलाच आहे आणि जे काही भोगावे लागत आहे त्यास आपणच कारणीभूत व जबाबदार आहोत याची जाणीव असल्याने परिणामांना सामोरे जाण्याखेरीज अन्य पर्याय राहिलेला नाही. म्हणूनच, जेव्हा आपल्याच एखाद्या कृतीने कोणतेही वातावरण तापते, हवामानात अचानक बदल होऊन सारे काही सैरभैर होऊ लागते, उपाय योजण्याच्या उद्देशाने करावयाच्या कृतीदेखील अंगाशी येण्याची भीती वाढू लागते, तेव्हा त्याचे थेट आणि अप्रत्यक्ष परिणाम सर्वसामान्यांस किंवा ज्यांचा त्या कृतीशी दुरूनही संबंध नाही अशांनाही भोगावेच लागतात. अनेकदा तर अशा तापलेल्या वातावरणामुळे निष्पापांची आखीव जीवनशैलीही नको असताना विस्कटून जाते आणि बाहेर काय घडणार या चिंतेचे सावट मनामनावर पसरते. सध्याच्या उन्हाळ्यात हेच दिसून आले. अशा तापलेल्या हवामानात घराबाहेर पडणेदेखील कठीण होऊन जाते. हवेत विहरणारे पक्षीदेखील, उन्हाच्या तप्त झळांनी घायाळ होऊन अचानक जमिनीवर कोसळतात आणि अखेरचा श्वास घेतात. माणसांची अवस्थाही बिकट होते. अनपेक्षितपणे बदललेल्या अशा हवामानात आपण नेमके कसे वागले पाहिजे हेच समजेनासे होते आणि अवघा समाज भेदरल्यागत होऊन जातो. या झळा कोणत्या कारणामुळे एवढ्या तीव्र झाल्या हेच समजेनासे होऊन संभ्रमावस्था वाढते आणि मन ताळ्यावर राहात नाही.

निसर्गतः निर्माण होणाऱ्या उन्हाळ्याच्या काहिलीस आरोग्य विभागाने हळुवार येणारी आपत्ती (सायलेंट डिझास्टर) असे नाव दिले आहे. म्हणूनच, आता पुरे झाल्या झळा, अशी मनाची अवस्था होते आणि दुखऱ्या जखमेवर एखादी हळुवार फुंकर बसावी आणि मनाला दिलासा मिळावा असे काही घडले की आश्वस्त भावना जागी होऊन आसपासच्या उन्हाळ्याच्या आणि समस्यांच्याही झळा सुसह्य वाटू लागतात. गेल्या बुधवारी अशीच एक हळुवार फुंकर राज्य सरकारच्या बैठकीनंतर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पसरली. यंदाचा पावसाळा सुसह्य तर आहेच, पण राज्यातील काळ्या आईला तृप्त करून सोडणारा व पीकपाण्याच्या दृष्टीने बळीराजाला सुगीचे व सुखाचे दिवस दाखविणारा असेल, असा दिलासा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राला दिला आहे. हवामान खात्याच्या सध्याच्या अंदाजानुसार, राज्यात सर्वत्र सरासरीहूनही अधिक पाऊस पडणार असल्याने अन्नधान्याचे विक्रमी उत्पादन होईल असा अंदाज कृषी विभागाने वर्तविला आहे. या हंगामात १४५ लाख हेक्टरवर पेरणीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून, एवढ्या क्षेत्रावरील पेरण्यांसाठी आवश्यक असलेल्या दर्जेदार बियाणांच्या पुरवठ्याची हमीदेखील सरकारने शेतकऱ्यांस दिली आहे. राज्यात यंदाच्या हंगामात १९.१५ लाख क्विंटल बियाणांची गरज असेल, तर राज्याकडे २५ लाख क्विंटलहून अधिक बियाणांचा साठा उपलब्ध असल्याने बियाणांच्या टंचाईचा शेतकऱ्यांस नेहमी छळणारा प्रश्न सरकारने निकाली काढला आहे. यामुळे यंदाच्या खरीप हंगामात २०४ लाख टन अन्नधान्य महाराष्ट्रात पिकेल, असा अंदाज आहे. केवळ पाऊस चांगला पडला म्हणजे सारे काही छान होते, हा समज आता जुना झाला. गेल्या काही हंगामांतही काळी आई शेतकऱ्यांच्या पदरात त्यांच्या घामाचा पुरेपूर मोबदला टाकण्यासाठी सज्ज झाली होती. पण खराब दर्जाचे बियाणे, खतांची टंचाई, काळाबाजार अशा अनेक समस्यांनी शेतकऱ्यांच्या अपेक्षांवरच पाणी फेरले. अनेक संकटांशी संघर्ष करत शेती हा व्यवसाय आव्हान म्हणून पेलणाऱ्या बळीराजाची उमेद अशा संकटांत खच्ची होत असते. राज्य सरकारने यंदा मात्र या संकटांचा सामना करण्यासाठी शेतकऱ्याच्या खांद्याला खांदा लावून सज्ज राहण्याची तयारी चालविली आहे. राज्याला खरीप हंगामात ४५ लाख टन रासायनिक खतांची गरज असते. यंदा केंद्र सरकारनेच सुमारे ४७ लाख टन खतांचा साठा महाराष्ट्रासाठी मंजूर केला आहे, त्यामुळे आता गरजेच्या वेळी तो शेतकऱ्यापर्यंत पोहोचविण्याचे आव्हान राज्य सरकारला पेलावे लागेल. गेल्या चारपाच महिन्यांत नैसर्गिक आपत्तींमुळे राज्याच्या विविध भागांत जवळपास ५५ हजार हेक्टर शेतमिनीचे क्षेत्र बाधित झाले. याच कालावधीत संकटांचा सामना करताना अनेक शेतकऱ्यांनी हिंमत सोडली आणि जवळपास एक हजार शेतकऱ्यांनी आत्महत्येचे टोकाचे पाऊल उचलले. विधिमंडळातील विरोधी पक्षांनी याच मुद्याकडे सरकारचे लक्ष वेधले असून, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याकरिता सरकारला साद घातली आहे. यंदाच्या पावसाळ्यातील सुगीच्या हंगामावर अशा संकटांचे सावट राहू नये यासाठी सरकारने खबरदारीच्या उपाययोजना आखल्या आहेत. नव्या सुगीच्या हंगामाची ही आनंदगाथा बळीराजास आणि संपूर्ण राज्यालाच सुखावणारी ठरेल, अशी चिन्हे सध्या तरी दिसू लागली आहेत.

## प्रासंगिक

- वेद कुमार

# वेल-डन महाराष्ट्र

**महाराष्ट्रात एकूण २६६८६ स्टार्टअप्स कार्यरत असून ही संख्या देशातील एकूण स्टार्टअप्सच्या २४ टक्के आहे. महाराष्ट्र भारताचे स्टार्टअप्स-कॅपिटल आहे.**

स्टार्टअप्सच्या माध्यमातून देशातील तरुण उद्योजक भारताच्या आर्थिक स्वावलंबनाचे स्वप्न साकार करत आहेत. स्टार्ट-अप्स च्या माध्यमातून मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भर भारत या संकल्पनांना बळकटी देण्यात महाराष्ट्राचा सिंहाचा वाटा आहे. राज्य सरकारने 'महाराष्ट्र स्टार्टअप वीक', 'मुंबई फिनटेक हब', 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना' यांसारखे महत्त्वाचे उपक्रम राबवले आहेत. या उपक्रमांमुळे राज्यातील नवउद्योजकांना आर्थिक सहाय्य, मार्गदर्शन आणि विकासाच्या संधी मिळाल्या आहेत.

केवळ मुंबईतील स्टार्टअप्सनी यावर्षी एकूण ३.७ अब्ज निधी उभारला आहे, ज्यामध्ये मागील वर्षाच्या तुलनेत १५४ टक्के वाढ झाली आहे. हे यश राज्य सरकारच्या प्रोत्साहनपर धोरणांमुळेच शक्य झाले आहे. पुणे हे माहिती तंत्रज्ञान, ऑटोमोटिव्ह आणि जैवतंत्रज्ञान या क्षेत्रांतील स्टार्ट-अप्स मध्ये देशात एक नंबर वर आहे. नवी मुंबईत ३०० एकर क्षेत्रावर विकसित होणारी अत्याधुनिक 'इनोव्हेशन सिटी' ही राज्य सरकारच्या स्टार्टअप्स विषयी असलेल्या महत्त्वाकांक्षी दृष्टिकोनातून निर्माण होत आहे.

स्टार्टअप इकोसिस्टिम देशासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे कारण ते रोजगार निर्मिती करते, आर्थिक प्रगतीला चालना देते, नवसंकल्पना साकारण्यास मदत करते आणि भारताला जागतिक स्तरावर एक बलाढ्य राष्ट्र म्हणून सिद्ध करते. भारतामध्ये ११९ युनिकॉर्न स्टार्टअप्स आहेत. युनिकॉर्न म्हणजे असे स्टार्टअप ज्यांचे व्हॅल्यूएशन १ अब्ज पेक्षा अधिक आहे. हे युनिकॉर्न्स फिनटेक, ई-कॉमर्स, लॉजिस्टिक्स आणि एंटरप्राइज टेक्नॉलॉजी यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत आहेत. यापैकी तब्बल २७ युनिकॉर्न्स एकट्या महाराष्ट्रात आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या यशस्वी नेतृत्वात महाराष्ट्राची या क्षेत्रात सुरू असलेली ही अभूतपूर्व घोडदौड संपूर्ण देशाच्या प्रगतीचा मार्ग प्रशस्त करत आहे आणि भविष्यातील एक सामर्थ्यवान, उर्जावान भारताची पायाभरणी करत आहे. भविष्यातील अंबानी, अदानी, मूर्ती, महिंद्र, प्रेमजी, मित्तल, जिंदाल इकडूनच येणार आहेत. त्या सर्वांना माझ्या भरभरून शुभेच्छा.

**जय हिंद, जय महाराष्ट्र.**



## वेध

हेमंत सालोडकर

# भारत होणार क्रीडा-पंढरी

भारतात सध्या क्रीडा स्पर्धांचा ज्वर आहे. ग्रामीण भागात आणि शहरात कोणती तरी स्पर्धा सुरूच आहे. या स्पर्धांतून तळागाळातील खेळाडूंचे सुप्त गुण उजागर होतात आणि त्या गावाचा आणि शहराचा नावलौकिक होतो. याच खेळाडूंमधून पुढे आलेले निवडक खेळाडू आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे नाव मोठे करतात. आता तर केंद्र सरकारही खेळाडूंना प्रत्येक प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून देत आहे. त्यामुळे खेळाडूंचा आत्मविश्वास दुणावला आहे आणि तेही निरनिराळ्या स्पर्धांमध्ये भाग घेत आहेत. सोबत नागरिकांचाही खेळाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. पहिले केवळ शैक्षणिक पात्रतेवरून मुलांच्या हुशारीचा कस लागायचा. नोकरीतही शैक्षणिक पात्रता किती आहे, हे तपासले जात होते. पण काळ बदलला. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रीडाला महत्त्व आले. त्यातून खेळाडूचा आणि त्याच्या कुटुंबाचा आर्थिक विकास होत गेल्याने क्रीडा क्षेत्राकडे पाहण्याचा सर्वांचा दृष्टिकोन बदलला. आता शिक्षणासोबतच इतरही उपक्रमांत विद्यार्थी किती जागरूक आहे, तो कोणता खेळ खेळतो, त्याच्यावर परीक्षेत गुण मिळत असल्यामुळे विद्यार्थ्यांचा ओढा खेळाकडे वाढला आहे. अशा विद्यार्थ्यांच्या गुणांना हेरून त्यांना ग्रामीण भागात विविध स्पर्धांमध्ये भाग घ्यायला लावून, विविध प्रकारची आकर्षक बक्षिसे देऊन त्यांच्यात खेळाबाबत रुची निर्माण करण्यात येत आहे. जेणेकरून हे विद्यार्थी ग्रामीण भागातून निघून थेट ऑलिम्पिकपर्यंतच्या स्पर्धांमध्ये भाग घेऊ शकतील. त्या प्रकारची त्यांची मानसिकता, शिक्षण, खेळाकडे पाहण्याचा त्यांचा, त्यांच्या घरच्यांचा दृष्टिकोन बदलण्याचा प्रयत्न होत आहे. याचाच भाग म्हणून आता ग्रामीण भागात स्वदेशी खेळासोबत आंतरराष्ट्रीय स्पर्धाही होत आहेत. त्याच स्पर्धा भव्य प्रमाणात शहरात होत असल्याने ग्रामीण भागातील खेळाडू, अगदी आदिवासी भागातील मुलेही त्यात भाग घेत आहेत आणि बक्षिसांची लयलूट करून स्वतःचा आणि ते राहतात त्या भागाच्या विकासात महत्त्वाचे योगदान देत आहेत.

अशा मुलांना किंवा मुलींना हेरून त्यांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भाग घेण्यास प्रोत्साहन देण्यात येत आहे. काही मुले कौशल्य असूनही घरच्या हलाखीच्या परिस्थितीमुळे मोठ्या स्पर्धांमध्ये भाग घेऊ शकत नाहीत आणि त्यांचे कौशल्य त्यांच्यासोबत दबून जाते. अशी कितीतरी मुले-मुली मागे राहिले आणि त्यामुळे देशाच्या क्रीडा विकासाला खीळ बसली. २०२४ च्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताने १ रौप्य आणि ५ कांस्य अशी एकूण सहा पदके मिळवली. नेमबाज मनू भाकरने ऑलिम्पिकच्या एकाच हंगामात दोन पदके जिंकून पहिली भारतीय बनून इतिहास घडवला. असे कितीतरी हिरे देशाच्या प्रत्येक शहरात आहेत. त्यांच्या गुणांना पैलू पाडून त्यांचा आणि देशाचा विकास करता येऊ शकतो. पण आता अशा मुलांसाठी सरकारसह काही संस्था-संघटनाही पुढे येऊन मदत करीत आहेत. देशाची ऑलिम्पिक पदकांची संख्या वाढविण्यासाठी, क्रीडा मंत्रालयाने कॉर्पोरेट जगत आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांना खेळांशी जोडण्यासाठी पुढाकार घेतला आहे. याअंतर्गत मंत्रालयाने देशातील आघाडीची कॉर्पोरेट घराणी आणि सार्वजनिक उपक्रमांसोबत एक आभासी बैठक घेतली. या बैठकीत बीसीसीआयसह ५० हून अधिक संस्थांनी भाग घेतला. बैठकीत क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी नॅशनल फर्टिलायझर्स लिमिटेड, कोल इंडिया आणि बीसीसीआयसह इतर प्रतिनिधींना खेळाडूंच्या प्रशिक्षण, पोषण आणि प्रशिक्षणाची जबाबदारी घेण्याची विनंती केली आणि मंत्राच्या विनंतीला सर्व कंपन्यांनी तत्त्वतः सहकार्य करण्यास सहमती दर्शविली आहे. बीसीसीआयने तर तीन खेळ स्वीकारण्याची इच्छा व्यक्त केली. क्रीडा मंत्रालयाने सर्वांना या संदर्भात ठोस योजना मागितली आहे. प्रस्तावित योजनेनुसार, कंपन्या निवडलेल्या खेळांसाठी प्रशिक्षण, पोषण आणि प्रशिक्षणाची व्यवस्था करतील. या प्रक्रियेवर देखरेख करण्यासाठी मंत्रालय आणि संबंधित राष्ट्रीय क्रीडा महासंघांच्या प्रतिनिधींचा समावेश असलेली एक देखरेख समितीदेखील असेल. या संघटनांनी आर्थिक मदत केली तरी सरकारही आपल्या वतीने मदत करणारच आहे. सरकारी निधी सुरूच राहणार आहे. काही ठिकाणी या संस्थांमार्फत शिबिरेही होणार आहेत. यातून लॉस एंजेलिस येथे होणाऱ्या ऑलिम्पिकची तयारी चांगल्या प्रकारे करता येईल. त्यासाठी आतापासूनच राष्ट्रीय स्तरावर मोठ्या प्रमाणात स्पर्धा सुरू आहेत. येत्या काही वर्षांत भारतात विदेशातील खेळाडू प्रशिक्षणासाठी येतील. म्हणजे भारत भविष्यात क्रीडा-पंढरी म्हणून उदयास येईल, हे नक्की.

९८५०७५३२८१

## मुंबई वार्तापत्र

नागेश दाचेवार

# चोराच्या उलट्या बोंबा?

अखंड शिवसेनेतील तीनचर्तुथांश सदस्य जेव्हा उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाला लाथ मारून निघून जातात, तेव्हा त्या लोकांना गद्दार आणि भ्रष्टाचारी असल्याचे उबाठा गटाकडून सांगितले जाते. हेच ते लोक होते जे उद्धव ठाकरेंच्या कॅबिनेटमध्ये होते. आता महायुतीत आहेत. त्यामुळे हे सगळे ठाकरेंचे शिलेदार जर चोर, उचक्के असतील तर ते तिकडेही होते आणि आता इकडेही आहेत असेच उबाठा गटाच्या वक्तव्यातून उद्धृत होते. त्यामुळे राज्यातील आजच्या या राजकीय परिस्थितीकडे बघितल्यास राहत इंदोरी यांचा हा शेर आठवल्याशिवाय राहत नाही.

**"बन के इक हादसा बाज़ार में आ जाएगा**
**जो नहीं होगा वो अखबार में आ जाएगा...**
**चोर उचक्कों की करो कद्र, क्या मालूम**
**कौन, कब, कौन सी सरकार में आ जाएगा..."**

शिवसेनेचे प्रमुख एकनाथ शिंदे यांच्या सोबत गेलेले सर्व नेते हे उद्धव ठाकरेंसोबत काम करत होते. बरं एक दोन वर्षांपासून काम करत आहेत अशातला भाग नाही. तर, बाळसाहेबांसोबत ३०-४० वर्षांपासून काम करत असलेले हे सगळे नेते आहेत. ज्यांनी आपले रक्त सांडवून, घाम गाळून शिवसेना उभी केली. हां त्यांची चूक एवढीच झाली की त्यांनी उद्धव ठाकरेंच्या हिटलरशाहीविरोधात आवाज उठवून त्यांच्या विरोधात उठाव केला आणि ठाकरेंना अस्मान दाखवले. अशा या सगळ्याच व्यक्ती उद्धव ठाकरेंना सोडल्याबरोबर एका रात्रीतून भ्रष्टाचारी झाल्या. मुळात भाजपात आल्याआल्या ते भ्रष्टाचारी झाले असे उबाठा गटाला किंवा उबाठाचे प्रवक्ते संजय राऊतांना म्हणायचे असेल तर, यापेक्षा बाळबोध गोष्ट दुसरी कोणती असू शकत नाही.

धुळ्याच्या विश्रामगृहात कोट्यवधी रुपये सापडले. हे अर्जुन खोतकरांचे भ्रष्टाचारातून कमावलेले असल्याचा आरोप संजय राऊत करीत आहेत. राऊत केवळ आरोप करून मोकळे झालेले नाहीत तर, खोतकरांचा पूर्वेतिहासच भ्रष्टाचाराचा असल्याचे ते म्हणत आहेत. यावरून एक गोष्ट तर राऊतांनी जाहीरपणे कबूल केली की, त्यांच्या पक्षातले अधिकाधिक लोक भ्रष्ट आहेत आणि त्यांचा पूर्वेतिहासच भ्रष्टाचाराचा आहे. फक्त पक्षात असले तर, त्यांना आम्ही पाठीशी घालतो आणि सोडून गेला की दुसऱ्याच सेकंदाला त्याला भ्रष्ट जाहीर करतो. बरं यावेळी खोतकरांवर भ्रष्टाचाराचे आरोप करणारे राऊत तर, स्वतः पत्राचाळ



घोटाळ्यातले १०० दिवसांचा तुरुंगवास भोगून, सध्या जामिनावर बाहेर असलेले एक आरोपी आहेत. राऊतांच्या पत्नीने बँक घोटाळ्यातील आरोपीच्या पत्नीकडून ८० लाख रुपये घेतले. हा देखील त्यांच्या पत्नीद्वारे केलेला एक भ्रष्टाचारच आहेत. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांच्या नेतृत्वात गृहमंत्री १०० कोटी रुपयाची खंडणी गोळा करतो, ठाकरेंचा प्रवक्ता पोलिस दलात रुजू होऊन ही खंडणी गोळा करण्यास मदत करतो, खंडणी प्रकरण उजागर होऊ नये म्हणून एका सामान्य माणसाची निर्घृण हत्या करतो, त्याला पाठीशी घालण्याचं काम ठाकरे करतात... असे लोक आता दुसऱ्यावर भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आघाडीवर दिसत आहेत. मुळात संजय राऊतसारख्या जामिनावर असलेल्या गुन्हेगाराने एखाद्याचं नैतिक मूल्यमापन करणं हास्यास्पदच म्हणावं लागेल. शिवाय एका आर्थिक फसवणूक आणि लबाडी प्रकरणात गुन्हेगार असलेल्याने दुसऱ्याला भ्रष्ट संबोधणे म्हणजे, याला चोराच्या उलट्या बोंबाच म्हणावं लागेल.

### फडणवीसांच्या विकासपर्वात खोडा

महायुतीचे सरकार स्थापन झाल्यानंतर मंत्रिमंडळ विस्तार बराच काळ लांबला होता. त्याचं मुख्य कारण मंत्रिमंडळात स्वच्छ व पारदर्शक अशी छवी असलेल्यांची निवड करणे हे होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची यावेळी मोठी तारेवरची कसरत झाली होती. गाळणी लावून छाननी करण्याचा पुरेपूर प्रयत्न झाला. येथे पुरेपूर प्रयत्न म्हणण्याचं कारण म्हणजे, भाजपाचे केंद्रीय स्तरावरील शीर्ष नेतृत्व आणि राज्यातील शीर्ष नेतृत्वाने आपल्या पूर्ण शक्तिनिशी स्वच्छ प्रतिमेचे चेहरे मंत्रिमंडळात असावे यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. मात्र, तरीदेखील मित्रपक्षांतील काही चेहऱ्यांमुळे या प्रयत्नात पूर्ण यश भाजपाला, देवेंद्र फडणवीसांना आलेले नाही. कारण नुकतेच घडलेले शिवसेनेचे नेते अर्जुन खोतकरांच कोट्यवधींचे रोकड प्रकरण, मागील धनंजय मुंडे प्रकरण, छगन भुजबळ प्रकरण, हसन मुश्रीफ भ्रष्टाचार प्रकरण, या सगळ्या प्रकरणांमुळे हे सिद्ध होते. त्यात अजून मृद आणि जलसंधारण विभागात पैसे घेऊन नियुक्त्या केल्याचा आरोप आधीच डागाळलेले मंत्री संजय राठोड यांच्यावर लागला आहे. या अशा लोकांमुळे स्वच्छ प्रतिमेच्या आग्रहाला थोडा ब्रेक लागला असे म्हणता येईल. मुळात देवेंद्र फडणवीस तब्बल ५ वर्षे राज्याचे मुख्यमंत्री, गृहमंत्री राहिले. आता ते पुन्हा सहा महिन्यांपासून मुख्यमंत्री आणि गृहमंत्री आहेत. पण त्यांच्या पांढऱ्या शर्टावर एक शिंतोडासुद्धा उडाला नाही. किंबहुना जोरजबरदस्ती विरोधकांकडून उडविण्याचा एकदोन वेळा प्रयत्न झाला. मात्र, फडणवीसांच्या पारदर्शक छवीमुळे तो यशस्वी होऊ शकला नाही.

भ्रष्टाचारावर झीरो टॉलरेन्स नीती असलेले, स्वच्छ आणि पारदर्शक काम करण्याचा शंभर टक्के प्रयत्न करणारे देवेंद्र फडणवीस मात्र या अशा प्रकरणांमुळे वेळोवेळी अडचणीत येताना दिसत आहेत. आणि बहुतांश वेळा मित्रपक्षांच्या नेत्यांनीच त्यांना अडचणीत आणल्याचे अनेक उदाहरणांवरून दिसते. महाविकास आघाडी सरकारच्या काळात तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी स्थगिती सम्राट बनून राज्याच्या विकासाला ब्रेक लावल्यामुळे मागे गेलेल्या राज्याच्या विकासाची जोरदार घौडदौड सुरू झाली आहे. देशाच्या आर्थिक विकासात हातभार लावण्यासह राज्यात पायाभूत सुविधा उभारणे, उद्योग उभारणे, विदेशी गुंतवणूक आणून त्या माध्यमातून रोजगार निर्मिती करणे असे एक नव्हे अनेक विषयांचे शिवधनुष्य फडणवीसांनी उचलले आहे. मात्र, त्यात अशा प्रकारची प्रकरणे समोर येत गेली की शेवटी व्यक्ती आहे, लक्ष्य विचलित होणारच, भकरटणारच आणि मग त्यामुळे पुन्हा राज्याच्याच विकासाला खीळ बसण्यास ते कारणीभूत ठरेल. त्यामुळे मित्रपक्षांच्या नेतृत्वाने आणि त्यांच्या सहकाऱ्यांनीदेखील याची तमा बाळगण्याची गरज आहे.

९२७०३३३८८६

### वाघ आणि प्राणिरहित जंगल

पूर्व विदर्भात दररोज वाघ हा मानवाला लक्ष्य करीत आहे. हे भयाण वास्तव शासनाच्या नाकर्तेपणावर बोट ठेवणारे आहे. वाघ, वाघाडे, वाघमारे आणि माणूसमारे ही आडनावे धारण करणारे लोकही याच भूमीत आहेत. वाघावर बसलेल्या दुर्गादेवीची पूजा करणाऱ्या समाजाची इतकी दुरवस्था का व्हावी? कारण वाघ मांसाहारी आहे आणि त्याचे भक्ष्य जंगलात नसणे हे एक कारण असू शकते. पशुसंवर्धन खात्याने मांसाहारी लोकांकरिता संकरित कोंबड्या (ब्रायलर, पॅरोट कडकनाथ ) उपलब्ध केल्या तशा संकरित हरणी, सांबर, चितळ व डुकरे वाघाकरिता उपलब्ध करून दिल्या असत्या तर वाघाची भूक शमवण्यासाठी हा प्रामाणिक प्रयत्न झाला असता! यावर पशुवैद्यकीय शास्त्रज्ञ विद्यापीठात काहीतरी पर्याय शोधतील हा एक आशावाद! पूर्वी सर्कशीतील वाघांसाठी वृद्ध बैलांना (गाई नाही ) मारून त्याचे मांस वाघांना देण्यात येत होते. आता लोकांना खाण्याकरिता कत्तलीसाठी शेकडो गोधन पकडले जात आहे आणि न्यायालयात शेकडो प्रकरणे प्रलंबित आहेत (यावर एक कारणमीमांसा बनविणे गरजेचे आहे). माणसाच्या मांसाहाराकरिता ही उठाठेव न करता मांसाहारी वाघाकरिता जंगले प्राण्यांनी गजबजलेली ठेवल्यास वाघ आदमखोर बनणार नाही!



**वि. ल. उईके**/८२७५५२८०१६

### दहावीनंतर विचारपूर्वक पुढचा निर्णय घ्या

नुकताच दहावीचा निकाल लागला आहे. सर्व विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना आता पुढे काय करायच हा एकच प्रश्न पडलेला आहे. लागलेला निकाल अपेक्षेप्रमाणे असेल किंवा नसेल अशा दोन्ही परिस्थितींमध्ये योग्य निर्णय घेणे आणि भविष्यासाठी योग्य अभ्यासक्रम निवडणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. विद्यार्थी मित्रांनो, दहावी म्हणजे तुमच्या भविष्याच्या मार्गावरील एक वळण आहे. इथूनच तुमच्या पुढील करीअरची दिशा ठरते. त्यामुळे निकाल लागल्यावर आता पुढे काय करायचे, यासाठी काही बाबींवर लक्ष दिल्यास नक्कीच त्याचा फायदा होईल. निकाल हा तुमच्या मेहनतीचं प्रतिबिंब असतो. नेहमी एक गोष्ट लक्षात ठेवा, या परीक्षांचे गुण तुमचे भवितव्य ठरवत नाहीत. तुमचे या परीक्षेतील गुण तुमचं अंतिम मूल्यांकन करत नाहीत. त्यामुळे निकाल जसा असेल तसा स्वीकारा. तुमच्या आवडी निवडी, स्वप्न आणि क्षमतांचा विचार करून पुढची दिशा ठरवा. इतर काय म्हणतात त्याऐवजी तुम्हाला काय करायचं आहे हे स्वतःला विचारा. अभ्यासक्रम निवडण्याच्या आधी सर्वांत पहिले स्वतःच्या आवडी निवडी ओळखा. तुम्हाला काय आवडतं, तुमचा रस कशात आहे हे ठळकपणे आपल्या घरच्यांसमोर मांडा. अनेकदा विद्यार्थ्याला शालांत परीक्षेत चांगले गुण असून व त्याच्यात अनेक क्षमता असून देखील केवळ घरची परिस्थिती बेताची असल्यामुळे किंवा मार्गदर्शन न मिळाल्यामुळे मनासारख्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेता येत नाही. अशावेळी विद्यार्थी घरच्यांना आणखी आर्थिक संकटात टाकू शकत नाही. यापेक्षा कमी कालावधीचे डिप्लोमा किंवा कौशल्यपूर्ण व्यावसायिक शिक्षण घेऊन असे विद्यार्थी आधी स्वतःची व घरची परिस्थिती चांगली करू शकतात व पुढील शिक्षण ते त्यानंतरही पूर्ण करू शकतात. तुमच्यात असलेले कौशल्य, उपजत गुण व तुमच्यात असलेल्या क्षमतांना जास्तीत जास्त वाव कोणत्या अभ्यासक्रमात मिळू शकतो याचा शोध घ्या. बारावीनंतर खऱ्या अर्थाने पुढील शिक्षणाचे अनेक पर्याय खुले होतात. अनेक स्किल बेस डिप्लोमा व डिग्रींचा यामध्ये समावेश आहे. परंतु आयुष्यात यशस्वी होण्यासाठी नुसती डिग्रीच आवश्यक नाही तर तुम्हाला त्यासोबतच एखादं विशिट असं स्किल देखील स्वतःमध्ये डेव्हलप करावी लागते. आजच्या प्रगत काळात स्वतःतील स्किल डेव्हलप केल्याशिवाय पर्याय नाही. तुमचं यश हे तुमचे प्रयत्न आणि दृढनिश्चयावर अवलंबून आहे. आपण घेतलेले निर्णय चुकले तर स्वतःवर टीका करू नका. चुकीतून शिकून पुन्हा प्रयत्न करा, तुम्ही नक्कीच यशस्वी व्हाल.

**सुमेघ रामचंद्र वानरे**/९१३००२१३८७

## वाचक पत्रे

### सत्पात्री दानाचे महत्त्व!

दान हा शब्द कानावर पडताच, कुणातरी गरजू व्यक्तीला मदतीच्या रूपाने काहीतरी देण्याचे चित्र डोळ्यासमोर येते. हे दान वेगवेगळ्या स्वरूपात असते. जसे की अन्नदान, वस्त्रदान, आर्थिक दान, रक्तदान इत्यादी. हिंदू धर्मात त्यागाला विशेष महत्त्व आहे. धनाचा त्याग म्हणजेच सत्कार्यासाठी धन देणे! आपण जे अर्पण किंवा दान करतो, त्याचे फळ आपल्याला दहापटीने मिळते, असे शास्त्र सांगते. तेव्हा आपण भगवंतासाठी म्हणजेच ईश्वरी कार्यासाठी अर्पण केले, तर त्याचा आध्यत्मिक दृष्टीने मोठा लाभ होतो.



म्हणूनच दान हे नेहमी 'सत्पात्री' असावे, असे म्हटले आहे. तेव्हा अशा संस्था ज्या समाजात अध्यात्म प्रसाराचे कार्य करतात, दान स्वरूपात मिळालेल्या धनाचा उपयोग ईश्वरी कार्यासाठी करतात, अशा संस्थांना दान केल्याने ते निश्चितच 'सत्पात्री' दान असेल असे वाटते.

**वर्षा आवदे**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्वाचे...

### ॲनिमल राहत मदतीने बचावले श्वानाचे प्राण

**सोलापूर, दि. २३ मे-**

खाण्याच्या आमिषाने एका श्वानाच्या तोंडात हाडूक अडकले सुटकेसाठी त्याचे धडपड सुरू असताना तेथील काही स्थानिक नागरिक क्षणाचाही विलंब न करता मदतीसाठी ॲनिमल राहत कॉल कळवले. क्षणाचा विलंब न करता आणि अनिमल राहत टीम मदतीला धावले बेशुद्ध करून श्वानाच्या तोंडातून हाडूक बाहेर काढला.



गुरुवारी सायंकाळी नऊच्या सुमारास माधवनगर ७० फूट रोड परिसरात ही घटना घडली. श्वानाच्या तोंडात हाडूक अडकल्याने ते काढण्याचा घालमेल सुरू असताना त्याची अवस्था पाहून काही स्थानिक नागरिकाने अनिमल राहत टीमचे डॉ. आकाश जाधव खबर दिले असता. ॲनिमल राहातचा टीमच्या सदस्य महेश क्षीरसागर माधव नगर परिसरात पोहोचले श्वान फ्रेंडली असल्याकारणाने श्वानला बेशुद्ध करून तोंडात पाहिले असता हाडूक दिसले. अलगदपणे त्याच्या तोंडातून हाडूक बाहेर काढले. योग्य ते उपचार करून परत त्या ठिकाणी सोडले.

# लाड कमिटी अंतर्गत पालिकेने केली ४८ जणांची नियुक्ती

### आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी काढले आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मे-**

शासनाने दिलेल्या निर्देशानुसार सोलापूर महापालिका प्रशासनाने महापालिकेतील कर्मचाऱ्यांच्या वारसदारांकडून आलेल्या अर्जांमधून लाड - पागे कमिटी वारसा हक्क अंतर्गत ४८ जणांना नियुक्तीचे आदेश देण्यात आले आहेत. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी हे आदेश काढले आहेत.

महापालिकेकडून यापूर्वी लाड - पागे कमिटी अंतर्गत एकूण ३१५ कर्मचाऱ्यांच्या वारसांना नियुक्ती पत्र दिली आणि अनुकंपा तत्वाखाली ८४ जणांना नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले आहेत. आजचे ४८ मिळून असे एकूण आतापर्यंत लाड कमिटी अंतर्गत ३६३ जणांना नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत. तर शैक्षणिक पात्रतेप्रमाणे आज दोघांना नियुक्ती देण्यात आली आहे.संबंधितांना त्या त्या विभागात नियुक्त करण्यात आले आहे. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी हे आदेश काढले आहेत. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या नियंत्रणाखाली सामान्य प्रशासन विभागाचे अधीक्षक रजाक पेंढारी यांच्या माध्यमातून या विभागाने या नियुक्तीसाठीची प्रक्रिया नेटक्या पद्धतीने राबवली. दि. २२ मे २०२५ पासून दोन वर्षाच्या परीविक्षा कालावधी करिता अटी व शर्तीस अधीन राहून महापालिकेतील संबंधित कार्यालयाकडे या कर्मचाऱ्यांना नियुक्त करण्यात येत असल्याचे आदेशात म्हटले आहे. आज एकूण ४८ वारसांना हे नियुक्ती आदेश देण्यात आले आहे. यामध्ये झाडूवाला १४, बिगारी २३, सफाई कामगार १० आणि शिपाई एक, कनिष्ठ अभियंता सहाय्यक १ आहेत. घनकचरा व्यवस्थापन विभागात झाडूवाला, झाडूवाली आणि बिगारी यांना नियुक्त करण्यात आले आहे.

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या हस्ते नियुक्ती आदेश देण्यात आले. यावेळी अतिरिक्त आयुक्त रवी पवार, सहायक आयुक्त शशिकांत भोसले, अधीक्षक रजाक पेंढारी , वरिष्ठ लिपिक उमेशकुमार मोरे, लिपिक जगन्नाथ केलूरकर, रविराज कोमोलु आदी उपस्थित होते.



#### शैक्षणिक पात्रतेनुसार दिल्या नियुक्त्या

या प्रक्रियेत प्राधान्याने वारसांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार महापालिकेतील विविध विभागात अनुषंगिक पदावर त्यांना नियुक्त करण्यात आले आहे. शैक्षणिक अर्हतेनुसार एका उमेदवारास कनिष्ठ अभियंता सहाय्यक तर इतर एका उमेदवारास शिपाई म्हणून संधी देण्यात आली आहे.

#### काम चांगल्या पद्धतीने करा : आयुक्त

यावेळी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी नवनियुक्त या कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. शहर स्वच्छ करणे आता तुमच्या हातात आहे. काम चांगले आणि व्यवस्थित करा. नियोजनपूर्वक काम करा, अशा सूचना आयुक्तांनी दिल्या.

#### नियोजनपूर्वक नेटक्या पद्धतीने प्रक्रिया

महापालिका अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली नियोजनबद्ध नेटक्या पद्धतीने सामान्य प्रशासन विभागाचे अधीक्षक रजाक पेंढारी यांच्या माध्यमातून या विभागातील कर्मचारी लाड कमिटी वारसा हक्क अंतर्गत अर्जांची निपटारा प्रक्रिया पार पाडत आहेत. सोलापूर महापालिका सामान्य प्रशासन विभागाने कमी वेळातच नेटक्या पद्धतीने आतापर्यंत ३६३ नियुक्ती आदेश काढण्यात आले आहेत.

# दक्षिण सोलापूरचा बालेकिल्ला मिळण्यासाठी प्रयत्न करा

### काँग्रेस पक्षाचे निरीक्षक जोशी यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मे-**

दक्षिण सोलापूर तालुका यापूर्वी काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला होता. शिवदारे अण्णा, कमळे गुरुजी,आनंदराव देवकते साहेब, गुरुनाथ पाटील यांनी तालुक्यात काँग्रेस पक्ष मजबूत करून कार्यकर्त्यांची फळी निर्माण केली होती.ते तडी- तापडी लोकांचे नेते होते. त्यांनी अनेक कार्यकर्ते घडविले व त्यांना विविध पदावर काम करण्याची संधी दिली. त्यांनी काँग्रेस पक्षासाठी केलेले योगदान मोठे आहे. आता आपण सर्वांनी ठरवू या काँग्रेस पक्षाचे गत वैभव मिळण्यासाठी जोमाने कार्य करू असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष तथा सोलापूरचे निरीक्षक माजी आमदार मोहन जोशी म्हणाले.



यावेळी तालुकाध्यक्ष हरीश पाटील, माजी जिल्हा परिषद संजयजी गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष राधाकृष्ण पाटील अशोक देवकते, मोतीराम चव्हाण, अशोक कस्तुरे आदींनी मनोगत व्यक्त केले. यावेळी मुस्ती ग्रामपंचायतीच्या नूतन सरपंचपदी बालाजी जमादार यांची निवड झाल्याबद्दल निरीक्षक मोहन जोशी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी तालुका अध्यक्ष हरीश पाटील, जिल्हा परिषद सदस्य ॲड. संजयजी गायकवाड, वरिष्ठ उपाध्यक्ष सातलिंग शटगार,विजयकुमार हात्तुरे, उपाध्यक्ष अशोक देवकते, मोतीराम चव्हाण,राधाकृष्ण पाटील, संजय चौगुले,मस्तीचे सरपंच बालाजी जमादार, किरण सुर्वे, प्रशांत कांबळे,अशोक कस्तुरे,उमाकांत येरवडे, आधी उपस्थित होते.

#### स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी सज्ज रहा

जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद, नगरपंचायत ह्या निवडणुका कार्यकर्त्यांच्या निवडणुका आहेत या निवडणुकीमध्ये कार्यकर्त्या संधी देण्याचे काम नेते करतील पण निवडून आणण्याचे काम आपल्या सर्वांना करायचे आहे. यासाठी सर्वांनी मिळून यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका जिंकण्यासाठी सर्वांनी कामाला लागावे असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष सोलापूरचे निरीक्षक, माजी आमदार मोहन जोशी म्हणाले. यावेळी उत्तर सोलापूर तालुका काँग्रेसच्या अध्यक्षपदी सुदर्शन आवताडे यांची निवड करावी असे मागणी तालुक्यातील कार्यकर्त्यांनी केली. तसेच तालुका अध्यक्ष पदासाठी भारत जाधव (तिर्हे) सचिन गुंड (शिवणी) यांनीही आपण तालुका अध्यक्षपदासाठी इच्छुक असल्याचे सांगितले.

याप्रसंगी भारत जाधव सुदर्शन आवताडे प्रा.सिद्राम सलवदे, लक्ष्मण भोसले, अप्पू शेख, संजय चौगुले, सचिन गुंड, पृथ्वीराज राठोड, रामचंद्र तगारे अदीनी आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी उत्तर सोलापूरचे निरीक्षक राजेश पवार, प्रदेश सरचिटणीस सुभाष चव्हाण, वरिष्ठ उपाध्यक्ष सातलिंग शटगार, विजयकुमार हात्तुरे,भारत जाधव, माजी तालुका अध्यक्ष प्रा.सिद्राम सलवदे,विमुक्त जाती- भटक्या जमाती विभागाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण भोसले, जिल्हा सरचिटणीस सुदर्शन आवताडे, तालुका कार्याध्यक्ष सचिन गुंड, अप्पू शेख, तालुका महिला अध्यक्ष नंदा कांबळे, सुरेखा पाटील, भीमराव बंडगर,अल्पसंख्यांक विभागाचे तालुका अध्यक्ष अतिक काझी, पृथ्वीराज राठोड, मिजाज जहागीरदार, चंद्रकांत मसलखांब, किसन साखरे, रामचंद्र तगारे, शंकर मोरे, दीपक गडदे, हनुमंत जावीर आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन जिल्हा प्रसिद्धी प्रमुख सातलिंग शटगार यांनी केले.

# पनाश टॉवर प्रकरणात पालिका आयुक्तांना चौकशी अहवाल सादर

### महापालिका आयुक्त डॉ. ओम्बासे यांची माहिती

### ६ निवृत्त तर ५ कार्यरत कर्मचाऱ्यांचा समावेश

### पालिका बजावणार बिल्डर, महापालिकेच्या आजी-माजी ११ अधिकाऱ्यांना नोटीस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मे-**

विजापूर रोडवरील बहुचर्चित १७ मजली पनाश टॉवर प्रकरणाची चौकशी पूर्ण होऊन त्याचा अहवाल प्राप्त झाला असून यामध्ये बिल्डर आणि महापालिकेच्या संबंधित ११ अधिकारी - कर्मचाऱ्यांना नोटिसा बजावण्यात येणार आहेत, अशी माहिती महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली.

महापालिकेच्या आयुक्त पदावर डॉ. ओम्बासे हे रुजू झाल्यानंतर त्यांना पनाश टॉवर प्रकरणाला पुढील कार्यवाहीसाठी ब्रेक लागल्याचे निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी या प्रकरणाची फाईल पुन्हा उघडली होती. या संदर्भातील सविस्तर माहिती घेतल्यानंतर त्यांनी या प्रकरणाची चौकशी लावली होती आणि चौकशी अधिकारी म्हणून महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांची नियुक्ती केली होती. त्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी केली. चौकशी दरम्यान, या प्रकरणातील तक्रारदार भाजपाचे माजी नगरसेवक प्रभाकर जामगुंडे यांचे म्हणणे नोंदवून घेतले. चौकशीअंती उपायुक्त आशिष लोकरे यांनी हा अहवाल सादर केला आहे. सध्या सर्वोच्च न्यायालयात या प्रकरणावर सुनावणी सुरू असल्याने महापालिका न्यायालयीन सर्व प्रक्रिया पार पाडणार आहे. शिवाय भक्कमपणे न्यायालयात महापालिका आपली बाजू मांडणार आहे. याशिवाय विविध प्रक्रिया पार पाडताना या प्रकरणात संबंधितांवर जबाबदारी देखील निश्चित करणार आहे. यामुळे दोषी अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कारवाई देखील होणार असल्याचे स्पष्टीकरण महापालिका आयुक्तांनी दिले आहे. प्रकरणात अशा अधिकाऱ्यांचा आहे समावेश पनाश टॉवर प्रकरणाच्या चौकशीत अनेक बाबी निदर्शनास आले आहेत. या बाबींचा चौकशी अधिकाऱ्यांनी अहवालात उल्लेख केला आहे. आणखी काही बाबी देखील या प्रकरणात आहेत. चौकशीत हे प्रकरण हाताळणारे ११ अधिकारी- कर्मचारी असून यामध्ये सहा अधिकारी निवृत्त आणि काहींनी स्वेच्छा निवृती घेतली आहे. तर ५ अधिकारी- कर्मचारी हे सध्या महापालिकेत कार्यरत आहेत. त्यांना नोटीसीचा खुलासा ७ दिवसात करावा लागणार आहे.

#### खुलाशासाठी सात दिवस मुदत

दरम्यान, या प्रकरणी विकासकासह महापालिकेच्या संबंधित आजी आणि माजी अशा ११ अधिकाऱ्यांना नोटीसा बजावण्यात येणार आहेत. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार हे सर्वांना सोमवारी नोटीस बजावतील. नोटिसा बजावल्यानंतर त्यांना आपले म्हणणे मांडण्यासाठी ७ दिवसांची मुदत देण्यात येणार आहे. या नोटीसीचा खुलासा असमाधानकारक असल्यास संबंधितांची विभागीय चौकशी होणार आहे. जो अधिकारी त्यावेळी या प्रकरणातील फायली हाताळले आहेत. त्यांचाही यामध्ये समावेश असल्याचे आयुक्त डॉ ओम्बासे यांनी स्पष्ट केले.

#### वापर परवाना संदर्भात होणार कार्यवाही

पनाश टॉवरला ९ मजल्यापर्यंत परवानगी आणि वापर परवाना मान्य व ग्रहीत धरण्यात आला आहे. या इमारतीत वापर परवाना नसताना देखील काही जण इमारती राहत असल्याचे सांगण्यात आले आहे. यामुळे ज्या ठिकाणी वापर परवाना नाही आणि त्या ठिकाणी कोणी राहत असतील तर त्यांना या संदर्भात नोटीस बजावण्यात येणार असून पुढील कार्यवाही देखील होणार आहे.

### शेतकऱ्यांनी विविध घटकांच्या लाभासाठी अर्ज करावेत

**सोलापूर दि.२३ मे-**

सोलापूर जिल्ह्यातील अनु. जाती व अनु जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे. एकात्मिक फलोत्पादन विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी सोलापूर जिल्ह्यास रक्कम रु.६८७.८६ लाख कार्यक्रम राबविण्यास मान्यता मिळाली आहे. सदर योजनेंतर्गत घटक ड्रॅगन फ्रूट, ॲव्होकॅडो, सुटटी फुले, मसाला पिक, मानांकन रोपवाटीका स्थापन करणे, स्ट्रॉबेरी, हरितगृह, शेडनेट हाऊस, प्लास्टिक मल्चिंग, मधुमक्षिक वसाहत, ट्रॅक्टर पावर टिलर ८ एचपी पेक्षा जास्त, फार्मगेट पॅक हाऊस, प्राथमिक प्रक्रिया केंद्र, एकात्मिक शीतसाखळी, कांदाचाळ, सामुहिक शेततळे, शेततळे अस्तरीकरण इत्यादी तसेच औषधी व सुगंधी वनस्पती लागवड अंतर्गत घटकांचा समावेश आहे. लाभार्थी निवडीचे निकष:- लाभार्थी शेतक-यांच्या नावे स्वतः ची शेत जमिन असणे आवश्यक आहे. शेतकरीकडे फलोत्पादन (फळे, भाजीपाला, फुले व इतर इ.) पिके असणे आवश्यक आहे. तरी जिल्हयातील सर्वसाधारण, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील सर्व शेतक-यांना आवाहन करण्यात येते की,सदर घटकांचा लाभ घेण्यासाठी अधिकाधिक शेतक-यांनी महाडीबीटी पोर्टल https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करावेत.


#### जाहीर नोटीस

तमाम लोकास विशेषतः जि. सोलापुर तालुका बार्शी पैकी शहर बार्शी येथील व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळवण्यात येते की, डि. सोलापूर सब डि.व ता. बार्शी पंकी शहर बार्शी येथील म्यु. पल, हद्दीतील गट नं. ६४/३ पेको प्लॉट नं. १२ याचे क्षेत्र ९५.१६ चौ. मी. त्यावरील बार्थकाम यासी चतुः सिमा पुर्वेस प्लॉट नं. १९ . दक्षिणेस प्लॉट नं. ११. पश्चिमेस ०६ मी रुंदीचा रोड, उत्तरेस प्लॉट नं. १३ यंण प्रमाण चतुःसिमा पुर्वक मिळकत आतील तदंगभुत वस्तुहक्कासह याचे पाणी व वागणुक पश्चिम बाजून जाते व आहे वहीवाटीचे हक्कासह व सर्व अधिकारासह श्री नवनाथ दत्तात्रय नारकर यांच खरेदीमालकीची आहे. त्यांनी त्यांचे किराणा माल आणि जनरल स्टोअर्स चे व्यवसायाकरीता कर्ज आमचे अशिल सांगली अर्बन को-ऑप. बँक लि. सांगली शाखा बार्शी या बँकेकडे मागणी केली आहे व त्यानंत रक्कम रुपये १५,००,०००/- (पंधरा लाख चे मात्र) चे कर्ज मंजुर झाले आहे. वर नमुद मिळकत ही सदर कर्जास तारण देत आहेत सदर मिळकत हो निर्वेध, निजोखमी व बोजारहीन असलेचा निर्वाळा विदयमान. मालकानी दिलेला आहे. सदर मिळकत ही कर्जा करीता तारण देण्याची तयारी दर्शविली आहे. सबब वर नमुद मिळकती संबंधाने जर कोणाचे काही गहाण, दान, लिज, बोजा साठेखत खरेदीखत. कर्जबोजाचे, बक्षिस वा इतर तत्सम व्यवहार असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्या पासुन (८) आठ दिवसाचे आत आमचे खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासह आमची खात्री करुन दयावी मुदतीत कोणाचीही हरकत न आलेस सदर मिळकत निर्वेद निजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल पुढील व्यवहार पुर्ण करतील. कोणचीही तक्रार चालणार नाही, कोणचीही फसगत होवुनये म्हणून ही जाहीर नोटीस दिली आहे ता. १३/०५/२०२५

सही/-
ॲड. श्री. प्रसाद जा. कुलकर्णी,
बी.एस.एल., एल.एल.बी.
सिध्देश्वर नगर, कासारवाडी रोड, बार्शी
फोन ९४२३३३२०४८

#### जाहीर प्रसिध्दीकरण

पुढील नेमली तारीख १३/०६/२०२५
दि.कि.अ.नं. ५१/२०२५ नि. ६

**बार्शी येथील मे. अपर जिल्हा न्यायाधिश यांचे न्यायालयात**

**पृथ्वीराज नितीन करडे,**
वय - १४ वर्षे, धंदा - शिक्षण,
रा. कांदलगांव, ता. बार्शी, जि. सोलापूर
अज्ञान याचे अ.पा.क.
वडिल नितीन नारायण करडे,
वय - ४७ वर्षे, धंदा - शेती,
रा. कांदलगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर — **अर्जदार**
विरुध्द
**महाराष्ट्र सरकार - सामनेवाला**

ज्याअर्थी डि.सोलापूर सब डि.व ता. बार्शी पैकी मौजे कांदलगांव येथील शेतजमीन ग.नं. २२९/३ याचे क्षेत्र ० हे.८५ आर आकार रु. २.५० पैसे यापैकी ० हे.४० आर आकार रु.१.२५ पैसे यासी चतुःसिमा :- पुर्वेस - भगवंत देवस्थानची जमीन, दक्षिणेस - रेश्मा फुरडे यांची जमीन, पश्चिमेस - विभावरी प्रल्हाद करडे यांची जमीन, उत्तरेस - सदर गटापैकी उर्वरित जमीन सदर मिळकत अज्ञान अर्जदार याचे मालकी कब्जे वहिवाटीची व ७/१२ हक्कपत्रकी नोंद असलेली मिळकत आहे. अज्ञान मुलगा पृथ्वीराज यास शिक्षणाकरीता म्हाळसाकांत विद्यालय आकुर्डी येथे ठेवलेले आहे तो हुशार असून त्यास भावी काळात उच्चशिक्षण देणेकरीता रक्कमेची कायदेशीर गरज निर्माण झालेली आहे त्यामुळे सदर मिळकत अज्ञान मुलाचे हिताचा विचार करुनच त्याचे अ.पा.क. वडिलानी विक्रीस काढून व्यवहार ठरवलेला आहे. सदर मिळकत विक्री करणेची कायदेशीर व नितांत गरज निर्माण झालेने नमूद मिळकत विक्रीस काढली. परंतु यातील अर्जदार हे अज्ञान असलेने मिळकत विक्रीसाठी मा. जिल्हा न्यायाधिश सो. यांची परवानगी जरुरी असलेने अर्जदारानी या मे. कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे सदर मिळकत विक्री करणे अज्ञानाचे हिताचे व कायदेशीर होणार आहे. तसेच सदर मिळकतीस बाजारभावाने किंमतही अतिशय रास्त व चांगली आलेली आहे असे कथन करुन या मे. कोर्टात अज्ञानाची मिळकत विक्रीस परवानगीची मागणी केलेली आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांच्या वरील मागणी, कथनां संबंधाने कोणाचे कांही हरकती, तक्रारी, आक्षेप असल्यास वा सदर मिळकतीत अन्य कोणाचे कांही हक्क अधिकार असलेस संबंधीतानी ही जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अगर पुढील नेमली तारीख १३/०६/२०२५ रोजी या मे. कोर्टात स्वतः अगर माहितगार वकीलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे, हरकती सादर कराव्यात. मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास मा. न्यायालयाचे प्रकरणी पुढील यथायोग्य आदेश होतील हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दी केले असे. तारीख : ०६/०५/२०२५

कोर्टाचा शिक्का

सही/-
अधिक्षक
अतिरिक्त जिल्हा न्यायालय, बार्शी

#### जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि. अर्ज नं. ४५/२०२५
निशान नंबर ६

**माढा येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन सो यांचे कोर्टात**

**श्रीमती प्रमिला श्रीकांत वाघमारे / वगैरे - अर्जदार**
विरुध्द
**कोणी नाही - सामनेवाला**

ज्याअर्थी अर्जदार नंबर १ चे पती व अर्जदार नंबर २ व ३ यांचे जनक वडील नामे. कै. श्रीकांत व्यंकट वाघमारे हे दिनांक ०१/०३/२०२५ रोजी मौजे जिंती, ता. करमाळा, जि. सोलापूर येथे रस्ते अपघातामध्ये मयत झाले असून त्यांचे मृत्युनंतर शासकीय, निमशासकीय व शैक्षणीक कार्यासाठी सदर अर्जदार नंबर १ ते ३ यांचे नावाची नोंद व्हावी म्हणून यातील अर्जदार १ यांनी संबंधीत अधिकारी यांचेशी संपर्क केला असता संबंधीत अधिकारी यांनी यातील अर्जदार यांना वारसप्रमाणपत्राची तोंडी मागणी केली. त्यामुळे यातील अर्जदार यांनी कै. श्रीकांत व्यंकट वाघमारे यांचे कायदेशीर वारस म्हणून अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी या मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार हे मयत कै. श्रीकांत व्यंकट वाघमारे यांचे वारसदार नव्हे असे कोणास म्हणावयाचे व समजावयाचे असेल अथवा आणखी कोणी वारस असतील तर त्यांनी ही जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून एक महिन्याचे आत अथवा नेमलेली दिनांक १०/०६/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता या मे. कोर्टात त्यांनी स्वतः अगर माहितगार वकीलामार्फत हजर राहून आपल्या लेखी हरकती कळवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही योग्य हरकत न आलेस अर्जदार यांचे हक्काबाबत लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना मयत कै. श्रीकांत व्यंकट वाघमारे यांचे वारस असलेबाबतचा दाखला देणेत येईल.

सदरचे जाहीर प्रसिध्दीकरण आज दि २३/०५/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी व सहीनिशी दिले.

सही /-
लिपीक

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, माढा

#### जाहीर प्रसिध्दीकरण

सिव्हील एम.ए.नं. ४/२०२५
नि. ६

**अक्कलकोट येथील मे. सिव्हील जज्ज ज्यु.डी. यांचे कोर्टात**

१) **श्रीमती अनिता मंगल राठोड**
वय ४५ वर्षे, धंदा : घरकाम
२) **अजित मंगल राठोड**
वय २१ वर्षे, धंदा : शिक्षण
३) **अमित मंगल राठोड**
वय १८ वर्षे, धंदा : शिक्षण
तिघे रा. मु.पो. वसंतराव नाईक नगर,
ता. अक्कलकोट, जि. सोलापूर — **अर्जदार**
विरुध्द
**कोणीही नाही - सामनेवाले**

ज्याअर्थी वरील अर्जदारानी या न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज नं. ४/२०२५ हा दि. बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र प्रमाणे दाखल केला असून यात्तील अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २ व ३ चे पिता कै. मंगल गणपती राठोड हे दि. ०८/०३/२०२३ रोजी मयत झाले आहेत. अर्जदार हेच मयत मंगल गणपती राठोड यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारसा प्रमाणपत्र मिळावे म्हणून यातील अर्जदारांनी मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, उक्त अर्जाबाबत अथवा यातील अर्जदार हे मयत मंगल गणपती राठोड यांचे वारस असलेबाबत कोणाचे काही म्हणणे अगर हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांत अथवा दिनांक १०/०६/२०२५ रोजी या न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदवावी, अन्यथा कोणाची हरकत नाही, असे समजून उक्त अर्जदाराच्या अर्जावर पुढील आदेश करण्यात येईल व त्याप्रमाणे अर्जदारांना त्यांच्या मागणीप्रमाणे वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश मे. कोर्टातर्फे देण्यात येईल. आज रोजी मे. कोर्टाच्या हुकुमाप्रमाणे माझ्या सहीने हे जाहीर प्रसिध्दीकरण केले. ता. २३/०५/२०२५

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा. अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
अक्कलकोट

## Shri Mahavir Urban Coop Bank Ltd., Solapur

60/61, East Mangalwar peth Solapur-413002

**Public Notice for sale**

**Sale notice of immovable property under rule 8(6) & (9) of the Security interest (enforcement) rules 2002**

In exercise of powers conferred under Securitization and Reconstruction of Financial Assets and Enforcement of Security interest Act 2002 and Security interest (enforcement) Rules, 2002 and pursuant to the possession of the secured assets of the borrower(s)/mortgagors mentioned hereunder the publice and all concerned including the concerned borrowers/mortgagors their legal heirs/representatives, as the case may be are hereby informed that offers are invited by the Bank for purpose of the properties below. Where as the authorised officer of the bank has decided to sell the properties described here in below on **"AS IS WHERE IS BASIS AND AS IS WHAT IT IS BASIS"** under rule 8 & 9 of the said act through public auction

| | |
|---|---|
| Borrowers/Guarantors Name | Dayanand Sharanbasavling Shivyogigalu (HUF)<br>Dayanand Sharanbasavling Shivyogigalu<br>**Guarantor:** 1.Shivrudrappa Siddharam Kalyani 2.Sanjay Anappa Sangolagi 3.Vishwajit Appaso Birajdar 4.Sadanand Sharanbasavling Shivyogigalu 5.Shrimant Ningappa Pacchapure |
| Amount of Outstanding + Interest w.e.f. date 30/04/2025 | **Rs.6,72,22,515/- Rs. Six Crore Seventy Two Lakhs Twenty Two Thousand Five Hundered Fifteen only** |
| Description of property | All that piece and parcel of the land situate within of the Dist. Solapur Sub Dist. South Solapur at Takali Gat No.57/1/B Area 0.65.37 R.Sq.Mtr<br>East: Solapur Vijapure Road, West: Gat No.57/A/3,57/A/1<br>North: Gat No.57/A/1 South: Gat No.57/A/3 |
| Date of Demand Notice | 01/02/2022 |
| Date of Actual possession | 04/04/2024 |
| Reserve price | **Rs.2,36,34,500/- (Rs. Two crore Thirty Six Lakh Thirty Four Thousand Five hundred only)** |
| Deposit amount to be paid for participating in the Auction (EMD) | Rs.24,00,000/- (Rs. Twenty Four Lakhs only) |
| Last date and time for submission of tender & Address<br><br>Tender Open Date & Time | Date : 21/06/2025 Time : 11.00 a.m to 5.00 p.m.<br>**Shri Mahavir Urban Coop Bank Ltd., Solapur**<br>60/61, East Mangalwar peth Solapur-413002<br>Date: 24/06/2025 Time: 5.00 p.m. |

Note: The Measurement of above property, however be verified by the bidders at site and also from the Records of the Revenue Authorities prior to participating in auction.

Terms & Conditions of Auction in respect of above described immovable property will be Available at our bank address.

STATUTORY NOTICE AS PR RULE 8(6) of SARFAESI ACT,2002. This notice also be considered as a notice to all Borrower/s, Co-Borrowers, Guarantors & Mortagegers of the said loan to pay the dues in full before the date of sale, failing which the property will be sold on the above mentioned Auction date.
For more information please contact-7020833060

**Date-22/05/2025**
**Place: Solapur**

**Sd/-**
**Krishnahari Y Maisur,**
**Authorised Officer,**
**Shri Mahavir Urban Coop Bank Ltd., Solapur**

# धूम आयपीएलची...



## महत्त्वाचे

### राष्ट्रीय स्क्वॅश स्पर्धेत अभय-अनाहतचे यश



**चेन्नई :** शुक्रवारी नेहरू पार्क येथे झालेल्या राष्ट्रीय स्क्वॅश स्पर्धेत दुहेरीत अभय सिंग व अनाहत सिंग हे उत्कृष्ट खेळाडू ठरले. हँग्गझोऊ आशियाड क्रीडा स्पर्धेतील मिश्र दुहेरी कांस्यपदक विजेत्यांनी प्रत्येकी दोन जेतेपदे जिंकली. अव्वल मानांकित अभयने वेलावन सेंथिलकुमारच्या साथीने पुरुष दुहेरी जिंकली आणि नंतर अनाहतसोबत जोडी करून मिश्र दुहेरीचा मुकुट पटकावला. १७ वर्षीय अनाहतने जोश्ना चिनप्पासोबत महिला दुहेरीचे विजेतेपद पटकावले. तीन अंतिम सामन्यांपैकी, मिश्र दुहेरीचा अंतिम सामन्याने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. अंतिम सामन्यात अभय व अनाहतचे प्रतिस्पर्धी कोणतेही धक्कादायक नव्हते. भारताने जागतिक दुहेरीत कांस्यपदक आणि राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले आहे. भारतीय स्क्वॅशचा हा एक मोठा भाग आहे. आशियाई खेळांनंतर ही जोडी म्हणून आमची पहिलीच स्पर्धा आहे. आम्ही तो वारसा पुढे नेऊ शकू, असे अभय म्हणाला. मलेशियामध्ये होणाऱ्या आशियाई वैयक्तिक अजिंक्यपद (१७ ते २१ जून) आणि आशियाई दुहेरी अजिंक्यपद (२३ ते २६ जून) स्पर्धेसाठी भारतीय संघांची घोषणा सोमवारी होण्याची अपेक्षा आहे. ■

### कनिष्ठ डेव्हिस चषकात भारत-पाक आमने-सामने

**श्यामकेंट :** कझाकस्तानमधील श्यामकेंट येथे झालेल्या आशिया-ओशनिया कनिष्ठ गट (१६ वर्षांखालील) डेव्हिस चषक टेनिस स्पर्धेच्या ९ व्या-१२ व्या स्थानाच्या प्ले-ऑफ सामन्यात भारतीय संघाला न्यूझीलंडकडून १-२ असा पराभव पत्करावा लागला. आता भारतीय संघ ११ व्या स्थानासाठी पाकिस्तानशी सामना करेल. जपान व कोरियाने अनुक्रमे चीन तैपेई व चीनला हरवून जेतेपदासाठी संघर्ष करावा लागेल. युरोपमध्ये हंगामाच्या शेवटी खेळल्या जाणाऱ्या जागतिक गट टप्प्यासाठी शीर्ष चार संघ पात्र ठरले. प्रकाश सरन पहिल्या एकेरीत पराभूत झाल्यानंतर ताविश पहवाने भारताला बरोबरीत आणले. तथापि, निर्णायक दुहेरीत, लुका ब्लँड आणि अल्विन ना याने किवींना तविश आणि प्रतीक शेओरनवर ५-७, ६-३, ११-९ असा विजय मिळवून दिला.

### दीक्षा, अवनी, हिताशीला जबरा गोल्फमध्ये ३६ वे स्थान

**एव्हियन-लेस-बेन्स (फ्रान्स) :** भारतीय गोल्फपटू दीक्षा डागर, अवनी प्रशांत आणि हिताशी बक्षीने जबरा लेडीज ओपन गोल्फ स्पर्धेत आपली पहिली फेरी पूर्ण केली, या तिघीही गुणतालिकेत ३६ व्या स्थानावर होत्या. चौथी भारतीय खेळाडू, त्वेसा मलिक हिने निराशाजनक सुरुवात केली आणि ती ८४ व्या स्थानावर होती. स्वीडनच्या मोआ फोल्केने पहिल्या दिवसाच्या अखेरीस आघाडी घेतली. तिने आठ बर्डी आणि एक बोगीसह जवळजवळ परिपूर्ण फेरीत प्रवेश केला. एव्हियन रिसॉर्ट अँड गोल्फ क्लबमध्ये सहाव्या आणि १५ व्या स्थानावर खेळाडूंनी सुरुवात केली, तेव्हा फोल्केने सहाव्या स्थानापासून सुरुवात केली आणि या फेरीतील ती एकमेव बोगी १६ व्या होलवर होती. दीक्षाने चार बर्डी केल्या आणि आपल्या पहिल्या फेरीत पाच बोगी केल्या. दीक्षाने सहाव्या आणि सातव्या होलवर बर्डीने दिवसाची सुरुवात केली आणि नवव्या होलवर आणखी एक बर्डी केली. १३ व्या आणि १६ व्या होलवर दोन बोगींमुळे ती मागे पडली. अवनी प्रशांतने चार बोगींविरुद्ध तीन बर्डी केल्या, तर हिताशी बक्षीने तिच्या ७२ व्या होलमध्ये दोन बर्डी, एक बोगी आणि एक डबल बोगी केली.

### कॅरोलिन गार्सिया फ्रेंच ओपननंतर निवृत्त होणार

**पॅरिस :** डब्ल्यूटीए टूरमध्ये ११ वेळा विजेती आणि माजी फ्रेंच ओपन महिला दुहेरी विजेती ३१ वर्षीय कॅरोलिन गार्सियाने लवकरच निवृत्त होणार असल्याचे जाहीर केले आहे. माझ्याकडे काही स्पर्धा शिल्लक आहे व नंतर ती निवृत्ती घेईल, असे माजी चौथी विश्वमानांकित गार्सियाने समाज माध्यमात पोस्ट केले आहे. मी टेनिसमधून निवृत्त होणार असून या वर्षीची फ्रेंच ओपन ही माझी शेवटची स्पर्धा असेल, असे तिने म्हटले आहे. प्रिय टेनिस, आता निरोप घेण्याची वेळ आली आहे. १५ वर्षे सर्वोच्च स्तरावर स्पर्धा केल्यानंतर व २५ वर्षांहून अधिक काळ माझ्या आयुष्यातील प्रत्येक सेकंद त्यात घालवल्यानंतर, मी एक नवीन अध्याय सुरू करण्यास तयार आहे, असे ती म्हणाली. गार्सियाने जवळजवळ १९ दशलक्ष बक्षीस रक्कम कमावली आहे आणि २०२२ च्या हंगामाच्या अखेरच्या डब्ल्यूटीए फायनल्स जिंकल्या आहेत, जे ग्रॅण्ड स्लॅमबाहेर खेळातील सर्वात प्रतिष्ठित जेतेपदांपैकी एक आहे. ■

# अव्वल स्थानासाठी पंजाबचा सामना दिल्लीशी

◆ **जयपूर, २३ मे**

अठराव्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात शनिवारी पंजाब किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार असून या सामन्यात पूर्ण ताकदीचा पंजाबचा संघ ११ वर्षांत प्रथमच अव्वल दोन क्रमांकावर स्थान मिळवण्याची संधी शोधेल.

२०१४ च्या हंगामात गुणतालिकेत पंजाब किंग्ज अव्वल स्थानावर होता व उपविजेतेपद मिळविले होते. पंजाब किंग्जने गत १८ वर्षांपासून अस्तित्वात असलेल्या स्पर्धेत केवळ एकदाच प्लेऑफमध्ये प्रवेश केला आहे.

११ वर्षांचा दुष्काळ संपवल्यानंतर पंजाब किंग्ज आता केवळ पहिल्या दोनमध्ये स्थान मिळवण्याच्याच नव्हे, तर अंतिम सामन्यात प्रवेश करण्याच्या आणि नंतर पहिले जेतेपद मिळवण्याच्या संधीच्या प्रयत्नांत आहे.

आधीच आत्मविश्वासाने भरलेला हा संघ तीन दिवसांपूर्वी या गुलाबी शहरात आपल्या अत्यंत प्रतिभावान भारतीय संघात सहभागी झाला तेव्हा आणखी बळकट झाला.



श्रेयस अय्यर



अक्षर पटेल

बुधवारी मुंबई इंडियन्सविरुद्ध झालेल्या मोठ्या पराभवानंतर प्ले-ऑफमधून बाहेर पडलेल्या आपल्या प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळवून पंजाब किंग्ज अव्वल दोनमध्ये स्थान मिळवण्याचा प्रयत्न करत आहे, त्यामुळे हे चारही खेळाडू निवडीसाठी उपलब्ध असतील.

भारत आणि पाकिस्तानमधील लष्करी संघर्षामुळे बीसीसीआयला आयपीएल एका आठवड्यासाठी स्थगित करावी लागल्यामुळे या परदेशी खेळाडूंनी संघ सोडला. या सुंदर डोंगराळ शहरात ब्लॅकआउट झाल्यानंतर १०.१ षटकांचा खेळ संपल्यानंतर सामना रद्द करण्यात आला.

स्पर्धा पुन्हा सुरू झाल्यानंतर पंजाब किंग्जच्या संघ व्यवस्थापनाने आपले परदेशी खेळाडू तातडीने परत आणण्यात चांगली कामगिरी केली. आता या स्पर्धेत फ्रॅन्चायझीमध्ये आतापर्यंत झालेल्या निराशेची भरपाई करण्यासाठी दृढनिश्चयी खेळाडूंचा समूह दिसत आहे.

पंजाब किंग्जचा कर्णधार श्रेयस अय्यरने अलीकडेच आयपीएल प्लेऑफमध्ये तीन फ्रॅन्चायझींचे नेतृत्व करणारा पहिला कर्णधार होऊन इतिहास घडवला आहे. श्रेयसला आपल्या संघाला पुढे नेण्यासाठी उर्वरित सामन्यांमध्येही जबरदस्त कामगिरी करावी लागेल.

गत वर्षी कोलकाता नाईट रायडर्ससोबतच्या आपल्या विजयी मोहिमेपूर्वी अय्यरने २०१९ व २०२० मध्ये दिल्ली कॅपिटल्सचे प्ले-ऑफमध्ये नेतृत्व केले होते, यात २०२० मधील त्यांचा एकमेव आयपीएल अंतिम सामन्याचा समावेश होता.

१२ सामन्यांमध्ये ४३५ धावा करून तो या हंगामात दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक धावा करणारा खेळाडू आहे आणि तो आणखी धावा करण्याची तयारी करत आहे. प्रभसिमरन सिंग (४५८ धावा), प्रियांश आर्य (३५६ धावा), अर्शदीप सिंग (११ बळी) आणि युजवेंद्र चहल (१३ बळी) यासारख्या खेळाडूंच्या कामगिरीमुळे पंजाब किंग्ज या हंगामात सर्वात सातत्यपूर्ण संघ म्हणून उदयास आला आहे. १२ सामन्यांतून १७ गुण मिळवून दोन सामने शिल्लक असताना प्ले-ऑफमध्ये स्थान निश्चित केले आहे.

दिल्ली कॅपिटल्सचा विचार केला तर, या हंगामात त्यांना संधी मिळाल्या आहेत, परंतु पॉवरप्लेमध्ये सातत्याने मोठ्या धावांचा अभाव आणि शेवटच्या दिशेने आघाडीचा वेगवान गोलंदाज मिशेल स्टार्कची अनुपस्थिती यामुळे त्यांच्या संधींवर विपरीत परिणाम झाला आहे.

ते त्यांच्या निराशाजनक मोहिमेचा शेवट चांगल्या पद्धतीने करण्याचा प्रयत्न करतील, परंतु पीबीकेएससारख्या फॉर्ममध्ये असलेल्या प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध, हे सांगणे सोपे आहे पण करणे सोपे आहे.

आयपीएलच्या गुणतालिकेत सध्या पहिल्या चार क्रमांकामध्ये गुजरात टायटन्स (१८), रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (१७), पंजाब किंग्ज (१७), मुंबई इंडियन्सचा (१६) समावेश आहे. त्यानंतर पाचव्या ते दहाव्या क्रमांकावर अनुक्रमे दिल्ली कॅपिटल्स, लखनौ, कोलकाता, हैदराबाद, राजस्थान व चेन्नई संघांचा समावेश आहे.

(वृत्तसंस्था)

**आजचा सामना**

पंजाब किंग्ज
वि. दिल्ली कॅपिटल्स
**स्थळ :** सवाई मानसिंग स्टेडियम, जयपूर
**वेळ :** सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

# श्रीनाथ डब्ल्यूटीसी अंतिमचे सामनाधिकारी

◆ **दुबई, २३ मे**

भारतीय संघ जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या (डब्ल्यूटीसी) अंतिम फेरीत पोहोचला नसला तरी, माजी वेगवान गोलंदाज जवागल श्रीनाथ हे डब्ल्यूटीसीमध्ये पदार्पण करणाऱ्या नितीन मेनन यांच्यासोबत चौथ्या पंच म्हणून काम करून आगामी डब्ल्यूटीसी अंतिम सामन्यात भारताची उपस्थिती सुनिश्चित करतील.



इंग्लंडचे रिचर्ड इलिंगवर्थ आणि न्यूझीलंडचे ख्रिस गॅफनी हे लॉर्ड्स येथे होणाऱ्या डब्ल्यूटीसी अंतिममध्ये मैदानावरील पंच असतील. गतविजेता ऑस्ट्रेलिया ११ ते १५ जून दरम्यान पवित्र स्थळी पहिल्यांदाच अंतिम फेरीत पोहोचलेल्या दक्षिण आफ्रिकेविरुद्ध अंतिम सामना खेळेल.

इंग्लंडचे रिचर्ड केटलबरो यांना टीव्ही पंच म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. केटलबरो यांनी पुरुष विश्वचषक व चॅम्पियन्स चषकासह आयसीसीच्या अनेक महत्त्वपूर्ण स्पर्धेच्या अंतिम सामन्यात, विशेषतः भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील पहिल्या डब्ल्यूटीसी २०२१ च्या अंतिम सामन्यात हीच भूमिका बजावली आहे.

२०२१ मध्ये आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक अंतिम सामन्यात टीव्ही पंच म्हणून काम केल्यानंतर मेनन यांची या स्पर्धेसाठी चौथे पंच म्हणून निवड करण्यात आली आहे. इलिंगवर्थ अंतिम कसोटीत इतिहास घडवणार आहेत. त्यांनी तीनही अंतिम सामन्यांमध्ये मैदानी पंच म्हणून काम केले आहे. भारत पहिल्या दोन सायकलच्या अंतिम फेरीत पोहोचला होता, परंतु दोन्ही वेळा अनुक्रमे न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियाविरुद्ध पराभव पत्करावा लागला. आयसीसीचे अध्यक्ष जय शाह यांनी नियुक्त अधिकाऱ्यांच्या अनुभवाचे आणि गुणवत्तेचे कौतुक केले आणि त्यांच्या कामगिरीवर विश्वास व्यक्त केला.

(वृत्तसंस्था)

# श्रीकांत मलेशिया मास्टर्सच्या उपांत्य फेरीत

◆ **क्वालालम्पूर, २३ मे**

भारताचा अनुभवी खेळाडू किदाम्बी श्रीकांतने शुक्रवारी येथे फ्रान्सच्या उच्च मानांकित टोमा ज्युनियर पोपोव्हवर तीन गेमच्या संघर्षपूर्ण विजयासह मलेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला.

सध्या ६५ व्या क्रमांकावर असलेला, परंतु माजी प्रथम विश्वमानांकित आणि जागतिक अजिंक्यपद व आशियाई क्रीडा स्पर्धेत रौप्यपदक विजेता श्रीकांत याने १८ वा विश्वमानांकित पोपोव्हविरुद्ध जोरदार झुंज दिली आणि एक तास १४ मिनिटे चाललेल्या चुरशीच्या स्पर्धेत फ्रान्सच्या खेळाडूला २४-२२, १७-२१, २२-२० असे पराभूत केले. श्रीकांतची शेवटच्या चार फेरीतील लढत जपानच्या युशी तनाकाशी होणार आहे. युशीचा गत एक वर्षातील पहिलाच उपांत्य फेरीतील सामना असेल.

दुसऱ्या पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत जपानी जोडीने फ्रान्सच्या क्रिस्टो पोपोव्ह याला २१-१८, १६-२१, २१-६ असे हरवले. पोपोव्ह हा टोमा ज्युनियरचा भाऊ आहे.

पुरुष एकेरीची दुसरी उपांत्य फेरी जपानच्या चौथ्या मानांकित कोडाई नारोका आणि चीनच्या द्वितीय मानांकित ली शी फेंग यांच्यात खेळली जाईल. शुक्रवारी झालेल्या उपांत्यपूर्व फेरीत ध्रुव कपिला आणि तनिषा क्रॅस्टो या मिश्र दुहेरी जोडीच्या बाहेर पडल्यानंतर श्रीकांत आता बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर सुपर ५०० स्पर्धेत भारताकडून एकमेव खेळाडू कायम आहे. कपिला व क्रॅस्टोने पहिल्या गेममध्ये चीनच्या जियांग झेन बँग व वेई या झिन या जोडीला कठीण लढत दिली, परंतु पुढच्या गेममध्ये त्यांनी हार पत्करली आणि ३५ मिनिटांच्या सामन्यात २२-२४, १३-२१ असा पराभव पत्करावा लागला.

(वृत्तसंस्था)

# वैभव काळेची पदकांची हॅट्ट्रिक

## खेलो इंडिया बीच क्रीडा स्पर्धा ● महाराष्ट्राला कबड्डीत कांस्यपदक ● पदकतालिकेत दुसरे स्थान

◆ **दीव, २३ मे**

माथाडी कामगाराचा मुलगा असणाऱ्या वैभव वाल्मिक काळेने पहिल्या खेलो इंडिया बीच स्पर्धेत महाराष्ट्रासाठी पदकांचा हॅट्ट्रिकचा पराक्रम केला आहे. वैभवने सुवर्ण, रौप्य व कांस्य अशी तिरंगी पदके जिंकण्याची किमया केली आहे. कबड्डी महाराष्ट्राच्या दोन्ही संघांना कांस्यपदकावर समाधान मानावे लागले असून पदकतालिकेत ५ सुवर्णांसह एकूण १८ पदके जिंकून महाराष्ट्र दुसऱ्या स्थानावर आहे.

घोघला समुद्र किनाऱ्यावर सुरू असलेल्या पारंपारिक पेंचक सिलट प्रकारात वैभवने सुवर्णपदक जिंकून पदकाच्या हॅट्ट्रिकची सुवर्णसांगता केली. ६० ते ६५ किलो वजनी गटाच्या अंतिम लढतीत २३ वर्षीय वैभवने आसामच्या प्रांजल राभा विरूध्द १७-४ गुणांनी एकतर्फी विजय मिळविला. वैभवचे हे स्पर्धेतील तिसरे पदक आहे. त्याने वैयक्तिक





प्रकारात कांस्य व रेंगु सांघिक प्रकरात रौप्यपदकाची लयलूट केली आहे. स्पर्धेत तिरंगी पदक जिंकणारा तो एकमेव खेळाडू आहे.

**माथाडी कामगारांच्या मुलाने गाजवला खेलो इंडिया**

वैभवचे वडील वाल्मिक काळे हे मुंबईतील वाशी बाजार समितीत माथाडी कामगार आहेत. ठाणे शहरात सराव करणाऱ्या वैभवने आशियाई स्पर्धेत रौप्यपदक पटकावले असून जागतिक स्पर्धेत त्याने भाग घेतला आहे. हमाली करणाऱ्या माझ्या वडिलांना हे पदक अर्पण करतो असे सांगून वैभव म्हणाला की, खेलो इंडियातील ही पदके आंतरराष्ट्रीय यशासाठी प्रोत्साहन देणारे आहेत.

बीच कबड्डीतील महिला उपांत्य लढतीत हिमाचल प्रदेशने महाराष्ट्राचा ५२-४१ गुणांनी पराभव केला. साखळी सामन्यात छत्तीसगड, दीव व दमन संघाचा धुव्वा उडवून महाराष्ट्राने उपांत्य फेरीत मजल मारली होती. मात्र उपांत्य लढतीत हिमाचल प्रदेशकडून महाराष्ट्राला पराभव स्वीकारावा लागला.

पुरूषांच्या उपांत्य लढतीत हरयाणाने महाराष्ट्रावर ५२-२७ गुणांनी मात केली. दोन्ही गटातील सुवर्णपदके बलाढ्य हरयाणाने जिंकून आपले वर्चस्व गाजवले. बीच फुटबॉलमधील पुरूष गटात महाराष्ट्राला ३-१६ गोलने पराभूत करून केरळने अंतिम फेरीत मजल मारली आहे. पदकतालिकेत ५ सुवर्ण, ४ रौप्य, ९ कांस्य एकूण १८ पदके जिंकून महाराष्ट्र दुसऱ्या स्थानावर आहे. ५ सुवर्ण, ५ रौप्य, ३ कांस्य एकूण १३ पदकां कमाई करीत मणिपूरने अव्वल स्थान गाठले आहे. सर्वसाधारण विजेतेपदासाठी मणिपूर, महाराष्ट्र आणि ह अरयाणात शर्यत रंगली आहे.

(वृत्तसंस्था)

# आरसीबीचा हेझलवूड प्लेऑफपूर्वी परतण्याची शक्यता

◆ **नवी दिल्ली, २३ मे**

ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज जोश हेझलवूड खांद्याच्या दुखापतीतून बरा झाला आहे आणि आयपीएल प्लेऑफपूर्वी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूमध्ये पुन्हा सहभागी होण्याची शक्यता आहे.

हा वेगवान गोलंदाज शेवटचा आयपीएल हंगामात २७ एप्रिल रोजी खेळला होता आणि त्यानंतर त्याने दोन सामने गमावले आहेत. भारत-पाकिस्तान लष्करी संघर्षामुळे लीगमधील एका आठवड्याच्या ब्रेक दरम्यान तो घरी परतला होता.



तेव्हापासून, ३४ वर्षीय खेळाडू जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या (डब्ल्यूटीसी) अंतिम सामन्याच्या आधी ऑस्ट्रेलियाच्या तयारीचा भाग म्हणून ब्रिस्बेनमध्ये सराव करत आहे. त्याच्यावर सध्या क्रिकेट ऑस्ट्रेलियाच्या वैद्यकीय पथकाचे निरीक्षण आहे. आरसीबी व्यवस्थापन जवळून संपर्क साधत आहे. आमची वैद्यकीय पथके आणि त्यांचे वैद्यकीय पथके त्या तपशीलावर संपर्क साधत आहेत, असे आरसीबीचे क्रिकेट संचालक मो बोबॅट यांनी गेल्या आठवड्यात सांगितले होते.

प्लेऑफमध्ये आधीच स्थान मिळविलेल्या आरसीबीचे लक्ष्य २०१६ नंतर पहिल्यांदाच अव्वल दोनमध्ये साखळी फेरी पूर्ण करण्याचे आहे. त्यांचे दोन सामने शिल्लक आहेत. २३ मे रोजी सनरायझर्स हैदराबाद विरुद्ध आणि २७ मे रोजी लखनऊ सुपर जायण्ट्स विरुद्ध सामने खेळणार आहे.

(वृत्तसंस्था)

### मैराज खान, गनेमत सेखोन शॉटगन चाचणीत अव्वल स्थानी

◆ **नवी दिल्ली, २३ मे**

शुक्रवारी डॉ. करणी सिंग शूटिंग रेंज येथे झालेल्या दुसऱ्या शॉटगन राष्ट्रीय नेमबाजी चाचण्यांच्या स्कीट अंतिम फेरीत ऑलिम्पिकपटू मैराज अहमद खान आणि गनेमत सेखोनने अव्वल स्थान पटकावले. (वृत्तसंस्था)

# अँजेलो मॅथ्यूज कसोटीतून निवृत्त होणार

◆ **कोलंबो, २३ मे**

पुढील महिन्यात बांगलादेशविरुद्ध होणारा पहिला कसोटी सामना हा आपला शेवटचा कसोटी सामना असेल, असे श्रीलंकेचा अनुभवी अष्टपैलू खेळाडू अँजेलो मॅथ्यूजने शुक्रवारी जाहीर केले.

पारंपारिक कसोटी क्रिकेटमध्ये तरुण प्रतिभेला वाव मिळावा, त्यामुळे मी कृतज्ञ हृदय आणि अविस्मरणीय आठवणी घेऊन कसोटीतून निवृत्त होत आहे, असे तो म्हणाला.

तथापि, ३७ वर्षीय खेळाडू आपल्या देशासाठी व्हाईट-बॉल क्रिकेट खेळत राहील. त्याचा शेवटचा कसोटी सामना १७ ते २१ जून दरम्यान गॅले येथे असेल.

खेळाच्या सर्वात प्रिय स्वरूपाच्या आंतरराष्ट्रीय कसोटी क्रिकेटला निरोप देण्याची वेळ आली आहे!...जूनमध्ये बांगलादेशविरुद्धचा पहिला कसोटी सामना हा माझ्या देशासाठी शेवटचा कसोटी सामना असेल, असे त्याने एक्सवर पोस्ट केले.



मी कसोटी क्रिकेटला निरोप देत असलो तरी, निवडकर्त्यांशी चर्चा केल्याप्रमाणे, जेव्हा जेव्हा माझ्या देशाला माझी गरज असेल तेव्हा मी पांढऱ्या चेंडूच्या क्रिकेटसाठी निवडीसाठी उपलब्ध राहीन, असेही तो म्हणाला. आपल्या देशासाठी चमकण्यासाठी तरुण खेळाडूला जागा देण्याची हीच सर्वोत्तम वेळ आहे, असे तो पुढे म्हणाला. २००९ मध्ये पदार्पण केल्यापासून मॅथ्यूजने ११८ कसोटी सामन्यांमध्ये ८१६७ धावा केल्या आहेत. श्रीलंकेच्या इतिहासातील कुमार संगकारा (१२,४००) आणि महेला जयवर्धने (११,८१४) यांच्यानंतर त्याची ही तिसऱ्या क्रमांकाची सर्वाधिक धावसंख्या आहे. त्याची सरासरी ४४.६२ आहे आणि त्याने आतापर्यंत १६ शतके आणि ४५ शतके झळकावली आहेत, यात नाबाद २०० धावा ही त्याच्या दीर्घ कारकिर्दीतील सर्वोत्तम कामगिरी आहेत. त्याच्याकडे ३४ बळी सुद्धा आहेत.

अँजेलो मॅथ्यूज हा श्रीलंका कसोटी क्रिकेटचा खरा सेवक. १७ वर्षांच्या अढळ समर्पण, नेतृत्व आणि अविस्मरणीय क्षणांसाठी धन्यवाद. अँजेलोच्या वचनबद्धतेमुळे व आवडीमुळे एका पिढीला प्रेरणा मिळाली आहे, असे श्रीलंका क्रिकेटने म्हटले आहे.

(वृत्तसंस्था)

# फोर्डने केली एबीच्या विक्रमाशी बरोबरी

## फोर्डचे आयर्लण्डविरुद्ध केवळ १६ चेंडूंत सर्वात जलद वन-डे अर्धशतक

◆ **डब्लिन, २३ मे**

वेस्ट इंडीजच्या मॅथ्यू फोर्डने आयर्लण्डविरुद्ध डब्लिन येथे खेळल्या जात असलेल्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात १६ चेंडूत अर्धशतक ठोकून एबी डिव्हिलियर्सच्या सर्वात जलद एकदिवसीय अर्धशतकाच्या विक्रमाशी बरोबरी केली आहे. २०१५ मध्ये जोहान्सबर्ग येथे वेस्ट इंडीजविरुद्ध ४४ चेंडूत १४९ धावा करताना डिव्हिलियर्सने हा विक्रम केला होता.

केसी कार्टीचे शतक (१०२) आणि मॅथ्यू फोर्डच्या (५८) अर्धशतकाच्या बळावर वेस्ट इंडीजने ५० षटकांत ८ बाद ३५२ धावा उभारल्या आणि आयर्लण्डसमोर विजयासाठी ३५३ धावांचे लक्ष्य ठेवले. मात्र विजयासाठी धावांचा पाठलाग करण्यापूर्वी सामन्यात पावसाने व्यत्यय आणला.

एकेवेळी फोर्ड १३ चेंडूत ४२ धावांवर होता व त्याला डिव्हिलियर्सचा विक्रम मोडण्याची संधी होती. फोर्डने



पुढील चेंडूवर बॅरी मॅकार्थीचा रॅम्प चुकवल्याने ते घडले नाही, परंतु पुढील दोन चेंडूंवर, लाँग-ऑफ आणि कव्हरवर, सलग दोन षट्कार मारल्याने त्याला बरोबरी साधण्यास मदत झाली.

फोर्डने १९ चेंडूंत २ चौकार व ८ षट्कारांच्या मदतीने ५८ धावा केल्या. त्यामुळे याच्या ९६.५५ टक्के धावा चौकारांमध्ये होत्या. पुरुषांच्या एकदिवसीय सामन्यात ५० पेक्षा जास्त धावसंख्येसाठी हा सर्वोच्च धावसंख्या आहे. याआधीचा विक्रम ९६.१५% होता आंद्रे फ्लेचरचा, ज्याने २००९ मध्ये बांगलादेशविरुद्ध बासेटेरे येथे चौकार मारून ५२ चेंडूंत ५० धावा केल्या होत्या. केसी कार्टीने १०९ चेंडूंत १३ चौकार व एका षट्कारसह १०२ धावा केल्या.

(वृत्तसंस्था)

# मलेशिया नेशन्स चषक स्पर्धेचे आयोजन करण्यास सज्ज

◆ **क्वालालम्पूर, २३ मे**

क्वालालम्पूर, मलेशिया आगामी १५ ते २१ जून दरम्यान होणाऱ्या आगामी एफआयएच हॉकी पुरुष नेशन्स चषक स्पर्धा २०२५ चे आयोजन करण्यासाठी उत्सुक आहे. ही स्पर्धा वैभवाच्या शोधात आणि एफआयएच हॉकी प्रो लीगमध्ये पदोन्नती मिळविण्यासाठी उत्तम संधी असून त्याकरिता अव्वल स्तरीय आंतरराष्ट्रीय संघांना एकत्र आणेल.

हॉकी परंपरा आणि उत्साही चाहते असलेल्या देशासाठी नेशन्स चषकचे आयोजन करणे मलेशियाच्या या खेळाशी असलेल्या दीर्घकालीन संबंधात आणखी एक अभिमानास्पद अध्याय आहे, असे मलेशियन हॉकी कॉन्फेडरेशनचे अध्यक्ष व आश्रयदाते सुबाहन कमल म्हणाले.

मलेशियासाठी पुन्हा एकदा एका प्रतिष्ठित स्पर्धेचे यजमानपद भूषवणे हा सन्मान आहे. यजमान म्हणून हा आमचा पहिलाच नेशन्स चषक स्पर्धा असला तरी, आमच्याकडून आयोजित प्रत्येक स्पर्धा तरुण पिढीमध्ये उत्साह वाढवते आणि हॉकीला सक्रियपणे प्रोत्साहन देते असा आमचा विश्वास आहे. आम्हाला विश्वास आहे की यामुळे खेळात रस वाढेल आणि हॉकी प्रेमींचा मोठा समुदाय वाढेल,'' असे ते म्हणाले. ही स्पर्धा इतर सहभागींसाठी देखील महत्त्वाची आहे कारण विजेता पुढील वर्षी होणाऱ्या एफआयएच प्रो लीगसाठी पात्र ठरेल. ही स्पर्धा केवळ आंतरराष्ट्रीय स्पर्धा प्रदर्शित करणार नाही, तर मलेशियन हॉकी चाहत्यांसाठी एक रॅली पॉइंट म्हणूनही काम करेल. संघाचा कर्णधार, मुहम्मद मरहान मोहम्मद जलील, घरच्या मैदानावर त्याच्या संघाचे नेतृत्व करण्यास उत्सुक आहे. आमच्या घरच्या मैदानावर खेळणे हा सन्मान आहे. आमच्या सामन्यांदरम्यान प्रेक्षकांनी आम्हाला जयजयकार करताना आणि पाठिंबा देताना पाहणे आणि ऐकणे संपूर्ण स्पर्धेत आमचा आत्मविश्वास आणि ताकद वाढवते, असे मोहम्मद जलील म्हणाला.

(वृत्तसंस्था)

# रोहित, कोहलीची अनुपस्थिती इतरांसाठी संधी : गंभीर

◆ **नवी दिल्ली, २३ मे**

विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्या अनुपस्थितीमुळे भारतीय संघासाठी एक मोठे आव्हान असेल, परंतु त्यांच्या कसोटी निवृत्तीमुळे इतरांना पुढे येऊन जबाबदारी घेण्याचे दार उघडले आहे, असे भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर म्हणाले. या महिन्याच्या सुरुवातीला कोहली आणि रोहितने एकमेकांच्या एका आठवड्याच्या आत कसोटी क्रिकेटला निरोप दिला. पुढील महिन्यात इंग्लंडमध्ये होणाऱ्या पाच सामन्यांच्या मालिकेपूर्वी ही घोषणा करण्यात आली. या इंग्लंड दौऱ्यासाठी संघ शनिवारी मुंबईत जाहीर केला जाईल.

मला वाटते, जेव्हा तुम्ही खेळ सुरू करता व कधी संपवायचा असतो, तेव्हा तो एक अतिशय वैयक्तिक निर्णय असतो. कोणालाही अधिकार नाही. प्रशिक्षक असो, निवडकर्ता असो, या देशातील कोणालाही कधी निवृत्ती घ्यावी व कधी निवृत्ती घेऊ नये हे सांगण्याचा अधिकार आहे, असे गंभीर म्हणाले.भारतीय संघाला निश्चितच दोन वरिष्ठ खेळाडूंशिवाय राहावे लागेल. हे दोघेही खरोखर अनुभवी खेळाडू आहे.या दोघांच्या निवृत्तीमुळे भारताला केवळ नवीन कसोटी कर्णधाराची आवश्यकता नाही, तर त्यांच्या दोन सर्वात अनुभवी खेळाडूंशिवाय देखील नेतृत्व व अनुभवाची पोकळी असेल. ती भरून काढणे सोपे होणार नाही, असे गंभीर यांनी मान्य केले. ही काही इतर लोकांना हात वर करून टीका करण्याची संधी असते, पण मी त्यासाठी तयार आहे, असेही ते म्हणाले.



(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...


### एका कुटुंबास लोखंडी गजाने मारहाण केल्याप्रकरणी सात जणाविरुध्द गुन्हा दाखल

**मंगळवेढा दि.२३ मे-**

भांडणामध्ये भाग का घेतला या कारणावरुन गैरकायद्याची मंडळी जमवून घरात प्रवेश करीत एका कुटूंबास लोखंडी गजाने मारुन तसेच एका महिलेची साडी व ब्लाऊज ओढून तिच्या मनाला लज्जा वाटेल असे कृत्य केल्याप्रकरणी सागर गोरख शिंदे, प्रकाश गोरख शिंदे, शिवराम किसन शिंदे, शंकर किसन शिंदे, विजय शिवराम शिंदे, संजय गोरख शिंदे (रा.मोहोळ), सिता दादाराव शिंदे (रा.सांगोला) या सात जणांविरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. यातील फिर्यादी राहुल भैरवनाथ शेगर (वय २५, रा.दामाजीनगर मंगळवेढा) हे दि.२१ मे रोजी रात्री १ वाजता आई, वडिल, पत्नी व मुला बाळासह झोपले असताना वरील आरोपीने गैर कायद्याची मंडळ जमवून अचानक झोपडी मध्ये प्रवेश करुन फिर्यादी व फिर्यादीच्या आई वडिलांना शिवीगाळ करीत तुम्ही मोहोळ येथील नातेवाईका सोबत भांडण झाल्यानंतर त्या भांडणामध्ये भाग का घेतला असे म्हणून लाथा बुक्क्यांनी तसेच लोखंडी गजाने मारुन जखमी केले. या घटनेत डोळ्यात चटणी टाकून आरोपीने खाली पाडून मारले. सदर भांडणे सुरु असताना एका महिलेची साडी व ब्लाऊज ओढून तिच्या मनाला लज्जा वाटेल असे कृत्य केल्याचे दिलेल्या फिर्यादीत शेगर यांनी म्हटले आहे. याचा अधिक तपास मंगळवेढा शहर बीटचे पोलीस नाईक कृष्णात जाधव हे करीत आहेत.

## निधन वृत्त...

### रमेश कोबल



**पुणे, दि. २३ मे-**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत कार्यकरीणी सदस्य आणि प्रांत ग्रामविकास सहसंयोजक रमेश गणपत कोबल (वय ५४) यांचे प्रदीर्घ आजाराने निधन झाले. खेड तालुक्यातील त्यांच्या मुळगावी कान्हेवाडी येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड येथे तीन वर्षे प्रचारक म्हणून काम केले. त्यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ, पत्नी आणि मुलगा असा परिवार आहे.

### गणपत पवार



**टेंभुर्णी, दि.२३ मे-**

माढा तालुक्यातील अकोले-खुर्द येथील रहिवासी गणपत मारुती पवार (वय-७५) यांचे शुक्रवारी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन पत्नी, तीन मुले, चार मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते भारतीय पुरातत्व खात्यामधील रायगड येथील संरक्षण सहा. नागेश पवार यांचे वडील होत.

# शक्तिपीठ महामार्गाचे सर्वाधिक १५६ कि.मी.चे अंतर सोलापूर जिल्ह्यात

**रस्ते विकास महामंडळातर्फे गावांचे मार्केशन झाले पूर्ण**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ मे-**

राज्य सरकारचा महत्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या शक्तिपीठ महामार्गाच्या भूसंपादन प्रक्रियेला सुरूवात झाली आहे. ७५ हजार कोटी रूपयांतून ८०२ कि.मी. चा महामार्ग बांधण्यात येणार आहे. काही जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या विरोधामुळे भूसंपादन रखडले होते. पुन्हा राज्य सरकारने महामार्गाच्या कामास गती दिली आहे. विशेष म्हणजे संपादन प्रक्रिया लवकर पूर्ण करण्यासाठी विदर्भ, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रासाठी राज्य रस्ते विकास महामंडळाचे स्वतंत्र अधिकारी नियुक्त केले आहेत. सध्या ३७० पैकी ७० गावांमध्ये संयुक्त मोजणीची प्रक्रिया सुरू असून भूसंपादनासाठी कोणतीही सक्ती करण्यात येणार नसल्याचे राज्य रस्ते विकास महामंडळातर्फे स्पष्ट करण्यात आले आहे. या महामार्गाचे सर्वाधिक १५६ किलोमीटरचे अंतर सोलापूर जिल्ह्यात असणार आहे.

महाराष्ट्रातील १२ जिल्ह्यांतून शक्तिपीठ महामार्ग जात असून यासाठी १० हजार हेक्टरहून अधिक



जमीन संपादित केली जाणार आहे. मराठवाड्यातील बीड, लातूर, धाराशिव व पश्चिम महाराष्ट्रातील सोलापूर व कोल्हापूर जिल्ह्यात शेतकऱ्यांनी विरोध केला आहे. पण सिंधुदुर्ग, सांगली, विदर्भातील वर्धा, यवतमाळ तर मराठवाड्यातील हिंगोली, नांदेड, परभणी या जिल्ह्यांत संयुक्त मोजणीचे काम सुरू झाले आहे. काही जिल्ह्यात प्रत्यक्षात भूसंपादनाच्या कामास गती आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या भूमिकेकडे लक्ष लागले आहे.

### सोलापूर जिल्ह्यात महामार्गाचे सर्वाधिक अंतर

वर्धा - ३६ कि.मी., यवतमाळ १२९ कि.मी., हिंगोली ३४ कि.मी., नांदेड २६ कि.मी., परभणी ७१कि.मी., बीड ४६कि.मी., लातूर ४१कि.मी., धाराशिव ४३कि.मी., सोलापूर १५६कि.मी., सांगली ५७कि.मी., कोल्हापूर १२३ कि.मी. व सिंधुदुर्ग जिल्ह्यातून महामार्गाचे अंतर ३९ कि.मी. असेल. यासाठी १० हजार हेक्टरहून अधिक जमीन संपादित केली जाणार आहे. सध्या संयुक्त मोजणीचे काम सुरू असून हा महामार्ग सहापदरी असेल. त्यावर ४७ मोठे पूल, ३० बोगदे, ८ रेल्वे क्रॉसिंग, २६ ठिकाणी इंटरचेंजेस असणार आहेत. या महामार्गामुळे मालवाहतुकीची प्रक्रिया अधिक गतिमान होईल. तसेच कमीवेळात नाशवंत माल बाजारपेठेत पोहोचवणे शक्य होईल.

### २१ तासांचा प्रवास येणार केवळ ८ तासांवर

तुळजापूरची श्री तुळजाभवानी, कोल्हापूरची महालक्ष्मी, तरगोवा राज्यातील पत्रादेवी अशी तीन शक्तीपीठे या महामार्गाने जोडली जाणार आहेत. याशिवाय सेवाग्राम, औंढा नागनाथ, नांदेड येथील गुरूद्वारा, परळी वैजनाथ, पंढरपूर येथील श्रीविठ्ठल रूक्मिणी देवस्थान जोडण्यात येणार आहे. नागपूरहून गोवा पोहचण्यासाठी सध्या २१ तास लागतात. पण शक्तीपीठमहामार्ग पूर्ण झाल्यानंतर ही वेळ १३ तासांनी कमी होऊन ८ तासांवर येणार आहे. मराठवाड्यातील हिंगोली, नांदेड या जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांनी महामार्गाला विरोध केला आहे. त्यानंतरही कामाला सुरुवात झाल्याने आता भूसंपादन प्रक्रियेत शेतकऱ्यांच्या संतापाचा उद्रेक होण्याची चिन्हे आहेत.

## वाहन चालकास काठीने बेदम मारहाण

**मंगळवेढा दि.२३ मे-**

उचेठाण येथील भीमा नदीपात्रातील शासनमान्य ठेक्यातील वाळू भरण्यासाठी निघालेल्या वाहनास अडवून तु आमच्या गावातून वाळू घेवून जातोस मला त्याचा हप्ता पाहिजे, मी भरपूर वेळा तुला सांगितले आहे. तरीपण तु ऐकत नाही असे म्हणून सदर वाहन चालकास गच्ची पकडून काठीने बेदम मारहाण करीत गळ्यातील दोन तोळे सोन्याची चैन व खिशातील दहा हजार रुपये जबरदस्तीने काढून घेत जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी सामाजिक कार्यकर्ते दत्तात्रय बेदरे (रा.उचेठाण) व अन्य अज्ञात दोघांविरूध्द मंगळवेढा पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. अधिक तपास डी. वाय.एस.पी.विक्रांत गायकवाड हे करीत आहेत.

पोलिसांनी दिलेली माहिती अशी, यातील फिर्यादी दिनेश विजय काटे (वय २६,रा.सैफूल,सोलापूर) हे टिपर चालक असून अनिता महादेव जाधव (रा.सरकोली) यांचा बुकींग आय डी क्रमांक ३४९३७२७२५०४१०८४१४ या पावतीची वाळू भरण्यासाठी टिपर क्रमांक एम एच १३ ई पी ९१९१ हे उचेठाण येथील भिमा नदीपात्रातून शासनमान्य ठेक्याकडे जात असताना दि.२१ रोजी सायंकाळी ५ वा. उचेठाण हद्दीत ही घटना घडली.

## प्रा. झपके यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२३ मे-**

रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान समजून माजी नगराध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांच्या ७१ व्या वाढदिवसानिमित्त विद्यामंदिर परिवार व लायन्स क्लब, सांगोला आयोजित भव्य रक्तदान शिबिरात दि.२० मे लोणविरे १३५, दि.२२ मे नाझरा २२५ व दि.२३ मे रोजी कोळा येथे १४० व सांगोला येथे ५४५ असे एकूण १०४५ रक्तदात्यांनी रक्तदान करून मानवतेच्या कल्याणाचे अनमोल कार्य केले.

सांगोला येथील रक्तदान शिबिराच्या सुरुवातीला कै.गुरुवर्य



बापूसाहेब झपके यांच्या तैलचित्रास डॉ.शैलेश डोंबे यांचे हस्ते पुष्पहार समर्पित करण्यात आला. त्यानंतर ॲ.ड. उदयबापू घोंगडे, डॉ. शैलेश डोंबे, सुहास होनराव, विलास क्षीरसागर, सी.ए. उत्तम बनकर, चंद्रशेखर अंकलगी, प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापिका शहिदा सय्यद, सांगोला लायन्स क्लबचे उन्मेष आटपाडीकर, अजिंक्य झपके, नरेंद्र होनराव, कॅबिनेट ऑफिसर ब्लड डोनेशन कॅम्प प्रा.धनाजी चव्हाण यांच्या उपस्थितीत शिबिराचे उद्घाटन झाले. या शिबिरासाठी मल्लिकार्जुन घोंगडे, ड.विजयसिंह चव्हाण, दिगंबर जगताप, विद्यामंदिर परिवारातील प्रशासकीय अधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, लायन्स क्लब सांगोला पदाधिकारी, सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर शिबिराला आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख, गिरीश नष्टे, बाळासाहेब झपके, डॉ.जीवनमुक्ती डोंबे, सांगोला नियत क्षेत्र वनअधिकारी वनिता इंगोले, डॉ.विनित दिघे, डॉ.अनिकेत नवत्रे यांनी भेट दिली. या शिबिरासाठी रेवनील ब्लड बँक सांगोला, सिद्धेश्वर ब्लड बँक सोलापूर,एम.एस. ब्लड बँक सांगली यांचे मोलाचे सहकार्य लाभले. प्रास्ताविक प्रा.अमोल गायकवाड, सूत्रसंचालन प्रा.धनाजी चव्हाण यांनी केले. आभार उन्मेष आटपाडीकर यांनी मानले.

# क्रीडा

## खेलो इंडिया पदक प्राप्त खेळाडूंचा सत्कार

### सोलापूर शहर शारीरिक शिक्षण व क्रीडाशिक्षक महासंघाचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मे-**

सोलापूर शहर शारीरिक शिक्षण व क्रीडाशिक्षक महासंघाच्या वतीने खेलो इंडिया पदक प्राप्त आणि दहावी व बारावी गुणवंत ३० खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. हा सत्कार सोहळा हॉटेल सिटी पार्क येथे वटवृक्ष स्वामी महाराज मंदिराचे प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते व सोलापूर स्पोर्ट्स फेडरेशनचे जिल्हाध्यक्ष शिवछत्रपती पुरस्कार विजेते महेशजी गादेकर यांच्या अध्यक्षतेखाली झाला. यावेळी सॉफ्टबॉल संघटनेचे जिल्हाध्यक्ष सिद्धेश्वर पाटील , बेसबॉल संघटनेचे जिल्हाध्यक्ष नगरसेवक सीए विनोद भोसले, स्पीड बॉल संघटनेचे जिल्हाध्यक्ष वैजिनाथ हत्तुरे , क्रीडा शिक्षक महासंघाचे शहर अध्यक्ष प्रा. संतोष खेंडे, खजिनदार गंगाराम घोडके व सचिव सुहास छंचुरे



आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी महासंघाचे राज्याचे समन्वयक भारत इंगवले जिल्ह्याचे संचालक विष्णू दगडे, शहर संघटनेचे कार्याध्यक्ष राजाराम शितोळे, उपाध्यक्ष वसीम शेख, अजित पाटील, सहसचिव श्रीधर गायकवाड, रवींद्र चव्हाण, संचालक प्रबुद्ध चिंचोलीकर, विठ्ठल सरवदे, ओंकार पुजारी हे उपस्थित होते.

### खेलो इंडिया पदक प्राप्त खेळाडू

आकृती सोनकुसरे ( लॉन टेनिस, सुवर्ण) प्रथमेश कस्तुरे, आदित्य निकते ( तलवारबाजी, सुवर्ण), श्रुतीका चव्हाण (तलवारबाजी वैयक्तिक स्पर्धेत सुवर्णपदक) ओम अंगडी (राष्ट्रीय तलवारबाजी, सहभाग ), प्रणिती नागणे (खेलो इंडिया सेपक टकरा, कांस्य ).

### दहावी व बारावी गुणवंत खेळाडू

स्नेहा घोडके, अथर्व खेंडे, महेश हेडे, नक्षत्र कदम, प्रज्वल माळी, प्रसाद काटकर, किरण दराडे, विजयकुमार व्हसुरे, यथार्थ पाटील, श्रवण लंबाटे, महेश तेली, समीक्षा वाघमैतर, गौतमी वाघमैतर, सलगर श्रेया , नम्रता टिमगिरे, सार्थक पोकळे ,स्वरित झाडकर, गुरव अर्चित , पवित्रा चांदोडे, कामरान मोहम्मद, इक्बालबाल दलाल.

## सिध्देश्वर एक्सप्रेस केसरीचा मानकरी ठरला नेपाळचा देवा थापा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मे -**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप येथे श्री सिद्धेश्वर एक्सप्रेस न्यूज चॅनलच्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त झालेल्या कुस्ती स्पर्धेत नेपाळचा देवा थापा याने हिमाचल प्रदेश केसरी नवीन चव्हाण यास चीतपट केले.

त्यास एक लाख ११ हजार रूपयांचे पारितोषिक देण्यात आले. श्री मळसिध्द मंदिर परिसरात मॅटवर शंभर रुपयांपासून एक लाख ११ हजार रुपयापर्यंत कुस्त्या झाल्या. दक्षिण सोलापूर तालुका पत्रकार असोसिएशनचे संस्थापक रेवणसिध्द मेडगुदले यांनी याचे आयोजन केले होते. मंद्रूप मठाचे निरंजन देवरू, महात्मा बसवेश्वर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष श्रीशैल हत्तुरे व कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मनीष



देशमुख यांच्या हस्ते याचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी बाजार समितीचे संचालक अतुल गायकवाड, माजी कृषी सभापती आप्पाराव कोरे, उपसरपंच भगवान व्हनमाने, बाबुराव मेंडगुदले, ग्रामपंचायत सदस्य शिवानंद लोभे, शिवपुत्र जोडमोटे, सुरेश टेळे, पैलवान दयानंद ख्याडे, ग्रामसेवक नागेश जोडमोटे, अनिल जोडमोटे, निलेश जोडमोटे, सोनेंद्र नवले, शाजन बागवान, रविकुमार मेंडगुदले, रमेश वाघमोडे, भंडारकवठेचे हणमत पुजारी, वस्ताद विठ्ठल बंडगर, इंजिनिअर प्रविण कुंभार, सुभाष मेंडगुदले, कंदलगावचे ग्रामपंचायत सदस्य सोमनाथ जोकारे, गौरीशंकर मेंडगुदले, माजी सरपंच विश्वनाथ हिरमठ, राधा ज्वेलर्स सतीश वेर्णेकर, ओम मुंजे, मदगोंडेश्वर मठाचे महाराज अमोगसिध्द पुजारी आदी उपस्थित होते.

## शिवकालीन मर्दानी क्रीडा प्रकारांना राजाश्रय मिळाला पाहिजे

**लाठी काठी, दांडपट्टा व तलवारबाजी शिबिराप्रसंगी माजी महापौर मनोहर सपाटे यांचे प्रतिपादन**





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मे-**

ऐतिहासिक व सांस्कृतिक कला क्रीडा प्रकार जपले पाहिजे वाढविले पाहिजे. शिवकालीन पारंपरिक क्रीडा प्रकारांना राजाश्रय मिळाला पाहिजे. अन्य क्रीडा प्रकाराप्रमाणे याही खेळांना शासनाने मान्यता दिली पाहिजे. अशा प्रकारच्या शिबिराच्या आयोजन हे स्तुत्य असून सर्वच शाळा महाविद्यालयात याचे आयोजन झाले पाहिजे, असे प्रतिपादन माजी महापौर मनोहर सपाटे यांनी केले.

मराठा समाज सेवा मंडळ संचलित छत्रपती शिवाजी शिक्षण संकुल व रुद्र शक्ती गुरुकुल बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने शिवकालीन मर्दानी क्रीडा प्रकार शिबिराचे आयोजन छत्रपती शिवाजी शिक्षण संकुल येथे करण्यात आले होते. याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी रुद्र शक्ती गुरुकुलचे अध्यक्ष योगनाथ फुलारी, प्रा महेश माने, प्रा. संतोष गवळी, सकल मराठा समाज समन्वयक माऊली पवार, विद्यापीठ सिनेट व व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा सचिन गायकवाड, क्रीडाशिक्षक मारुती घोडके नितीन गोरे, दत्ता सुतार, दत्ता भोसले, प्रशांत राणे व प्रशांत जाधव आदी उपस्थित होते. या शिबिरामध्ये ११० विद्यार्थ्यांनी नावे नोंदवली असून मुख्य प्रशिक्षक म्हणून विवेक मिस्कीन व त्यांचे सहकारी मार्गदर्शन करीत आहेत.



## राज्य टेनीक्काईट पंच परीक्षेत सोलापूरचे चौघे उत्तीर्ण

**सोलापूर, दि.२३ मे -**

भारतीय शालेय क्रीडा महासंघ मान्यताप्राप्त भारतीय टेनिक्काईट महासंघाच्या मान्यतेने महाराष्ट्र टेनीक्काईट असोसिएशन यांच्या वतीने बारामती येथे झा लेल्या राज्यस्तरीय टेनीक्काईट पंच परीक्षेत सोलापूर शहर व जिल्ह्यातील ४ क्रीडा शिक्षक उत्तीर्ण झाले.

त्यांना महाराष्ट्र टेनिक्काईट असोसिएशनचे अध्यक्ष माजी आमदार मोहन जोशी, महासचिव अनिल वरपे यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. त्यांचे जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार व जिल्हा टेनीक्काईट असोसिएशनचे अध्यक्ष भीमराव बाळगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी सचिव इक्बाल शेख, माजी क्रीडाअधिकारी सत्येन जाधव, सहसचिव धनंजय धेंडे आदी उपस्थित होते.

### उत्तीर्ण झालेले पंच असे

विष्णू दगडे ( गगनगिरी विद्यालय सांगवी, ता. पंढरपूर), सागर नरोनी (पंचाक्षरी विद्यालय माळकवठे, ता. दक्षिण सोलापूर), बापूराव बाबर, (वेताळ विद्यामंदिर शिर्डी, ता. मंगळवेढा), मनोज बाळगे, स्वामीनारायण गुरुकुल कुंभारी, ता.दक्षिण सोलापूर).

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





सोलापूर : शिवसेनेच्या बैठकीत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचा व जिल्हा संपर्कप्रमुख अनिल कोकीळ यांचा सत्कार करताना उपजिल्हाप्रमुख दत्तात्रय गणेशकर, अजय दासरी, संतोष केगनाळकर, दत्ता माने आदी पदाधिकारी.

# दुसऱ्याच्या आनंदात आनंद हेच अध्यात्मिक प्रगतीचे लक्षण

## निरूपणकार विवेक घळसासी : भागवत कथा ज्ञानयज्ञ, पाचवे पुष्प

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ मे-**

प्रत्येक जीवमात्रामध्ये ब्रह्मांड सामावलेले आहे. याच ब्रह्मांडाचा नायक असणारा ईश्वर समजण्यासाठी आयुष्य आहे. श्रीकृष्णानेही आवतारकार्यात मिळालेल्या आयुष्याचा सदुपयोग करताना दुसऱ्याला आनंदच दिला. श्रीकृष्णांकडे ६४ गुण होते. रूप, लीला, वेणू व प्रिया माधुरी हे चार गुण श्री नारायणापेक्षा जास्त श्रीकृष्णाकडे होते. प्रभू श्रीराम हे सुध्दा उत्तम संस्कारी पुत्र, आदर्श पती, विवेकी शिष्य, प्रेमळ बंधु व विवेकपूर्ण राजा होते. त्यांनीसुध्दा प्रजेच्या आंनदातच आनंद मानला. त्यामुळे प्रत्येकाने दुसऱ्याच्या आनंदातच आपला आनंद व्यक्त केला तर ते आध्यात्मिक प्रगतीचे लक्षण ठरेल असे प्रतिपादन निरूपणकार विवेक घळसासी यांनी केले.



जुळे सोलापूर येथील द्वारकाधिश मंदिरात जवळगेकर परिवारातर्फे श्रीमद भागवत कथा ज्ञान य़ज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. पाचवे पुष्प गंफताना श्री. घळसासी बोलत होते.

आजच्या कथेची सुरूवात प्रमुख जिल्हा न्यायाधिश मनोज शर्मा यांच्या हस्ते ग्रंथपूजन तर भाजपाच्या नूतन शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर व रामभाऊ तडवळकर यांच्या हस्ते व्यासपीठ पूजनाने झाली. यावेळी माजी नगरसेविका संगिता जाधव, आश्लेषा निपुणगे, न्यायाधिश सोनाली जवळगेकर, दिलीप जवळगेकर, दिपाली जवळगेकर, संदिप जवळगेकर, कंतकी जवळगेकर, कपिल जवळगेकर, सुनिल देशपांडे, सुप्रिया देशपांडे, मंदिराचे व्यवस्थापक दत्तात्रय पाठक आदिसह भाविक उपस्थित होते. कथेच्या सुरूवातीला स्थानिक कलाकरांनी भक्तीगीत सादर केले. श्री. घळसासी यांनी आपल्या ओघवत्या वाणीतून श्रीरामाची कथा सांगताना राजा कसा असावा व प्रजेने राजाकडून कोणत्या अपेक्षा कराव्यात याचे खुमासदार वर्णन केले. श्रीकृष्ण कथा सांगताना श्रीकृष्णांच्या लीलांचं रसभरीत वर्णन त्यांनी केले. भारतीय परंपरेत देवाच्या आवताला विशेषे महत्व असल्याचे सांगून त्यांनी श्रीरामाने व श्रीकृष्णाने आपल्या आवतार काळात दुष्टांचा संहार करण्याचे काम केले. त्याचवेळी भक्तांचा सांभाळही केल्याचे सांगितले. श्रीकृष्णाचा जन्म मथुरेत तुरूंगात झाला तर श्रीरामाचा जन्म अयोध्येत राजवाड्यात झाला. श्रीकृष्णाला गोकुळात नेताना त्याचे वडील वसुदेवांना झालेला त्रास, त्यातून सुखरूप गोकुळात पोचल्यानंतर तेथे गोकुळवासियांना झालेला आनंद श्री. घळसासी यांनी खुलवून सांगितला. श्रीकृष्णाने बालपणीच आपल्या आवताराचे प्रयोजन दाखवताना पुतणेचा केलेला वध हि एक दिव्य घटना असल्याचे त्यांनी सांगितले. श्रीकृष्ण कथा मनाला भुरळ घालणारी आहे. आकृष्ट करतो तो कृष्ण आहे. त्यामुळे गोकुळातील सर्व गोपिका त्याच्याकडे आकृष्ट होत. गोपिकांसह अजूनही अनेक भक्त त्याच्या भक्तीत आकृष्ट होऊन तल्लीन होतात. श्रीकृष्णाने केलेल्या अनेक लिलांचे वर्णन ऐकताना त्या कितीही वेळा ऐकल्यातरी ऐकूच वाटतात. श्रीकृष्णाने गोवर्धन उचलून धरला ही एक मोठी लिला आहे. त्या काळात लोकांना निसर्गपूजनासाठी प्रवृत्त करणारा कृष्ण होता असेही श्री. घळसासी यांनी सांगितले. शेवटी भागवताची आरती होऊन प्रसाद वाटपानंतर आजच्या दिवसाच्या कथेचा समारोप झाला.

## ▶▶ महत्वाचे...

### चक्कर येऊन पडलेल्या व्यक्तीचा उपचारापूर्वीच मृत्यू

**सोलापूर, दि. २३ मे-**

बोलत थांबला असता अचानक चक्कर येऊन पडल्याने बेशुध्द झालेल्या व्यक्तीचा उपचारापूर्वी मृत्यू झाला. हा प्रकार शुक्रवारी सकाळी ११.३० वाजता एसटी स्टॅन्ड परिसरात घडला.प्रदीप पांडुरंग आबुटे (वय ५५, रा. विजापूर रोड, सोलापूर) असे मृत पावलेल्या व्यक्तीचे नाव आहे. प्रदीप हा शुक्रवारी सकाळी ११.३० वाजता सोलापूर एसटी स्थानकासमोरील रिक्षा स्टॉप येथे मित्रांशी बोलत थांबला होता. त्यावेळी त्याला अचानक चक्कर येऊन तो खाली पडला. यात त्याची शुध्द हरपल्याने त्याला ११.५५ वाजता भाऊ दुष्यंत यांनी उपचाराकरीता शासकीय रुग्णालयात दाखल केले असता, उपचारापूर्वी त्याचा मृत्यू झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### इंदिरा नगरात मुलाने पत्नीसह वडीलांना केली मारहाण

**सोलापूर, दि. २३ मे-**

कौटुंबिक कारणातून राहत्या घराजवळ मुलाने पत्नीसह वडीलांना मारहाण केली. ही मारहाण इंदिरा नगरात शुक्रवारी सकाळी आठ वाजता झाली.विजय हणमंत चौगुले (वय ५२, रा. इंदिरा नगर, सोलापूर) असे मारहाण झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. विजय राहत असलेल्या इंदिरा नगरातील घरात त्यांची आणि मुलगा संदिप व सून यांच्याबरोबर तक्रार झाली होती. या तक्रारीनंतर मुलगा संदिप आणि त्याची बायको या दोघांनी लाकूड तसेच फरशीने मारहाण केल्याने डोक्यात जखम झाली. तसेच सर्वांगास मुकामार लागल्याने सकाळी ९.१५ वाजता स्वत: शासकीय रुग्णालयात दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### उलट्या येऊन बेशुध्द पडलेल्या व्यक्तीचा मृत्यू

**सोलापूर, दि. २३ मे-**

राहत्या घरी असताना अचानक उलट्यांचा त्रास होऊन बेशुध्द पडलेल्या व्यक्तीचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. ही घटना गुरुवारी रात्री ९.१५ च्या सुमारास घडली. अरविंद शिवाजी तळभंडारे (वय ५१,रा. मिलिंद नगर, बुधवार पेठ, सोलापूर) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. गुरुवारी रात्री ९ च्या सुमारास अरविदं हे बुधवार पेठेतील त्यांच्या राहत्या घरी असताना, त्यांना अचानक उलट्यांचा त्रास होऊ लागला. त्यातच त्यांची शुध्द हरपल्याने ते बेशुध्द पडले. बेशुध्द अवस्थेत त्यांना मुलगा दिक्षांत याने रात्री ११.४० वाजता शासकीय रुणायात उपचारास दाखल केले, परंतु उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### रिक्षा पलटी होऊन तीन महिन्याचे बाळ जखमी

**सोलापूर, दि. २३ मे-**

बेडरपूल ते म्हेत्रे वस्ती असे जाताना रिक्षा पलटी झाल्याने तीन महिन्याच्या बाळाच्या डोक्याला मुकामार लागला आहे. ही घटना गुरुवारी रात्री १० च्या सुमारास घडली. वेदिका संजय गोरलेवाले (वय ३ महिने) असे बाळाचे नाव आहे. वेदिका ही आईसोबत गुरुवारी रात्री दहाच्या सुमारास रिक्षातून म्हेत्रे वसतीच्या दिशेने जात होती. रिक्षा म्हेत्रे वस्तीच्या जवळ आल्यानंतर अचानक पलटी झाली. यात वेदिकाच्या डोक्याला मुकामार लागल्याने रात्री ११.४५ वाजता आजी संगिता यांनी उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील चौकीत झाली आहे.

# जनता बँकेच्या शिबिरात २१२ जणांचे रक्तदान

## बँकेच्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्त आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मे-**

सोलापूर जनता सहकारी बँकेच्या रक्तदान शिबिरात गुरुवारी २१२ जणांनी रक्तदान केले. बँकेच्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्त शिवस्मारकच्या प्रांगणात हे शिबीर झाले. यावेळी प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लोकांसाठी राबविल्या जात असलेल्या गृहप्रकल्पातील सभासदांना गृहकर्ज मंजुरीपत्राचे वितरणही करण्यात आले.

सोलापूर जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे यांच्या हस्ते रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे म्हणाले, सोलापूर जनता सहकारी बँकेला अर्थकारणाबरोबरच सामाजिक उपक्रमांचा मोठा इतिहास आहे. सर्वसामान्य माणसांच्या आर्थिक प्रगतीसाठी हातभार लावत असतानाच समाजाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी बँकेतर्फे विविध उपक्रम ांचे आयोजन करण्यात येते.



याप्रसंगी राष्ट्रतेज अटल कामगार गृहनिर्माण सहकारी संस्था मर्यादित दहिटणे आणि श्री सोमवंशिय सहस्त्रार्जुन क्षत्रिय समाज महालक्ष्मी गृहनिर्माण संस्था मर्यादित दहिटणे येथे प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लोकांसाठी राबविले जात असलेल्या गृहप्रकल्पातील सभासदांना गृहकर्ज मंजुरीपत्राचे वितरण करण्यात आले. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील वर्गाला अत्यल्पदरात घर उपलब्ध व्हावे म्हणून बँकेतर्फे पात्र सभासदांना अत्यल्प व्याजदरात गृहकर्ज उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. आजतागायत बँकेने सदर प्रकल्पांमधील घरकुलांसाठी शंभरहून अधिक प्रकरणांचे गृहकर्ज वितरण जलदगतीने केलेले आहे. त्यामुळे सदर लाभार्थ्यांना लवकरच त्यांच्या स्वप्नातील घर मिळणार आहे, असे बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे यांनी सांगितले.

याप्रसंगी बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे, संचालक प्राचार्य गजानन धरणे, तज्ञ संचालक अॅड. प्रदीपसिंग राजपूत, तज्ञ संचालक सी. ए. गिरीष बोरगावकर, संचालक रवींद्र साळे, श्री सोमवंशिय सहस्त्रार्जुन क्षत्रिय समाज महालक्ष्मी गृहनिर्माण संस्था मर्यादित दहिटणेचे सचिव राजेंद्र काटवे, बँकेचे सरव्यवस्थापक प्रदीप बुट्टे, उपसरव्यवस्थापक अंजली कुलकर्णी, उपसरव्यवस्थापक देवदत्त पटवर्धन, उपसरव्यवस्थापक मकरंद जोशी, मुख्य कार्यालयातील अधिकारी म दन मोरे, डॉ. हेडगेवार रक्तपेढीचे कोषाध्यक्ष सुहास जोशी उपस्थित होते. गृहनिर्माण संस्थेचे संचालक बाळकृष्ण मेहरवाडे, अनुकृती डेव्हलपर्सचे डी. एल. पवार, एस. बी. महिंद्रकर, राजेश दिड्डी उपस्थित होते. यावेळी प्रातिनिधिक स्वरूपात अक्षय रंगरेज, ज्योती काटवे, नागम णी काटवे, संदीप गांगजी, गणेश शिरगिरी, विशाल शिरगिरी, विकास काटवे, रूपा श्रवाण, प्रमोद चव्हाण यांना कर्जमंजुरी पत्र देण्यात आले. भाजपाच्या नूतन शहर अध्यक्षा रोहिणी तडवळकर यांनी पदभार घेतल्यानंतर पहिलाच सार्वजनिक कार्यक्रम म्हणून जनता बँकेच्या रक्तदान शिबिरास भेट दिली.

डॉ. हेडगेवार रक्तपेढीने रक्तसंकलन केले. याप्रसंगी गणेश राम चंद्र आपटे फर्मचे आपटे, बाळासाहेब वाघमारे, माणिकलाल नरोटे, शहाजी सलगर, युनिटी मल्टीकॉनचे कपिल मौलवी, करकमकर, बँकेचे सर्व शाखा व्यवस्थापक, अधिकारी, कर्मचारी, सभासद व हितचिंतक बहुसंख्येने उपस्थित होते. बँकेचे अधिकारी सुहास मुळजकर यांनी सूत्रसंचालन केले.

# प्रॉप्रटीच्या कारणातून चुलत भावावर चाकूने जीवघेणा हल्ला

## उत्तर कसब्यात घडला थरार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ मे-**

प्रॉपटीच्या कारणातून चुलत भावांमध्ये सुरु असलेला वाद जीवघेणा हल्ला करण्यापर्यंत पोहचला असून हा थरार गुरुवारी रात्री ९ च्या सुमारास उत्तर कसब्यातील संगमेश्वर दूध डेअरी परिसरात घडला. याप्रकरणी आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्यावर फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

सिध्देश्वर राजेशखर बागदुरे (वय ३६, रा. उत्तर कसबा, बाळीवेस, सोलापूर) असे हल्ला झालेल्याचे नाव आहे. तर राहुल चंद्रशेखर बागदुरे (वय २५, रा. विजापूर रोड, सोलापूर) असे हल्ला करणा-या चुलत भावाचे नाव आहे. बागदुरे कुटुंबात काका व पुतण्यामध्ये प्रॉप्रटीवरून वाद सुरु आहे. परंतु आता हा वाद चुलत भावांमध्ये पेटला आहे. गुरुवारी रात्री ९ च्या सुमारास यातील जखमी सिध्देश्वर हा संगमेश्वर दूध डेअरी परिसरात थांबला होता. त्यावेळी हातात चाकू घेऊन आलेल्या राहुलने त्याला जीवे मारण्याच्या उदेशाने त्याच्या मानेवर आणि पाठीवर जोराने वार केले. यात मानेजवळील चाकूने केलेली जखम ही गंभीर असल्याचे पोलिसांनी सांगितले. दरम्यान ही घटना घडल्यानंतर परिसरात बघ्यांची मोठी गर्दी जमली. याबाबत माहिती मिळताच फौजदार चावडी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अरविंद माने हे पोलीस पथकासह घटनास्थळावर दाखल झाले. त्यांनी आरोपीला हत्यारासह ताब्यात घेतले. तसेच घटनास्थळ परिसरात पोलिसांचा बंदोबस्त लावण्यात आला. पोलिसांनी जखमी सिध्देश्वर यास शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले आहे.



# पोलिस आयुक्तालयात ‘कोटपा’ कायदेविषयक कार्यशाळा संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मे-**

सोलापूर शहर पोलिस आयुक्तालय येथे राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कक्ष, ग्रामीण विकास संस्था, छत्रपती संभाजी नगर व जिल्हा रुग्णालय, सोलापूर शहर यांचे समन्वयाने कार्यशाळा घेण्यात आली.

या कार्यशाळेचे उद्घाटन सहायक पोलिस आयुक्त राजन माने यांचे हस्ते करण्यात आले. या कार्यशाळेचे सूत्रसंचालन पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे यांनी केले. या कार्यशाळेस जिल्हा शल्यचिकित्सक सुहास माने, यांनी मार्गदर्शन केले. तसेच मराठवाडा ग्रामीण विकास संस्थेचे प्रकल्प संचालक आप्पासाहेब उगले यांनी कोटपा अधिनियम २००३ मधील विविध कलमांबाबत माहिती देवून, नमूद कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यानंतर प्रकल्प अधिकारी श्रीमती निकीता गायकवाड यांनी टोबॅको बर्डन याबाबत, तसेच श्रीमती मंजुश्री मुळे यांनी डी.टी.सी.सी. बाबत उपस्थितांना माहिती दिली. त्यानंतर विभागीय व्यवस्थापक श्रीमती अन्नपुर्णा ढोरे यांनी आभार व्यक्त करुन कार्यशाळेस उपस्थित सर्व उपस्थितांना तंबाखू विरोधी शपथ दिली.कार्यशाळेसाठी पोलिस आयुक्तालयातील सर्व पोलिस ठाणे व शाखेकडील पोलीस अधिकारी व अंमलदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यशाळेसाठी विशेष सहकार्य डॉ. स्वप्नपरी दळवी, अमित महाडीक, पोलीस अंमलदार सिद्धाराम देशमुख व अजय गुंड यांनी केले.

# सोलापूरात शिवसेनेचे भारतीय सेना के साथ तिरंगा रॅली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मे -**

पहलगाम येथे पाकिस्तानी दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात २६ निरपराध पर्यटकांची हत्या झाली.या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तीनही सैन्य दलांना पूर्णपणे मुभा देत ऑपरेशन सिंदूर अंतर्गत थेट प्रतिहल्ला करून सडेतोड उत्तर दिले. त्यामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार लष्करी कारवाई दरम्यान भारतीय सैन्याने दाखविलेल्या अतुलनीय शौर्याच्या सन्मानार्थ व शहीद विरांना अभिवादन करण्यासाठी शिवसेनेच्या वतीने तिरंगा रॅली काढण्यात आली.

‘भारतीय सेना के साथ शिवसेना’ या आशयानुसार निघालेल्या रॅलीत मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते. माजी सैनिक संघटना अध्यक्ष




अरुण तळखेडे, सचिव काकासाहेब काशीद, संचालक रणजीत निमगिरे, सुधाकर पोळ, मल्लिनाथ हणमशेट्टी, रावसाहेब काशीद, काशिनाथ बनसोडे आदींनी सहभाग नोंदविला. तसेच लोकसभा संपर्क प्रमुख महेश साठे, शहर प्रमुख सचिन चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली शासकीय विश्रामगृह येथून सुरू होऊन ते चार हुतात्मा पुतळा येथे समारोप झाला.या तिरंगा रॅलीत लोकसभा महिला संपर्कप्रमुख अनिता माळगे, जिल्हाप्रमुख प्रियंका परांडे, शहर समन्वयक दिलीप कोल्हे, शहर सचिव सायबण्णा तेग्गेळ्ळी, स्वामीनाथ हेगडे, व्हिजेएनटी जिल्हा उपप्रमुख अंकुश कदम, महिला कामगार सेना जिल्हाप्रमुख वैशाली हावनूर, संघटक संगिता खांबसकर, युवती जिल्हा चिटणीस अर्चना पानसरे, सल्लाउद्दीन शेख, सोहेल शेख, अल्पसंख्यांक सेल शहरप्रमुख गफूर शेख, अल्पसंख्यांक शहर मोईन शेख, गणेश परदेशी, योगेश माळगे, अमोल भोसले, सारंग साठे, विश्वास माळगे, विश्वास वसेकर आदी बहुसंख्येने उपस्थित होते.

# आसरा समांतर उड्डाणपूलाचे काम सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ मे-**

आसरा येथील उड्डाण पुलासाठी आमदार सुभाष देशमुख यांनी यांचे दीड वर्षाचे प्रयत्न अखेर यशस्वी झाले आहेत. अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर या समांतर पुलाचे भूमिपूजन झाल्यानंतर आता शुक्रवार, दि. २३ पासून प्रत्यक्ष कामाला सुरूवात झाली आहे. महापालिकेची स्ट्रीट लाईट काढण्यात आले असून आता लवकरच एमएसईबीचे पोलही काढण्यात येणार आहेत.

**काम चांगले आणि दर्जेदार करा : आ. देशमुख**


येत्या वर्षभराच्या कालावधीत हा पूल पूर्ण होणार आहे. काम चांगले आणि दर्जेदार करा. याशिवाय लवकरात लवकर करा, अशा सक्त सूचना दिल्या. दिलेल्या मुदतीच्याआधी काम पूर्ण केले तर आनंदच होईल, असेही आ. सुभाष देशमुख म्हणाले.

आसरा समांतर उड्डाण पुलासाठी केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी २०२३ मध्ये ३२ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता. मात्र या पुलाचे काम करताना महापालिकेच्या जलवाहिनीचा अडथळा येणार होता. ती जलवाहिनी स्थलांतरित करण्यासाठी तब्बल दहा ते बारा कोटींची आवश्यकता होती. मात्र पैसे नाहीत म्हणून महापालिकेने हे काम करण्यास नकार दिला. त्यानंतर रेल्वे प्रशासनानेही हात वर केले होते.आमदार सुभाष देशमुख यांनी राज्य शासनाकडून हे १२ कोटी रुपये मिळवण्यासाठी प्रस्ताव पाठवला होता मात्र येथेही विलंब झाला. त्यामुळे हे आसरा पुलाचे काम रखडले होते. मात्र त्यानंतर आमदार सुभाष देशमुख यांनी पाईपलाईन स्थलांतरित न करता पूल कसा करता येईल याबाबत रेल्वे अधिकारी, महापालिका अधिकारी , नॅशनल हायवे यांच्यासह अनेकांच्या बैठका घेतल्या. त्यासाठी एक समितीही स्थापन केली. त्यानुसार महापालिकेची पाईपलाईन हस्तांतरित न करता हा पूल कसा करता येईल याचा प्लान तयार केला आहे. त्यानंतर अक्षय तृतीया मुहूर्तावर आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते या पुलाचा या पुलाचे भूमिपूजन पार पडले.

## महापालिकेच्या स्ट्रीटलाईटचे पोल काढण्यास सुरूवात

आता शुक्रवारपासून कामाला सुरूवात झाली आहे. या रस्त्यावर मोठ्याप्रमाणात झाडे आहेत. झाडे काढण्याची परवानगी पर्यावरण विभागाकडून मिळाली नव्हती. आता ती परवानगी मिळाली आहे. त्यामुळे आता काम सुरू करण्यात आले आहेत. शुक्रवारी या रस्त्यावरील स्ट्रीट लाईटचे पोल काढण्यात आले आहेत. त्यानंतर एक-दोन दिवसात एमईसीबीचे पोलही काढण्यात येणार आहे. हे पोल काढण्यात आल्यानंतर झाडेही काढण्यात येणार आहेत. त्यानंतर पुलाच्या कामाला सुरूवात होणार आहे.






हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत


## अर्थसंकल्पाविषयी सर्व काही पुस्तकाचे रविवारी प्रकाशन

**सोलापूर, दि.२३ मे-**
डॉ. संतोष कदम लिखित अर्थसंकल्पाविषयी सर्वकाही... या पुस्तकाचे प्रकाशन रविवार, दि. २५ मे रोजी होणार आहे, अशी माहिती डॉ. गौतम कांबळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

रविवारी सकाळी १०:३० वाजता हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या ॲम्फी थिएटर हा कार्यक्रम होणार आहे. शिवाजी विद्यापीठातील माजी अधिष्ठाता प्रा. डॉ. वसंत जुगळे यांच्या हस्ते हा कार्यक्रम होणार आहे. यावेळी महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे हे प्रमुख पाहुणे असतील तर सोलापूर विभागाचे माजी अतिरिक्त आयकर आयुक्त प्रकाश कोळी हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य एम. डी. कमळे, संतोष भीमराव पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. एन. जगताप आदी उपस्थित राहतील, या वेळी प्रकाशक प्रा. मंदार फडके विचार व्यक्त करतील. लेखक डॉ. संतोष कदम यांनी पुस्तकाबाबत






सांगितले की, अर्थसंकल्पातील माहिती सामान्य लोकांना समजावी, अर्थसंकल्पात तरतुदी करताना कोणत्या बाबी लक्षात घेतल्या जातात, अर्थसंकल्पाचे सादरीकरण आणि अर्थसंकल्पाची अंमलबजावणी कशी केली जाते, यासह अर्थसंकल्पाविषयीची संपूर्ण माहिती या पुस्तकात आहे. या पत्रकार परिषदेला नितीन तळेकर, प्रा. दत्तात्रय चव्हाण, फडके प्रकाशनचे प्रवीण भोसले उपस्थित होते.

## ▶▶ महत्वाचे...

### कार्यालय फोडून तीन लाखांचे साहित्य चोरीस

**सोलापूर, दि. २३ मे-**
कुमठे रोडवरील कार्यालय फोडून चोरट्याने तीन लाख रुपये किंमतीचे सोहित्य चोरून नेले. याबाबत अनिल हणमंतु कोळी (वय ३१, रा. गणेश नगर, विजापूर रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. अनिल कोळी यांचे कुमठे रोडवर कार्यालय आहे. २० मे रोजी रात्री या कार्यालयाच्या उघड्या खिडकीतून चोरट्याने प्रवेश करून कार्यालयातील दोन स्लरी पंप, २ नग १० एचपी पंप, २ नगर हावेल्स कंपनीचे पंप, दोन नग हावेल्स कंपनीचे पंप, एक एचपी पंप, दोन कॉपर प्लेट, नटबोल्ट असा तीन लाख एक हजार किंमतीचे साहित्य चोरून नेले. याबाबत विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

### मनपा झोन कार्यालयाच्या आवारातून बॅटरी चोरीस

**सोलापूर, दि. २३ मे-**
शहरातील महानगरपालिकेच्या झोन कार्यालय क्र. १ च्या आवारातून ६ हजार रूपये किंमतीची बॅटरी चोरट्याने चोरून नेली. याबाबत प्रसाद विजयकुमार देवरमणी (वय ३३, रा. नितीन नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रसाद देवरमणी यांनी सोलापूर मनपा विभाग १ कार्यालयाच्या आवारात पार्किंग केलेल्या एमएच १३ एएक्स २४०६ क्रमांकाच्या वाहनावरील ६ हजार रुपये किंमतीची बॅटरी २१ मे च्या रात्री चोरट्याने चोरून नेली. हवालदार बाबर पुढील तपास करीत आहेत.

### मार्केट यार्डातून ४० हजारांचा मोबाईल चोरीस

**सोलापूर, दि. २३ मे-**
शहरातील मार्केट यार्ड येथे भाजी आणण्यासाठी गेलेल्या तरूणाचा ४० हजार रुपये किंमतीचा मोबाईल चोरट्याने चोरून नेला.याबाबत तरबेज निरज पठाण (वय २१, रा. विजयलक्ष्मी नगर, नई जिंदगी, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. २ एप्रिल रोजी सकाळी आठच्या सुमारास तरबेज हा मित्रासमवेत मार्केट यार्ड येथे भाजी आणण्यासाठी गेला होता. त्यावेळी चोरट्याने तरबेजचा ४० हजार रुपये किंमतीचा मोबाईल चोरट्याने चोरून नेला. हवालदार धुमाळ पुढील तपास करीत आहेत.

### रेल्वे स्टेशन येथून ३० हजारांची दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. २३ मे-**
शहरातील रेल्वे स्टेशन येथून चोरट्याने ३० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली.याबाबत माऊली प्रकाश जाधव (वय ३२, रा. तेलगाव, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. माऊली जाधव यांनी २० मे रोजी दुपारी त्यांची एमएच १३ सीवाय २७६१ क्रमांकाची दुचाकी ही रेल्वे स्टेशन येथे पार्क केली होती. त्यावेळी ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार जाधव पुढील तपास करीत आहेत.

### फाईट मारून दात पाडणाऱ्या तिघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २३ मे-**
चिडून फाईट मारून दात पाडणाऱ्या तिघांवर सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत संजय यल्लप्पा साठे (वय ४६, रा. न्यु पाच्छा पेठ, आण्णाभाऊ साठे नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पवन क्षिरसागर, सावन क्षिरसागर, आदित्य दुबे (रा. न्यु पाच्छा पेठ, सोलापूर) यांच्याविरुध्द हा गुन्हा दाखल झाला. साठे यांच्या घराबाहेर क्षिरसागर हे वारंवार उभे राहातात. २१ मे रोजी सायंकाळी संजय साठे हे क्षिरसागर यांना ते घराबाहेर उभे राहतात याचा जाब विचारण्यासाठी गेले असता क्षिरसागर यांनी चिडून शिवीगाळ करून हाताने व लाथाबुक्क्याने मारहाण केली. सावन क्षिरसागर याने साठे यांच्या तोंडावर फाईट मारून त्यांच्या तोंडातील समोरील दात पाडून जखमी केले. तसेच साठे यांना वाचविण्यासाठी त्यांची पत्नी आली असता त्यांनाही हाताने मारहाण करून साठे यांचा मुलगा रोहन यास पवन क्षिरसागर याने डोक्यात कानाजवळ मारून जखमी केले. पोलिस उपनिरीक्षक बनकर तपास करीत आहेत.






# योग आणि खेळांना जीवनात स्थान द्या

• अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह

## तयारी योग दिनाची दोन दिवसीय योग अभ्यास शिबिरास सुरवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मे-**
तपश्चर्या आणि आत्मसंयमाने शरीर निरोगी आणि मन शांत होते. आणि यासाठी एक प्रमुख माध्यम म्हणजे योग आणि खेळ. घर असो वा कार्यालय, शाळा असो वा उद्यान, आपल्याला व्यायाम हा जीवनाचा एक भाग बनवावा लागेल, असे प्रतिपादन अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह यांनी शुक्रवारी येथे केले. २१ जून रोजी होणाऱ्या ११व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर भारत सरकार माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रिय संचार ब्यूरो, सोलापूर आणि जिल्हा क्रीडा कार्यालय यांचे संयुक्त विद्यमाने शासकीय मैदान, नेहरू नगर येथे सकाळी ६ ते ८ वाजेपर्यंत आयोजित दोन दिवसीय योग अभ्यास शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी मोनिका सिंह बोलत होत्या.

यावेळी सहायक प्रसिद्धी अधिकारी अंबादास यादव, जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, नीर सोशल फौंडेशनचे अध्यक्ष हेमंत जाधव, न्यू जॉगर्स फौंडेशनचे अध्यक्ष संतोष आरवत्तु, माजी अध्यक्ष संतोष कदम, उद्योजक वीरेश नसले, निवृत्त अधिकारी सतीश घोडके, ज्येष्ठ पत्रकार अजितकुमार संगवे, योग सेवा मंडळाचे अध्यक्ष सुनील आळंद, विवेकानंद केंद्राचे नंदकुमार चितापुरे, स्वामी समर्थ अकॅडमीचे रवी राठोड, विराट स्पोर्ट्सचे सूर्याजी लिंगाडे, सिद्धेश्वर अकॅडमीचे अतुल शिंदे आणि आदी मान्यवर उपस्थित होते. संचार ब्यूरोच्या CBCSolapur या फेसबूक, एक्स आणि इंस्टाग्राम हँडलवरून दररोज एक योग आसनांची चित्र व मजकुरासहित माहिती देण्यात येणार आहे. त्यामुळे योग सराव करण्यास मदत होणार आहे. तसेच शिबिराच्या विविध ठिकाणी योगासनांची माहिती मोबाईलवर मिळवण्यासाठी क्यू आर कोड लावण्यात आले आहे तसेच सदर योग शिबीर दोन दिवसीय असून शनिवारी (२४ मे) रोजी देखील युवकांनी मोठ्या उत्साहाने योग शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन अंबादास यादव यांनी प्रस्ताविकेतून केले. नरेंद्र पवार यांनी आभार मानले. सूत्रसंचालन अश्विनी कोंडाबत्तीन हिने केले.

शिबिराची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आले. जितेंद्र महामुनी यांनी शंखध्वनीने योग शिबिराची सुरुवात केली. आयुष्य मंत्रालयाने नेमून दिलेल्या प्रोटोकॉल प्रमाणे योग सेवा मंडळाचे योग गुरु मनमोहन भुतडा यांनी योगासनांची माहिती दिली आणि लता माळगे, वासुंती निंबाळकर, कालिदास कोंडा यांनी शिथिली करण्याचे व्यायाम, उभी व बैठे योगासने, पोटावरील व पाठीवरील योगासने, प्राणायाम आणि ध्यान धारणाची प्रात्यक्षिके, सराव करून घेतले. दि. २४ मे रोजी सकाळी ६ ते ८ यावेळेत विवेकानंद केंद्राचे रवी कंटली आणि त्यांचे सहकारी योग अभ्यास घेणार आहेत. यावेळी केंद्रीय संचार ब्यूरोचे कार्यालय सहायक जे.एम. हन्नुरे, साईराज राऊळ, मनोज जखोटिया, काशिनाथ औरसंग, गुरुलिंग प्रचंडे, पंकज वाघमोडे, रफिक शेख, योगीराज कोंडाबत्तीन, योग सेवा मंडळाचे विद्या होनमोडे, संतोष सासवडे, दत्तगुरू वेदपाठक, सुजाता बिडकर, सुभाष जोशी आदी उपस्थित होते.

## विद्युत वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यास मारहाण

### माजी नगरसेवकाच्या मुलासह दोघांवर गुन्हा

**सोलापूर, दि. २३ मे-**
रामलाल चौकातील विद्युत वितरण कंपनीच्या कार्यालयात जाऊन कर्मचाऱ्यास शिवीगाळ करून मारहाण करणाऱ्या दोघांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत रोहित राजकर्ण घोडके (वय ३३, रा. सानवी हाईट अपार्टमेंट, वसंत विहार) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन बसवराज श्रीशैल तुप्पद आणि बापू गोविंद कोकरे (रा. काडादी चाळ, सोल) यांच्याविरुध्द हा गुन्हा दाखल आहे. २१ मे रोजी काडादी चाळ परिसरातील लाईट गेली होती. त्यामुळे विद्युत वितरण कंपनीचे कर्मचारी रोहित घोडके, त्यांचे वरिष्ठ तंत्रज्ञ सतिश शिरसट, विकास वाळके, सुनिल वाघमोडे, विद्युत सहायक रियाज शेख असे सर्वजण मिळून रात्री सव्वा दहाच्या सुमारास रेल्वे स्टेशन येथे सरकारी लाईट पोल दुरूस्तीचे काम पहात होते. त्यावेळी बसवराज तुप्पद व बापू कोकरे या दोघांनी घोडके यांच्या रामलाल चौक येथील कार्यालयात जाऊन घोडके व कर्मचारी कोठे आहे सांग, तेथे येऊन तुला बघतो, अशी शिवीगाळ करून दमदाटी करून काम सुरु असलेल्या ठिकाणी आले. त्याठिकाणी घोडके यांच्या शासकीय कामात अडथळा निर्माण करीत तुप्पद व कोकरे यांनी तुम्ही लाईट का चालू करत नाही म्हणून शिवीगाळ केली. तेवढ्यात तुप्पद याने घोडके यास गालावर जोरात चापट मारली तसेच इतर कर्मचाऱ्यांना कोकरे याने तुला हेच करू शकतो लाईट सप्लाय किती वेळात चालू करतो ते सांग, जर थोड्या वेळात लाईट आली नाही तर तुमचे ऑफीस जाळून टाकतो असे म्हणून शिवीगाळ करून दमदाटी करीत सरकारी कामात अडथळा आणला. स. पोलिस निरीक्षक जगताप तपास करीत आहेत.



**अहिल्यादेवी जयंती तयारी :** सोलापूर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त चार पुतळा परिसरातील अहिल्यादेवी पुतळ्या परिसरात रंगरंगोटीचे काम पूर्णत्वास आले आहे. मूर्तीकार प्रकाश माने यांनी हे काम केले आहे. (छायाचित्र : केवल तिवारी)

## विवेक लिंगराज यांच्या स्मृती प्रित्यर्थ रविवारी सोलापुरात सुरेल गीतांची मैफिल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ मे-**
जिल्हा परिषदेचे माजी कनिष्ठ प्रशासन अधिकारी दिवंगत विवेक लिंगराज यांच्या स्मृती प्रित्यर्थ रविवार, दि. २५ मे रोजी सोलापुरात सुरेल गीतांच्या मैफिलीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती आयोजक सुनीता राठोड यांनी पत्रकार परिषदेत दिली.



रविवार दि. २५ मे रोजी सायंकाळी ६ वाजता हुतात्मा स्मृती मंदिर येथे हा कार्यक्रम होणार आहे. विवेक लिंगराज यांचे तीन महिन्यांपूर्वी हैदराबाद रोड अपघाती निधन झाले होते. विविध संघटनांच्या माध्यमातून ते जिल्हा परिषदेतील कर्मचात्यांच्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न करत असत. त्यांच्या जाण्याने जिल्हा परिषदेतील हजारो कर्मचात्यांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यांच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी या सुरेल गीतांच्या मैफिलीचे आयोजन करण्यात आले आहे. सुनिता राठोड प्रेजेंट्स या कार्यक्रमात रेकॉर्ड केलेले मोहम्मद हुंडेकरी, मयूर पवार, सुभाष चव्हाण, बासंती लोणी, जगदीश मेटकरी आणि जूनियर गोविंदा यांची कला आणि गायन सादर होणार आहे. यावेळी अवनिश लिंगराज, विजयकुमार लिंगराज, विक्रमकुमार लिंगराज, विश्वजीत लिंगराज, मोहम्मद हुंडेकरी हे उपस्थित होते.

## वृध्देला कारमध्ये फिरवून डोळ्यात चटणी टाकून दोन लाखांचे दागिने चोरले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मे-**
पत्ता सांगणाऱ्या वृध्देला कारमध्ये घेऊन तिला फिरवून तिच्या डोळ्यात चटणी टाकून तिच्याकडील २ लाख १० हजार रुपये किंमतीचे सोन्याचा मुद्देमाल जबरदस्तीने चोरून नेणाऱ्या दोघांविरुध्द टेंभुर्णी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शंकुतला शिवाजी देवकर (वय ६५, रा. खांडवी, ता. बार्शी) या महिलेच्या फिर्यादीवरुन एक महिला व एक पुरुष या दोघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२२ मे रोजी दुपारी बाराच्या सुमारास शंकुतला देवकर या मुलीकडे जाण्यासाठी टेंभुर्णी बस स्थानक येथे आल्या होत्या. बस स्थानकाजवळ आलेल्या एका चारचाकी वाहनातील एक महिला व एका पुरुषाने शंकुतला देवकर यांना रस्ता कुठे जातो असे विचारीत पत्ता विचारला. त्यावेळी पुढे गावापर्यंत सोडतो असे म्हणून त्या दोघांनी शंकुतला यांना कारमध्ये घेतले. टेंभुर्णी शिवारातील पुणे ते सोलापूर हायवे रोडवर बायपासच्या पुढे सोलापूर बाजूकडील रोडच्या कडेला






असणाऱ्या ऊसाच्या शेतात यातील अनोळखी एक महिला व एक पुरुष यांनी शंकुतला देवकर यांना त्यांच्या कारमध्ये घेऊन कारमधून फिरविले. त्यानंतर शंकुतला देवकर यांच्या डोळ्यात चटणी टाकून जबरदस्तीने शंकुतला यांच्या कानास जखम करून कानातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा २ लाख १० रुपये किंमतीचा मुद्देमाल जबरदस्तीने चोरून नेला. यामध्ये शंकुतला देवकर यांच्या गळ्यातील दीड तोळ्याचे सोन्याचे गंठण, एक तोळ्याचे बोरमाळ, पाच ग्रॅमचे कानातील वेल, पाच ग्रॅमचे कानातील फुले झुबे, बुगडी असे दागिने व रोख ५० हजार रुपये, मोबाईल असा मुद्देमाल होता. याबाबत टेंभुर्णी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक मोरे पुढील तपास करीत आहेत.

## 'विठ्ठल'च्या ३४७ कोटींच्या गैरकारभारा विरोधात सोमवारपासून २०० नागरिक करणार उपोषण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मे-**
पंढरपूर तालुक्यातील वेणूनगर येथील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्यात ३४७ कोटींचा गैरव्यवहार झाला आहे असा आरोप करत या गैरव्यवहाराला जबाबदार असलेले कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील, व्हाईस चेअरमन, संचालक मंडळ, कार्यकारी संचालक, साखर आयुक्त आणि त्यांचे अधिकारी, लेखापरीक्षक यांच्यावर कारवाई करण्याच्या मागणीसाठी सोमवार दि. २६ मेपासून पुण्यातील साखर संकुल समोर सुमारे २०० जण बेमुदत उपोषणाला बसणार आहेत, अशी माहिती उपोषणकर्ते व व्यापारी संतोष भालेराव यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या कारखान्यास महाराष्ट्र शासनाच्या थकहमीवर नवी दिल्ली येथील एनसीडीसीने मागील थकीत देणी देण्याकरिता ३४७.६७ कोटींचे कर्ज दिले. त्या कर्ज रक्कमेपैकी व्यापारी पेमेंटसाठी ५९.७५ कोटी व कामगार पेमेंटसाठी ४१.८७




कोटी मिळाले. परंतु ती रक्कम व्यापारी व कामगार यांना अद्याप दिलेली नाही. महाराष्ट्र शासनाकडून मिळालेल्या थकहमी कर्ज रकमेचा दुरुपयोग करून शासनाची फसवणूक केल्याबद्दल कारखान्याचे चेअरमन, व्हाईस चेअरमन, संचालक मंडळ, साखर आयुक्त, या गैरव्यवहारात अडकलेले साखर आयुक्तालयातील सर्व अधिकारी आणि लेखापरीक्षक वर्ग एक, सहकारी संस्था (साखर) सोलापूर यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी आमची मागणी आहे, असे भालेराव यांनी सांगितले

व्यापारी व कामगारांच्या विविध मागण्या आहेत. त्यामध्ये महाराष्ट्र शासनाच्या थकहमीवर मिळालेल्या कर्ज रकमेपैकी मागील थकीत व्यापारी पेमेंट साठी रक्कम रुपये ५९.७५ कोटी व कामगार पेमेंटसाठी ४१.८७ कोटी रक्कम व्यापारी व कामगार यांना देण्यात यावी. कारखान्याचे संचालक मंडळ बरखास्त करून कारखान्यावर प्रशासकाची नेमणूक करण्यात यावी. चेअरमन अभिजीत पाटील, व्हा. चेअरमन, संचालक मंडळ व कार्यकारी संचालक तसेच दोषी अधिकारी यांच्यावर फसवणुकीचा फौजदारी गुन्हा दाखल करावा व त्यांची वैयक्तिक मालमत्ता जप्त करून त्यांच्याकडून दुरुपयोग केलेली रक्कम वसूल करण्यात यावी. कारखान्याने मिळालेल्या कर्जाचा विनियोग कसा केला याचा विनियोग दाखला नावे टाकलेली व्हाऊचर झेरॉक्स, मंजूरीची झेरॉक्स व बँक स्टेटमेंट सहित मिळावी. यामध्ये जे अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करून त्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात यावे, अशा विविध मागण्यांचा समावेश आहे. या पत्रकार परिषदेला केशव शेळके, सुखदेव काळे, अण्णाराव काळे, विलास कदम, सत्यवान माळी आदी उपस्थित होते.

## मंदिरातील निर्माल्यापासून बनणार धूप-अगरबत्ती

आषाढीपूर्वी अल्पदरात भाविकांसाठी होणार उपलब्ध

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २३ मे-**
येथील श्री विठ्ठल रूक्मिणी-मंदिरामध्ये तसेच शहरातील विविध परिवार देवता मंदिरात जमा होणाऱ्या निर्माल्यापासून धूप व अगरबत्ती तयार करून आषाढीपूर्वी भाविकांना ती अल्पदरात उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात असल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

या संदर्भात माहिती देताना व्यवस्थापक श्रोत्री यांनी सांगितले की, येथील श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिरा मध्ये तसेच शहरातील विविध परिवार देवता मंदिरात जमा होणाऱ्या निर्माल्यापासून धूप व अगरबत्ती तयार निर्णय मंदिर समितीने यापूर्वीच घेतला असून यासाठी ऋषिकेश भट्टड, प्रभव आरोमॅटिक्स, पंढरपूर यांचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे. त्यांचेकडून श्रींच्या निर्माल्यापासून धूप व अगरबत्ती तयार करण्याचे काम सुरू करण्यात असून, भाविकांना आषाढी यात्रा २०२५ पूर्वी धूप व अगरबत्ती उपलब्ध करून देण्याचा मंदिर समितीचा प्रयत्न असल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

मंदिरात येणारे भाविक भक्तीभावाने श्रींस तुळशी, हार व फुले अर्पण करीत असतात. अर्पण केलेल्या हार-फुलांपासून धूप व अगरबत्ती तयार करण्यासाठी यापूर्वी थर्ड वेव्ह टेक्नॉलॉजीज, पुणे यांचा प्रस्ताव



मंजूर करण्यात आला होता. तथापी, त्यांनी प्रतिसाद न दिल्याने त्यांचा प्रस्ताव रद्द करून ऋषिकेश भट्टड, प्रभव आरोमॅटिक्स, पंढरपूर यांना सदरचे काम देण्यात आले आहे. त्यांचेकडून तीन ते चार प्रकारच्या अगरबत्त्या तयार करण्याचे काम सुरू आहे. त्यासाठी आवश्यक त्या परवानग्या घेण्यात आलेल्या आहेत. येथील श्री संत ज्ञानेश्वर दर्शनमंडप व श्री संत तुकाराम भवन येथे लवकरच स्टॉलद्वारे अल्प देणगी मूल्य आकारून भाविकांना धूप व अगरबत्ती उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्याबाबतची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. त्याची जबाबदारी अनुभवी विभाग प्रमुख पृथ्वीराज राऊत यांना देण्यात आली आहे. दरम्यान निर्माल्यापासून धूप व अगरबत्ती उत्पादनास प्रत्यक्ष सुरवात होऊन भाविकांना उपलब्ध होईपर्यंत श्रींच्या गाभाऱ्यात जमा होणारी हार-फुले दर्शनरांगेतील भाविकांना देण्यात येत असल्याचे यावेळी श्रोत्री यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी ११२५

**तंव आत्मसिध्दि न ठकेचि । आणि मागुतें न येववेचि ।**
**ऐसा अस्तु गेला माझारींचि । आयुष्यभानु ।।**

योगाभ्यासासाठी मन नियंत्रित करणे अत्यंत महत्वाचे असल्याचे भगवंतांनी अर्जुनाला सांगीतले. चंचल मनाला कसे नियंत्रित करावे, असे अर्जुनाने श्रीकृष्णाला विचारले असता, श्रीकृष्णांनी त्या बाबत सविस्तर विवेचन केले. विरक्ती आणि अभ्यास यांच्या मदतीने माणसाने कधीही मनाला स्वाधीन करण्याचा प्रयत्न केला नाही तर त्याला योग प्राप्त होणे अवघड असते. परंतु जो आत्मसंयमन करुन, मनाला वश करण्याचा प्रयत्न करतो, त्याला योग शास्त्रात सांगीतलेल्या उपायाने योग प्राप्त होणे शक्य असल्याचे भगवंत म्हणाले. ज्या योगाने मनाचा निग्रह होतो, अशा साधनाला, मार्गाला अगोदर अर्जुनाने प्रारंभ करावा म्हणजे त्याचे मन आपोआप ताब्यात येऊ लागेल असे भगवंतांना वाटते. मनाच्या नियंत्रणाच्या मार्गाबद्दल भगवंत बोलत असतांना अर्जुनाला एक शंका आली. ती शंका विचारतांना अर्जुन म्हणाला, तंव आत्मसिध्दि न ठकेचि । आणि मागुतें न येववेचि । ऐसा अस्तु गेला माझारींचि । आयुष्यभानु ।।. अर्जुन म्हणाला, हे गोविंदा एखादा साधक श्रध्देने योग्य परिश्रम न करता मोक्ष प्राप्ती करिता प्रयास करीत होता. इंद्रियांवर नियत्रंन करुन तो पुढे आत्म साक्षात्काररुपी श्रध्देच्या मार्गाला लागला, परंतु आत्मसाक्षात्कारा पर्यन्त पोहोचला नाही. त्यातच वैराग्यामुळे तो पुन्हा संसारातही येऊ शकला नाही. आणि अशा मध्यंतरीच्या अवस्थेतच त्याचा मृत्यू झाला तर त्याला कोणते सुख मिळाले म्हणून समजावे? कारण आत्मसुखही तो प्राप्त करु शकत नाही व प्रपंचसुखालाही तो मुकलेला असतो. अर्थात, तो कोणत्याही एका किना-यावर न पोहचता मध्येच अडकला जातो. म्हणजेच धड आत्मसुखात ही नाही व प्रपंचसुखातही नाही अशी अचानक पणे त्याला आलेल्या मृत्युमुळे त्याची अवस्था होते. यावर मार्गदर्शन करतांना भगवंत म्हणाले, अर्जुना अशा योग्याने इंद्रिय निग्रह करुन योगाभ्यासाच्या मार्गावरुन चालण्याची मनात खूणगाठ बांधल्याने, तो आत्मसुखाच्या मार्गावरच चालत होता. त्यामुळे मार्गावर चालण्याची निश्चयपुर्वक झालेली सुरुवातच एक प्रकारचे यश आहे. त्याच्या हातात नसलेला मृत्यू त्याला आल्याने त्याचे दोष त्याला लागत नाहीत. मृत्यूच्या कालावधीपर्यन्त तो योगाभ्यासाच्या प्रथम पायरीवर का असेना पण योगी म्हणून जगू शकला हे कांही कमी नाही. तो साम्यावस्थेच्या, समतेच्या मार्गावर धांवू लागला म्हणजेच चांगल्या सुखाच्या मार्गावर त्याचा प्रवास चालू असतांना त्याचा मृत्यू झाला असे समजायला हरकत नाही. मृत्यू आपल्या हातात नाही. पण अंतिम क्षणापर्यन्त चांगले वागणे आपल्या हातात आहे. म्हणून आपण असा विचार करावा की, आपण आपली इंद्रिये, मन जर ताब्यात घेतली तर आपल्या हातून नको त्या गोष्टी घडत नाहीत. स्वत:चा स्वत:ला खरा परिचण होण्यासाठी मनाची एकाग्रता आवश्यक आहे. बाहय गोष्टी पाहण्यापेक्षा अंतर्गत बाबी पाहणे आवश्यक आहे. स्वत:चा अभ्यास होण्यासाठी मनाची स्थिरता होणे गरजेचे असते. विषय वासनेत अडकलेल्या मनाला विषयातुन बाहेर काढणे गरजेचे आहे. मनाला त्याच्या इच्छेप्रमाणे धावू दिले तर, इंद्रिये त्याच्या मागे धावू लागतात आणि इंद्रियांकडून नको त्या गोष्टी घडू लागतात. आपण पराधीन झाल्यासारखे वागतो.म्हणून ख-या सुखासाठी मन आणि इंद्रिये आपल्या आधीन राहतील असा आपण प्रयत्न करावा.



**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| **वार : शनिवार** | **दिनविशेष - चांगला दिवस, नारद जयंती** |
| **दि. २४ मे २०२५** | **शनि प्रदोष** |
| **विक्रम संवत् २०८१** | **....राहू काल....** |
| **शके - १९४७** | **रविवार : दु.४.३० ते ६.००** |
| **संवत्सर - विश्वावसू** | **सोमवार : स. ७.३० ते ९.००** |
| **मास - वैशाख** | **मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०** |
| **कृ. द्वादशी (१९.१०)** | **बुधवार : दु. १२ ते १.३०** |
| **ऋतु - वसंत** | **गुरुवार : दु. १.३० ते ३.००** |
| **नक्षत्र - रेवती (१३.४८)** | **शुक्रवार : स.१०.३० ते १२** |
| **योग - आयुष्मान (१५.००)** | **शनिवार : स. ९ ते १०.३०** |
| **करण - कौलव (०८.५८)** | |

### राशीभविष्य

**मेष :** व्यापारात नवीन योजना आखताल. राजकीय किंवा शासनाकडून मान सन्मान मिळण्याचे योग आहेत. आरोग्याची काळजी घ्या.

**वृषभ :** जमीनी संदर्भातील व्यवहार सुरळीत पार पडतील. प्रभावपूर्ण वातावरण राहील. व्यवसायिक करार फायदेशीर ठरतील.

**मिथुन :** आपल्या सल्ला घेतला जाईल. रोजगारात विस्तार होण्याची शक्यता आहे. अनोळखी व्यक्तिवर विश्वास दाखवू नका.

**कर्क :** आर्थिक योजनेमध्ये यश मिळेल. कार्यकुशलते मुळे आपला फायदा होईल. विरोधकांपासून सावध रहा. कौटुंबिक संबंध चांगले राहतील.

**सिंह :** आपले ध्येय्य साध्य करण्याच्या दिशेने हालचाल करा. आर्थिक फायदा होण्याचे योग आहेत. व्यापारत नवीन योजना सुरू होतील.

**कन्या :** धावपळ केली तरच आपल्याला यश मिळणार आहे. स्वविवेक बुद्धीने निर्णय घेऊनच व्यवहार करा. सामाजिक स्थिती चांगली राहणार आहे.

**तुळ :** आपली कार्यक्षमता वाढणार असून आपल्या योग्यतेची समाजात प्रशंसा होईल. कौटुंबिक स्थिती आनंददायी राहील.

**वृश्चिक :** सकारात्मक परिस्थिती राहील. कोणत्याही प्रकारच्या जोखमीचे कामे करू नका. व्यापारात अपेक्षेप्रमाणे लाभ होईल. कौटुंबिक तणाव निर्माण होईल.

**धनु :** आपल्या ज्ञानात भर पडणार आहे. व्यावसायिक अडचणी दूर होतील. नवीन संबंध फायदेशीर राहतील. उत्पन्न व खर्च याचा ताळमेळ ठेवा.

**मकर :** घरगुती समस्यांचा सामना करावा लागणार आहे. आपल्या कामाची व्यवहारात स्तुती होणार आहे.

**कुंभ :** उत्पन्नात वाढ झाली तरी खर्चावर नियंत्रण ठेवा. अनोळखी व्यक्तिवर विश्वास ठेवूच नका. आर्थिक व्यवहार फायदेशीर राहतील. नौकरीतमध्ये आपले महत्व वाढणार आहे.

**मीन :** आपल्या मनासारखे व्यवहारात यश मिळणार आहे. सज्जन लोकांच्या मदतीमुळे आपल्या यशात भर पडेल. कोणाचाही राग करू नका.

# दुसऱ्या टप्प्यातील शिक्षक भरती विनामुलाखत

## एक हजार पेक्षा जास्त शिक्षकांची निवड ; सोलापूर जिल्हा परिषदेला मिळाला नाही एकही शिक्षक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मे-**

राज्यात घेण्यात आलेली २०२२-२३ ची शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमापन चाचणी परीक्षा मधून पहिला टप्पा व रूपांतरीत आजपर्यंत जिल्हा परिषद व खाजगी अस्थापनातील सर्व शाळांमध्ये जवळपास १७ हजार पेक्षा जास्त शिक्षक भरती झाली असून उर्वरित दुसऱ्या टप्यामध्ये १८ जिल्हा परीषदेमध्ये जवळपास दीड हजार पेक्षा जास्त शिक्षकांची जिल्हा परीषद शाळांमध्ये विना मुलाखत निवड झाली आहे.

आता दुसऱ्या टप्प्यात पवित्र पोर्टलवर स्थानिक स्वराज्य संस्थांकडून व मुलाखतीशिवाय उमेदवार निवडीचा पर्याय निवडलेल्या खाजगी व्यवस्थापनांकडून शिक्षकांच्या रिक्त पदांच्या जाहिराती प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. यामध्ये सोलापूर जिल्हा परिषदेला एकही जागा मिळाली नाही.

> **इतर जिल्ह्यात जाण्याची वेळ**
>
> वारंवार पाठपुरावा करूनही जिल्हा परिषदेला एकही जागा मिळाले नाही. रिक्त , अपात्र व १० टक्के जागा अतिरिक्त शिक्षक समायोजनामुळे मिळू न शकल्याने आमच्यावर अन्याय झाला असून नोकरीसाठी इतर जिल्ह्यात जाण्याची वेळ आली आहे. **-बाळासाहेब काशीद, अभियोग्यताधारक**

**एकूण पदे; कंसात जागा**

जिल्हा परिषद-१८ (४६८), महानगरपालिका १३ (३६२), नगर पालिका/परिषदाच्या ५७(२२१), खाजगी शैक्षणिक संस्था -२५ (५३७)

**पवित्र पोर्टलवर आरक्षण निहाय १५८८रिक्त पदे**

अनुसूचित जाती -१८२, अनुसूचित जमाती -१३१, विमुक्त जाती (अ)-४६, भटक्या जमाती (ब)-२७, भटक्या जमाती (क)-४५, भटक्या जमाती (ड)-३१, विशेष मागास प्रवर्ग-२२, इतर मागास प्रवर्ग-२१७, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक -१३७,सामाजिक व शैक्षणि मागास प्रवर्ग-१८९, खुला-५५९

> शासनाने जाहीर केलेली आकडेवारी आणि प्रत्यक्षात मिळालेली जागा कमी प्रमाणात होते.किमान तीन-चार हजार जागा वाढवणे अपेक्षित होती आता तरी शासनाने लवकर निवड झालेले उमेदवारांची कागदोपत्राची पडताळणी पूर्ण करून राज्यात एकाच दिवशी सर्व जिल्हा परिषद मध्ये समुपदेशन व नियुक्ती घ्यावे.
> **-प्रशांत शिरगुर, राज्य उपाध्यक्ष, डी.एड बी.एड असोसिएशन**

**माध्यमनिहाय रिक्त पदे : १५८८**

मराठी -१२५१, उर्दू -२५८, हिन्दी -५३. तामिळ -२, बंगाली -२३. तेलुगू -१

**१० टक्के भरतीसह रिक्त व अपात्र पदेही भरली**

२०२२-२३ च्या शिक्षक भरती मध्ये शासनाने ८० टक्के पद भरतीला मान्यता दिली होती परंतु मान्यतेनंतर सुद्धा राज्यात ७० टक्के प्रमाणे पदभारती झाली . त्यामुळे उरलेले १०% आणि ज्या ठिकाणी शिक्षकांची निवड होऊन सुद्धा ते हजर झाले नाही किंवा काही तांत्रिक अडचणीमुळे नियुक्ती मिळाली नाही ते गैरहजर व अपात्र जागा असतील त्याही यावेळी दुसऱ्या टप्प्यामध्ये भरली गेली आहेत. त्यामुळे राज्यांमध्ये ८०% पदभरती पूर्ण झालेली आहे.

# कंत्राटी शिक्षकांची मानधनावर होणार नियुक्ती

## पवित्र पोर्टलविना भरती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मे-**

राज्यातील आदिवासी विकास विभागामार्फत चालवल्या जाणाऱ्या आश्रम शाळांमध्ये यापुढे कंत्राटी पद्धतीने शिक्षकांची नेमणूक केली जाणार असून त्यासाठी शासनाने निविदा तयार केला आहे. आदिवासी विकास विभागाच्या १६ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये आदिवासी विकास विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयाचा सुधारित आकृतिबंध निश्चित केलेला आहे. सुधारीत आकृतीबंधा नुसार आदिवासी विकास विभागाच्या शासकीय आश्रमशाळेतील शिक्षकांच्या मंजूर असलेल्या १७९१ पदांच्या सेवा बाहयस्रोतांद्वारे उपलब्ध करुन घेण्यासाठी जीईएम वर निविदा प्रक्रिया राबविण्या संदर्भात प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. त्यानुसार पवित्र पोर्टलविना आश्रम शाळेत कंत्राटी शिक्षक भरती करण्यात येत आहे.

शासकीय आश्रमशाळेत जास्त प्रमाणात कंत्राटी शिक्षक भरती होत आहे. यामुळे भविष्यात अनेक समस्या निर्माण होणार आहेत. अनेक वर्षे तुटपुंज्या मानधनावर काम करणाऱ्या शिक्षकांना कायमस्वरूपी नोकरी मिळाल्यावर त्यांच्या रोजगाराचा प्रश्न मिटेल. यासाठी शासनाने पाठपुरावा करावा. हे सर्व पदे पुढील टेट परीक्षामध्ये समाविष्ट करून जागा उपलब्ध करून दिल्यास नक्कीच भावी शिक्षकांना न्याय मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

आदिवासी विकास विभागाच्या शासकीय आश्रम शाळेतील शिक्षकांची १७९१ पदे बाहयस्रोतांद्वारे भरण्याकरिता जीईएम पोर्टल वर निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी ८४ कोटी ५५ हजार इतक्या अंदाजित रकमेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे .

> एकूण शिक्षकांची पदे-१७९१
> उच्च माध्यमिक शिक्षक-२२९
> माध्यमिक शिक्षक-४५५
> पदवीधर प्राथमिक शिक्षक-१२०
> प्राथमिक शिक्षक इंग्रजी-१७८
> प्राथमिक शिक्षक मराठी-८०९
> **एकूण- १७९१**

> काही वर्षापासून कत्राटी पद्धतीन शाळेवर काम करत आहे. आश्रमशाळेत जर शासनाने कायमस्वरूपी पद भरती केल्यास व परीक्षेच्या माध्यमातून भरती प्रक्रिया सुरू झाल्यास आश्रम शाळेत काम करणाऱ्या शिक्षकांना न्याय मिळणार आहे. **- धनाजी काशीद, कंत्राटी शिक्षक**

> **बाह्य यंत्रणाच्या माध्यमातून कंत्राट शिक्षक भरती**
>
> राज्यातील बहुचर्चेत शासकीय आश्रम शाळेतील शिक्षकांची पदभरती करण्यासाठी येणाऱ्या अडचणीला मात करून अखेर सामान्य प्रशासन विभाग वित्त विभागाने मंजुरी दिल्यामुळे हजारो पदांची कंत्राटी शिक्षक भरती करण्यात येणार आहे. त्यासाठी बाह्य यंत्रणांच्या माध्यमातून परीक्षा घेतली जाणार आहे.

# अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त सोलापूर विद्यापीठात विविध कार्यक्रम

## २६ ते ३१ मे दरम्यान आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मे-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती उत्सवानिमित्त दि. २६ ते ३१ मे दरम्यान आठवडाभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये आरोग्य शिबिर, स्वच्छता अभियान, चित्र व ग्रंथ प्रदर्शन, शोभायात्रा, गजीनृत्य व लोककलेचे सादरीकरण होणार असल्याची माहिती कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांनी दिली.



अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती सप्ताहाचे उद्घाटन सोमवार, दि. २६ मे रोजी सकाळी अकरा वाजता विद्यापीठाच्या मुख्य सभागृहात राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर दि. २६ व २७ मे २०२५ रोजी आरोग्य शिबिर व स्वच्छता अभियान पार पडणार आहे. दि. २८ मे रोजी विद्यापीठाच्या कर्मवीर मामासाहेब जगदाळे ज्ञानस्रोत केंद्रामध्ये चित्र व ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. २९ मे रोजी दुपारी तीन वाजता मुंबईचे लोककलावंत शिवपाईक योगेश चिकटगावकर यांचा 'लोककलेची ललकार' हा कार्यक्रम पार पडणार आहे. दि. ३० मे रोजी सकाळी अकरा वाजता शोभायात्रा पार पडणार आहे व त्यानंतर वृक्षारोपणाचा कार्यक्रम होईल. कार्यक्रमास प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या सप्ताहाच्या यशस्वीतेसाठी विविध समित्या कार्यरत आहेत.

> **३१ मे रोजी मुख्य सोहळा; उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांची उपस्थिती**
>
> दि.३१ मे रोजी सकाळी दहा वाजता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुतळा परिसर येथे गजीनृत्याचे सादरीकरण होणार आहे. त्यानंतर दुपारी १२ वाजता विद्यापीठात मुख्य सोहळा पार पडेल. कार्यक्रमास राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिकेचे आयुक्त सचिन ओंबासे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. हा मुख्य सोहळा पार पडल्यानंतर दुपारी तीन वाजता पीएम उषा योजनेतून मिळालेल्या निधीमधून नवीन इमारतींचा पायाभरणी शुभारंभ होणार असल्याचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांनी सांगितले.

## पूनम व्यवहारे यांना महाराष्ट्र रत्न पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ मे -**

ए डी फाऊंडेशनच्यावतीने शहरातील अनेक गुणवना महाराष्ट्र रत्न पुरस्कार जाहिर करण्यात आला आहे. यामध्ये शरदचंद्र पवार बालम मंदीर येथील सहशिक्षिका पूनम व्यवहारे यांचा समावेश आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा रविवार, दि. २५ मे रोजी होणार आहे



ए.डी. फाऊंडेशनच्यावतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या पुरस्कार सोहळ्यात महाराष्ट्र रत्न सन्मान पुरस्कार देण्यात येणार आहे. या कार्यक्रमास जतचे माजी आ. प्रकाश शेंडगे, आयकर आयुक्त डॉ.नितीन वाघमोडे, डॉ सचिन मोटे, अॅड. चिमण डांगे, चेतन नरोटे, रूक्मिणी गलांडे, राम मांडूरके आदी उपस्थित राहणार आहे. या पुरस्काराबद्दल पूनम व्यवहारे यांचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

# ठेवीदाराच्या खून प्रकरणी पतसंस्थाचालकाची निर्दोष मुक्तता

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ मे -**

ठेवीदाराच्या खून प्रकरणात पतसंस्थाचालकाची निर्दोष मुक्तता करण्याचे आदेश बार्शी येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश व्ही. के. मांडे यांनी दिले.

२ मे २०१४ रोजी देवळाली (ता. करमाळा) येथील फॉरेस्ट मध्ये तेथील वनमजुरांना जंगलात फिरती ड्युटी करीत असताना लमान बाबा मंदिराजवळ कोरड्या ओढ्यामध्ये एक अनोळखी इसम मयत अवस्थेत पडलेला असून त्याचे डोक्यात मोठी जखम व तो अर्धवट जळालेला मिळून आला. त्यानंतर सदर वनमजुरांनी घटनेबाबत त्यांचे वरिष्ठ वनरक्षक गोरखनाथ शिवप्पा माळी यांना माहिती दिली. त्यावरून त्यांनी सदर घटनेबाबत करमाळा पोलीस स्टेशन येथे फिर्याद दाखल केली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला व प्रेताजवळ पडलेल्या वस्तू जप्त करून पुढील तपास चालू केला.

दरम्यानच्या काळात ४ मे २०१४ रोजी मयताचा नातू अक्षय ज्ञानेश्वर शिंदे याने त्याचे आजोबा विठ्ठल रामभाऊ टोणपे हे ३० एप्रिल २०१४ रोजी आरोपी विश्वनाथ निवृत्ती मोगल यांच्याकडे जाऊन ठेवीचे पैसे घेऊन येतो म्हणून गेलेले होते व ते अद्याप परत न आल्याने त्यांची हरवले बाबत तक्रार देण्यासाठी करमाळा पोलीस स्टेशन येथे आले असता सदर वेळी बेवारस मयताचे काढलेले फोटो व घटनास्थळी मिळालेले वस्तू दाखविल्या नंतर सदर वस्तू या मयत विठ्ठल रामभाऊ टोणपे (वय वर्ष ७० रा. दहिगाव, ता. करमाळा) यांचेच असल्याचे पाहून सांगितल्या व त्याचे आजोबांनी आरोपीचे ज्ञानसागर पतसंस्थेमध्ये ठेवी ठेवल्या होत्या व सदरच्या ठेवी परत करण्यावरून त्यांच्यामध्ये वाद होता व आरोपी हा वेळोवेळी त्यांना दमदाटी करत असल्याबाबत जबाब दिला.

तदनंतर यातील आरोपी विश्वनाथ निवृत्ती मोगल यास अटक करून गुन्ह्यात वापरलेले हत्यार जप्त करण्यात आले. त्यावरून तत्कालीन पोलीस निरीक्षक व्ही. व्ही. हसबनीस यांनी आरोपीविरुद्ध खून करून पुरावा नष्ट केल्याबाबत आरोप पत्र दाखल केलेले होते.

सदर खटल्याची सुनावणी बार्शी येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश व्ही. के. मांडे यांचे समोर झाली. सदर प्रकरणी सरकार पक्षातर्फे एकूण दहा साक्षीदारांच्या साक्षी नोंदवण्यात आल्या.

आरोपीतर्फे एडवोकेट मिलिंद थोबडे यांनी त्यांचे युक्तिवादामध्ये सदरचा खटला हा परिस्थितीजन्य पुराव्यावर आधारित असून यामध्ये मयताची ओळख पटवणे हे अतिशय महत्त्वाचे असून त्याकरिता पोलिसांनी मताचे डी. एन. ए. घेणे अत्यंत महत्त्वाचे होते परंतु सदर प्रकरणी मयताचा डी. एन. ए सॅम्पल घेतलेला नसून सदरचा मृतदेह हा विठ्ठल टोणपे यांचाच होता का याबाबत शंकास्पद परिस्थिती असल्याचा युक्तिवाद केला, त्यावरून न्यायाधीशांनी आरोपीची निर्दोष मुक्तता केली. यात सरकार तर्फे अॅड. डी.डी. देशमुख यांनी तर आरोपीतर्फे अॅड. मिलिंद थोबडे व अॅड. निखिल पाटील यांनी काम पाहिले.



# 'वालचंद'मध्ये शैक्षणिक दाखले शिबिराला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ मे-**

इयत्ता ११ वी प्रवेश प्रक्रियेसाठी आवश्यक असणारे आवश्यक कागदपत्रे मिळवण्यासाठी पालकांची व विद्यार्थ्यांची सेतू कार्यालय येथे अतिरिक्त गर्दी व गैरसोय होऊ नये, वेळेत दाखले मिळावेत यासाठी, वालचंद कला व शास्त्र महाविद्यालयात महाराष्ट्र शासनाच्या श्री. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाचे मंगळवार २० मे ते गुरुवार २२ मे दरम्यान सकाळी १०:३० ते ५:३० या वेळेत आयोजन करण्यात आले होते. शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी प्राचार्य डॉ. संतोष कोटी, तलाठी माने टी.पी , विठ्ठल केरे, उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, 'महा-ई-सेवा' केंद्राचे रजनी वासी, रामकृष्ण बोगा, लक्ष्मी श्रीमल, भास्कर बल्ला, अश्विनी बचुटे उपस्थित होते. शिबिराला पहिल्याच दिवशी १५० हून अधिक विद्यार्थ्यांना आवश्यक दाखले प्राप्त केले.



# राष्ट्रवादी काँग्रेसच्या महाअरोग्य शिबिराचा २२७ जणांनी घेतला लाभ

**सोलापूर, दि. २३ मे-**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी VJNT सेल आयोजित मोफत महाआरोग्य शिबीराचे सुरवात गणेश यांच्या आरतीने पूजेने सुरवात करण्यात आले. या शिबीराचा २२७ नागरिकांनी लाभ घेतला. आयोजन रुग्णसेवक तथा VJNT सोलापूर शहराध्यक्ष रुपेश भोसले यांनी घरकुल भागात सर्वसामान्य कष्टकरी वंचित दुर्बल घटकातील लोकांसाठी मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन केले. शिबीराचे शहर अध्यक्ष संतोष पवार व कार्यध्यक्ष जुबेर बागवान यांच्या उपस्थितीत व त्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी सिव्हिल हॉस्पिटल येथील सर्वच विभागातील डॉक्टर व ब्रदर उपस्थित होते. या डॉक्टरांचे सन्मान शहर अध्यक्ष संतोष पवार व कार्यअध्यक्ष जुबेर बागवान यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी वैद्यकीय मदत कक्ष सोलापूर जिल्हा अध्यक्ष ज्योतिबा गुंड व VJNT सेल जिल्हा अध्यक्ष विशाल वाघमारे, कुणाल धोत्रे, विकास वाघमारे, अशोक गुंनाल जगन्नाथ कोंडा, ओमकार इठुम उपस्थित होते.

# एमआयडीसीत अद्ययावत अग्निशामक दल केंद्र उपलब्ध

## आयुक्त डॉ.ओम्बासे यांनी केली जळीत कारखान्याची पाहणी; नऊ पथकाद्वारे सर्वेक्षण सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मे-**

अक्कलकोट रोड एमआयडीसी परिसरातील अग्निशामक केंद्राच्या जागेची पहाणी केली. या ठिकाणी लवकरच बांधकाम पूर्ण होऊन अद्यावत अग्निशामक दलाच्या गाड्यासह अधिकारी व कर्मचारी उपलब्ध करण्यात येईल, अशी माहिती महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली.

सोलापूर महानगरपालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आज सोलापुरातील अक्कलकोट रोड एमआयडीसीतील जळीत कारखान्याची पाहणी केली. तसेच एमआयडीसी परिसरात महापालिका अग्निशामक केंद्राच्या बांधकामाची पाहणी केली. त्यानंतर त्यांनी ही माहिती दिली.



याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, श्रीनिवास गड्डम, सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष राजू राठी, नगर अभियंता सारिका अकुलवार, सार्वजनिक कार्यकारी अभियंता तपन डंके व मन्सूरी परिवारातील सदस्य उपस्थित होते. यावेळी आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी कारखाना परिसराची संपूर्ण पाहणी केली.

अग्निशामक विभागाच्या कर्मचाऱ्यांकडून घटने संदर्भातील संपूर्ण माहिती जाणून घेतली. यावेळी फायरमन समीर पाटील, गौतम आव्हाड उपस्थिती होते. त्याचबरोबर सोलापूर महानगरपालिकेच्या माध्यमातून एमआयडीसी कारखान्याच्या अनाधिकृत बांधकामा संदर्भात सर्वेक्षणासाठी ९ टीम करण्याचा आले असून प्रत्येक टीममध्ये तीन प्रतिनिधींच्या समावेश आहे. त्यामध्ये एक कनिष्ठ अभियंता, एक फायरमन, एक टॅक्स ऑफिसर यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यांच्यामार्फत अनाधिकृत बांधकाम, अग्निप्रतिबंध उपाय योजनेसंदर्भात पडताळणी, प्रतिबंधात्मक सूचना दिशा पलक यांची पडताळणी सर्वेक्षण सुरू आहे. त्या ठिकाणीही आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी पाहणी केली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/

# शिक्षकांनी निवृत्तीनंतर लोकप्रबोधनाचे काम करावे : जिल्हाधिकारी घोलप

## प्राचार्य श्रीधर भोसले यांचा अमृतमहोत्सवानिमित्त सत्कार संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.२३ मे-**

पेटणं, भेटणं आणि रेटणं हे जीवनाचं सूत्र आहे. आपण ध्येयासाठी पेटलं पाहिजे. आपल्या गरजांसाठी माणसांना भेटलं पाहिजे आणि ते पुढं रेटलंही पाहिजे. तरच माणूस पुढं जाऊ शकतो. माणूस घडवण्याचे काम शिक्षकच करतात. शिक्षकांनी निवृत्तीनंतर लोक प्रबोधन करावे असे आवाहन झारखंड येथील चतरा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी तथा सोलापूर जिल्ह्याचे सुपुत्र रमेश घोलप यांनी केले.

येथील इंग्लिश स्कूलचे सेवानिवृत्त प्राचार्य श्रीधर भोसले यांच्या अमृतमहोत्सवी सत्कार सोहळ्याच्या



अध्यक्षीय भाषणात ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून कोल्हापूरचे ज्येष्ठ साहित्यिक सुनीलकुमार लवटे उपस्थित होते. आजचा हा सोहळा म्हणजे शिक्षक आणि शिक्षण या मूल्याकडं पाहण्याची दृष्टी बदलणारा सोहळा आहे. आयुष्यभर सेवेशी प्रामाणिकता आणि सामाजिक उत्तरदायित्व जपलेल्या एका संवेदनशील, शिस्तप्रिय, कर्तव्यकठोर शिक्षकाचा सन्मान माझ्या अध्यक्षतेखाली होतोय ही माझ्या आयुष्यातील लक्षात राहणारी गोष्ट असल्याचे गौरवोद्गार जिल्हाधिकारी घोलप यांना काढले. व्यासपीठावर माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत,आमदार अभिजीत पाटील,धनश्री परिवाराचे प्रा. शिवाजीराव काळुंगे, उद्योजक संजय आवताडे, डॉ.ए.बी.गायकवाड,उपजिल्हाधिकारी सुधाकर भोसले, सुयश गुरुकुलचे केशव शिंदे, हर्षल क्षीरसागर, डॉ. सुभाष कदम, ॲड.बी.बी.जाधव, दामाजी शुगरचे चेअरमन शिवानंद पाटील, ॲड. नंदकुमार पवार, विष्णूपंत आवताडे,सिद्धेशर आवताडे, अरुणा माळी, लक्ष्मण माने, वैभव नागणे, रामचंद्र जगताप, ॲड. शिवाजी पाटील, गौरव समितीचे अध्यक्ष ॲड. सुजित कदम,अजिता भोसले,डॉ.मिनाक्षी कदम,पवन महाडिक आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी कवी इंद्रजित घुले आणि डॉ. राजेंद्र जाधव संपादित जाणिवांचा झरा हा अमृतमहोत्सव गौरव ग्रंथ प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला. याप्रसंगी ज्ञानेश्वरी पाटील, उन्मेष भोसले, डॉ.राजेंद्र जाधव, अजिता भोसले, डॉ.मिनाक्षी कदम, प्रा. शिवाजीराव काळुंगे, आ.अभिजित पाटील, श्रीधर भोसले आदी मान्यवरांनी मनोगते व्यक्त केली. प्रास्ताविक प्रा. उज्वला पाटील यांनी केले. सूत्रसंचालन बालाजी शिंदे यांनी केले. श्रीकांत भोसले यांनी आभार मानले. गौरव समितीचे अध्यक्ष ॲड. सुजित कदम, डॉ. राजेंद्र जाधव, श्रीकांत भोसले, यतिराज वाकळे, कन्हैया हजारे, धनंजय पाटील, विठ्ठल सवणे, दामाजी क्षीरसागर, उन्मेष भोसले आदींनी परिश्रम घेतले.

# मंगळवेढ्यात उसळला देशभक्तीचा महापूर

### शहरात भव्य तिरंगा रॅली; घोषणांनी परिसर दणाणला

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.२३ मे-**

ऑपरेशन सिंदूरमधील भारतीय सेनेच्या शौर्याबद्दल कृतज्ञता आणि सन्मानाची भूमिका अधोरेखित करण्यासाठी पंढरपूर- मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्या नेतृत्वाखाली मंगळवेढा शहरात भव्य तिरंगा रॅली काढून देशभक्तीच्या आवाजाचा नारा बुलंद करण्यात आला.

दरम्यान यावेळी भारत माता की जय, वंदे मातरम, जय जवान जय किसान, दूध मांगो तो खीर देंगे कश्मीर मांगे तो चीर देंगे अशा घोषणांनी सारा परिसर दणाणून गेला होता. यावेळी बोलताना आमदार आवताडे यांनी सांगितले की, देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय सेनेने पुन्हा एकदा सिद्ध केलं की, हा नवभारत आहे. जो आपल्या शत्रूंना घरात घुसून प्रत्युत्तर देतो. पाकिस्तानसारख्या दहशतवादी प्रवृत्तीला ठोस उत्तर देत, भारताने संपूर्ण जगाला दाखवून दिलं की, आपली सार्वभौमता आणि सुरक्षेचा कुणीही भंग केला तर त्याचा योग्य बंदोबस्त केला




जाईल. आपल्या देशासाठी, लाखो सामान्य नागरिकांच्या सुरक्षेसाठी स्वतःचा जीव पणाला लावणाऱ्या सर्व भारतीय जवानांना सॅल्युट असल्याचे त्यांनी यावेळी आवर्जून नमूद केले. या यात्रेत आमदार आवताडे यांचेसमवेत तालुक्यातील सामाजिक, राजकीय व व्यावसायिक तसेच इतर क्षेत्रातील अनेक देशप्रेमी मंगळवेढाकरांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून भारतीय सेनेच्या कार्याला सलाम करत उत्स्फूर्तपणे सहभागी झाल्याचे चित्र होते.

## दुचाकी घसरल्याने पडून दोघे जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मे-**

रामलाल चौक येथून नवीपेठच्या दिशेने जाताना चौकापासून ५०० मीटर अंतरावर दुचाकी घसरल्याने खली पडून दोघे जखमी झाले. हा अपघात गुरुवारी रात्री १०.१५ च्या सुमारास घडला. शुभम आनंद बनसोडे (वय २४, रा. दमाणी नगर) व राहुल राजेश कापसे (वय २२, रा. दमाणी नगर, सोलापूर) असे जखमी झालेल्याची नावे आहेत. गुरुवारी रात्री दहाच्या सुमारास शुभम आणि राहूल असे दोघे रामलाल चौक येथून दुचाकीवर डबलसीट जात होते. रामलाल चौकापासून सुमारे ५०० अंतरावर ते बसून जात असलेली दुचाकी अचानक घसरली. यात खाली पडल्याने शुभमच्या हाताला, पायाला व चेह-याला जखम झाली आहे. तसेच राहुलच्या उजव्या हाताला व पायाला जखम झाल्याने शबनम बनसोडे यांनी उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



# निंबर्गीत घरावरील पत्रे उडाले

### वादळी वाऱ्याचा फटका, सरपंच हसापूरे यांनी केली नुकसानग्रस्त भागाची पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मे-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील निंबर्गी येथे सोमवारी सायंकाळच्या सुमारास झालेल्या अवकाळी पाऊस व वादळामुळे ग्रामस्थांच्या घरासह झाडे उन्मळून पडल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. इंदिरानगर येथील अनेकांच्या घरावरील पत्रे उडून गेले असून काही घरांवर झाडे कोसळल्याची घटना घडली. यावेळी सुदैवाने जीवितहानी झाली नाही.

संसारोपयोगी साहित्यांचे मोठे नुकसान झाले आहे. निंबर्गीचे सरपंच श्रीदीप हसापुरे यांनी तत्परता दाखवून तलाठी राजेश विटेकर व ग्रामसेवक नागनाथ जोडमोटे यांच्या समवेत घटनास्थळी जाऊन पाहणी केले व पंचनामे करण्याच्या सूचना केल्या. तसेच मंद्रुपचे तहसीलदार यांच्याशी संपर्क करुन झालेल्या नुकसानीचे माहिती दिली. त्वरित पंचनामे करण्याची मागणी केली. यावेळी ब्रम्हदेवदादा माने बँकेचे संचालक गंगाधर बिराजदार, ग्रामपंचायत सदस्य अरुण बिराजदार, अप्पासाहेब बिराजदार-पाटील, अप्पासाहेब माने, येदा दुपारगुडे, महादेव फुलारी, अप्पासाहेब खुणे, ग्रामपंचायत अधिकारी नागेश जोडमोटे, जगन्नाथ स्वड्डी, बसवराज माळगे, सिद्धाराम हत्ताळे, सिद्धाराम येळबंडे, कल्याणी शिरगोंडे, अनिल सुतार, चंद्रकांत कोळी, कासू स्वामी,पैगंबर मुल्ला, शिवानंद हडपद, सिद्धाराम कोळी, परमेश्वर दुपारगुडे, शिवा मोची आदी उपस्थित होते.

## अक्कलकोट येथे शिवसेना सदस्य नोंदणी अभियानाला सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २३ मे-**

माजी मुख्यमंत्री व विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त येथे एका विशेष कार्यक्रमात जिल्हा प्रमुख मनिष काळजे यांच्या हस्ते शिवसेना सदस्य नोंदणी अभियानाला सुरुवात झाली.

सर्जेराव जाधव सभागृहात आयोजित शिवसेना (शिंदे गट) सदस्य नोंदणी अभियान कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुकाप्रमुख संजय देशमुख होते. तर प्रमुख अतिथी सोलापूर लोकसभा महिला आघाडी प्रमुख अनिता माळगे, महिला आघाडी जिल्हा उपप्रमुख सुलोचना कडबगावकर, तालुका महिला आघाडी प्रमुख वर्षा चव्हाण, तालुका महिला आघाडी उपप्रमुख तारा कुंभार, उपप्रमुख इंदुमती वाघमारे, शहर उपप्रमुख महिबूब शेख, कामगार सेना शहर प्रमुख अप्पासाहेब धुमाळ, युवा सेना प्रमुख समीर शेख, शिक्षक सेना तालुका प्रमुख प्रा. ईरन्ना धनशेट्टी हे होते. यावेळी गुरुनाथ पोतदार, कल्लप्पा खेडगी, स्वामिनाथ हरवाळकर, सौरभ माणकापुरे, विठ्ठल वेदपाठक, विश्वास आचार्य, सुरेश वेदपाठक, संतोष दीक्षित, संतोष पोतदार, अनिल वेदपाठक, अमोल पोतदार, आदिंचा सहभाग होता. प्रस्तावना चंद्रकांत वेदपाठक यांनी तर आभार प्रा. सूर्यकांत कडबगावकर यांनी मानले.

# विद्यापीठाविरुध्द शिक्षकेतर कर्मचारी आंदोलनाच्या पवित्र्यात

### उत्तरपत्रिका जमा करण्याचे जोखमीचे काम दिल्याचा रोष

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २३ मे-**

पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या थेअरी परीक्षेच्या उत्तरपत्रिका जमा करण्याचे जिकिरीचे संवेदनशील, महत्त्वाचे, जबाबदारी व गोपनीयतीचे काम शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवर टाकल्याच्या रोषातून आयटक संलग्न महाविद्यालय शिक्षकेतर कर्मचारी संघटनेकडून आंदोलनाचा पवित्रा घेण्यात आला आहे.

राज्यातील सर्व विद्यापीठांच्या परीक्षा संपल्या तरी सोलापूर विद्यापीठ संपूर्ण उन्हाळा सुट्टीत परीक्षा घेण्यातच गुंतले आहे. त्यामुळे महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रश्न तीव्र झाल्याने शिक्षकेतर कर्मचारी विद्यापीठाविरोधात आंदोलनाचे निवेदन आयटक संलग्न महाविद्यालय शिक्षकेतर कर्मचारी संघटनेकडून कुलगुरु तसेच संचालक परीक्षा व मूल्यमापन यांना सादर केले आहे. चर्चेतून मार्ग काढा अन्यथा उत्तरपत्रिका जमा करण्यावर बहिष्कार घालत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. हे निवेदन कॉम्रेड प्रा. तानाजी ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाने संघटना सचिव कॉ. डॉ. प्रविण मस्तुद यांनी दिले. विद्यापीठाच्या थेअरी परीक्षेच्या उत्तरपत्रिका जमा करण्याचे जिकिरीचे संवेदनशील, महत्त्वाचे, जबाबदारी व गोपनीयतीचे काम आहे. त्यासाठी १०० कर्मचाऱ्यांमागे एक व १०० उत्तरपत्रिका पुढे एक क्लर्क उपलब्ध करुन देणे आवश्यक असताना महाविद्यालयांमध्ये एकच क्लार्क असल्याने तो उपलब्ध होत नाही. त्यामुळे चतुर्थ श्रेणी कर्मचारीच उत्तरपत्रिका विद्यापीठाकडे जमा करण्यासाठी काम करतात. उत्तरपत्रिका जमा करण्याचे दोन कर्मचाऱ्यांचे काम एका कर्मचाऱ्याला करावे लागत आहे. त्यामुळे त्यांच्यावर मानसिक दबाव निर्माण होतो. उत्तरपत्रिका जमा करण्यासाठी एसटीने, काही वेळेस दुचाकीवर जावे लागते. पावसामुळे उत्तरपत्रिका भिजण्याची शक्यता आहे. एसटी स्टॅन्डवरील गर्दी व गोंगाट यामुळे उत्तरपत्रिकांची सुरक्षितता धोक्यात येते त्यादृष्टीने सोबत एक पोलीस कर्मचारी द्यावा असेही निवेदनात म्हटले आहे. विद्यापीठाला हे सर्व शक्य नसल्यास महाविद्यालयातील उत्तरपत्रिका जमा करण्यासाठी विद्यापीठाने त्यांची यंत्रणा निर्माण करावी. महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची मागील प्रात्यक्षिक व थेअरी परीक्षेची सर्व बिले अद्याप दिली नाहीत. ती व्याजासह अदा करावीत. दीर्घ सुट्टीवरील परीक्षेचे काम करणाऱ्या शिक्षकेतरांसाठी ३:१ लिव ऑन अव्हरेज पे संत गाडगेबाबा विद्यापीठप्रमाणे द्यावी, दोन कर्मचाऱ्यांचे काम करणाऱ्या एका शिक्षकेतर कर्मचाऱ्यास तातडीने त्याने जेवढे काम केले आहे तेवढयाच कर्मचाऱ्यांच्या टी.ए. डी.ए. घ्यावा अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. विद्यापीठाने यावर मार्ग न काढल्यास तीव्र आंदोलन केले जाईल असे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी म्हटले आहे.

# मंद्रूप येथे सोमवारपासून चौंडेश्वरी यात्रा

### पाच दिवस मेजवानी; नितीन बानगुडे-पाटील यांचे व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मे-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप येथील श्री चौडेश्वरी देवीच्या यात्रेस २६ मे पासून सुरुवात होणार असून यावेळी कर्नाटक व महाराष्ट्रातील नामवंत वक्त्यांचे व्याख्यान व मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती यात्रा कमिटीचे अध्यक्ष मळसिध्द शिंगडगाव यांनी दिली.

यावेळी यात्रा कमिटीचे प्रकाश कुंभार, राजकुमार कुंभार, नागनाथ कुंभार, रमेश कुंभार आदि उपस्थित होते. सालाबादप्रमाणे चौडेश्वरी यात्रेनिमित्त पाच दिवस व्याख्याने व मनोरंजन कार्यक्रमांची मेजवानी असणार आहे. महाराष्ट्रातील प्रसिध्द इतिहास अभ्यासक व जीवन चरित्र उलगडून दाखविणारे प्रा. नितीन बानगुडे- पाटील यांच्या व्याख्यानाची मेजवानी असणार आहे. सोमवारी सकाळी चौडेश्वरी



मंदिर येथे श्री'ची प्रतिष्ठापना होणार आहे. रात्री ११ चंद्रशेखर हिरेमठ यांच्या हस्ते श्री'ची विधीवत पूजा करून चौडेश्वरी मंदिर, कुंभार गल्ली येथून ग्रामस्थासह बाळबट्टल मिरवणूक निघणार आहे. दि. २७ मे रोजी चौडेश्वरी देवीची मिरवणूक निघणार आहे. सायंकाळी सात वाजता माळी गल्ली येथील सभागृहासमोर इतिहास अभ्यासक नितीन बानगुडे पाटील यांचे व्याख्यान होईल. यावेळी माजी नगरसेवक भीमाशंकर म्हेत्रे, श्री सिध्देश्वर देवस्थान पंच कमिटीचे सदस्य सुरेश म्हेत्रे, माजी सभापती गुरुसिध्द म्हेत्रे, माजी सरपंच हेमंतकुमार स्वामी, पिराप्पा म्हेत्रे, विश्वनाथ हिरेमठ, मळसिध्द मुगळे, निखिल देशपांडे, गौरीशंकर मॅडगुदले, हर्षवर्धन देशमुख, प्रदीप ख्याडे, बाळासाहेब देशमुख, सिध्दलिंग म्हेत्रे आदी उपस्थित राहणार आहेत. २८ मे रोजी विद्याश्री मशिबनाळ व लक्ष्मण खणदाळ यांच्यात कलगी तुऱ्याची मैफिल गाणे रंगणार आहेत. सायंकाळी प.पू.श्री. गुरूनाथ शास्त्री करीकट्टी महाराज यांचे कीर्तन व सिध्दप्पा बिद्री यांचे जानपद लोकगीत गाणे संपन्न होणार आहे. २९ मे रोजी सायंकाळी सात वाजता कर्नाटक येथील रायचूरच्या कृषीरत्न कविता मिश्रा यांचे 'आपण व शेती' या विषयावर व्याख्यान होणार आहे. यावेळी विजयपूरचे खासदार रमेश जिगजेणी, उद्योजक विठ्ठलगौडा पाटील, तहसीलदार सुजित नरहरे, सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार, पोलीस उपनिरीक्षक राजकुमार डांगे, सरपंच अनिता कोरे, माजी सभापती अप्पाराव कोरे, बक्षुभाई मुल्ला, नजीर आवटे आदी उपस्थित राहणार आहेत.३० मे रोजी सायंकाळी पाच वाजता ग्रामदैवत श्री मळसिध्दप्पा- शेखासाहेब कुस्ती आखाड्यात नामवंत पैलवानांच्या जंगी कुस्त्याचा फड भरणार आहे. यावेळी विविध परीक्षेत यश मिळविलेल्या ऐश्वर्या कोरे, रमेश राठोड, श्रध्दा मणूरे आदींचा सत्कार करण्यात येणार आहे. यावेळी उपसरपंच भगवान व्हनमाने, ग्रामसेवक नागेश जोडमोटे व ग्रामपंचायतचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.



## केम मध्ये महाराजस्व समाधान शिबिरात दाखल्यांचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.२३ मे-**

केम येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात नागरिकांच्या विविध महसूल संबंधित समस्यांचे निवारण करण्यात आले. तसेच विविध प्रकारचे दाखले त्वरित उपलब्ध करून देण्यात आले.

शिबिरात केम मंडल अधिकारी यांच्यासह महसूल तलाठी आणि इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते. त्यांनी नागरिकांच्या समस्या ऐकून घेत त्यांचे जागेवरच निराकरण करण्याचा प्रयत्न केला. या शिबिरात नागरिकांना मोठ्या प्रमाणात विविध दाखल्यांचे वितरण करण्यात आले. यात प्रामुख्याने उत्पन्नाचे दाखले, रहिवासी दाखले (डोमिसाइल) यांचा समावेश होता. तसेच, काही नागरिकांना फार्मर आयडी संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले आणि प्रतिज्ञापत्र भरून घेण्यात आले. याबद्दल नागरिकांमध्ये विशेष उत्साह दिसून आला. या उपक्रमामुळे नागरिकांच्या वेळेची आणि श्रमाची बचत झाली, अशी प्रतिक्रिया लाभार्थ्यांनी व्यक्त केली. प्रशासनाच्या या प्रयत्नांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## महत्वाचे...



### शिव बसव संस्थेच्या सोहळ्यात १३ जोडपी विवाह बंधनात

**अक्कलकोट, दि.२३ मे-**

अक्कलकोट येथील शिव बसव डॉ. बी.आर.आंबेडकर मागासवर्गीय बहुउद्देशीय सामाजिक संस्थेकडून सामुदायिक विवाह सोहळ्याचे दिनांक २० मे रोजी प्रियदर्शनी मंगल कार्यालयात आयोजन करण्यात आले होते. यावेळी १३ जोडप्यांचा सामुदायिक विवाह सोहळा करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष संदीप मडीखांबे यांच्या मार्गदर्शनाखालील या सामुदायिक विवाह सोहळ्यास श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले, शिवसेनेचे अध्यक्ष संजय देशमुख, माजी नगरसेवक उत्तम गायकवाड, दातापीर बाबा, शिलामणी बनसोडे, तुकाराम दुपारगुडे आदीसह विविध मान्यवरांची उपस्थिती होती. संस्थेतर्फे वधू वरांना मणी मंगळसूत्र, जोडवे, साडी, शालू ,संसारोपयोगी भांडी, खाट, गादी, कपाट आदी वस्तू देण्यात आल्या. दरम्यान प्रारंभी अक्कलकोट शहरातून वधू-वरांची सायंकाळी वरात मिरवणूक काढण्यात आली. सायंकाळी मंगल परिणय विधी पार पडला. आतापर्यंत संस्थेकडून सात वर्षात १२९ जोडप्यांचा विवाह संपन्न झाला आहे. या विवाह सोहळ्याचा विधी बौद्धाचार्य मरेपा शिवशरण यांनी केले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष संदीप मडीखांबे विवाह सोहळा समिती अध्यक्ष विकास गायकवाड, विनोद थोरे, सुधीर सोनकांबळे, जयकुमार सोनकांबळे, रुपेश नडगम, श्रीशैल कारागीर, गंगाराम गायकवाड, मोहन बनसोडे, बसवराज गायकवाड, प्रथमेश दुपारगुडे, महादेव बनसोडे आदीसह शिव बसव डॉ. बी. आर. आंबेडकर मागासवर्गीय संस्थेचे पदाधिकारी वधू-वरांकडील पाहुणे मंडळी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### माढा येथे शिवसेना शिंदे गटातर्फे वीर सैनिकाचा सत्कार

**माढा, दि. २३ मे-**

ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून भारतीय लष्कराने आपल्या जीवाची बाजी लावत देशाचे रक्षण केले आहे. त्या सैन्यासह माजी सैनिकांचेही श्रण व्यक्त करण्यासाठी येथील शिवसेना शिंदे गटाच्या वतीने माढा तालुक्यातील वीर सैनिक अमरदिप मोहोळे यांचा जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. शिवाजीराव सावंत यांच्या हस्ते नुकताच सत्कार करण्यात आला. अमृतसर मधील सुवर्ण मंदिरावर शेकडो ड्रोन हल्ले केले ते भारतीय सैन्याने आकाशातच उध्वस्त केले त्याच ठिकाणी माढा तालुक्यातील महातपूर येथील भारतीय सैन्य दलात कार्यरत असलेले अमरदीप मोहोळे आपली सेवा बजावत होते. काही दिवसांसाठी ते महातपुर या आपल्या गावी सुट्टीला आले असल्याने शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा संपर्क प्रमुख प्रा. सावंत यांच्या कडून त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी तालुकाप्रमुख मुन्ना साठे, जेष्ठ नेते कालिदास चव्हाण महातपूरचे सरपंच सम्मेद सावळे, युवराज वसगढेकर, बालाजी बारबोले, शाहू कोकाटे, अशोक सुळे, योगेश जाधव, पिनू क्षिरसागर आदी उपस्थित होते. मी तिकडे असताना आई आणि वडील यांना थोडी काळजी जास्त वाटत होती मात्र संपूर्ण कुटुंबीय देशासाठी आमच्या पाठीशी होते अशी प्रतिक्रिया शूरवीर अमरदीप मोहोळे यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.



### विश्वकर्मा पांचाळ समाजातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**सोलापूर, दि. २३ मे-**

मंद्रूप येथील श्री वीरभद्रेश्वर मंदिरात श्री विश्वकर्मा पांचाळ समाज संघटनेच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवानंद महामुनी होते. यावेळी अमोगसिद्ध बडीगेर, काशिनाथ बिराजदार, विजयकुमार दीक्षित, चंद्रकांत सुतार, सुभाष सुतार, यशवंत सुतार, भगवान सुतार , शिवा सुतार आदि प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी सिताराम सुतार, ज्ञानेश्वर सुतार, चिदानंद सुतार ,लक्ष्मण सुतार, महेश लिगाडे, अंबण्णा सुतार, शांतय्या स्वामी, सुभाष लोभे, शिवशरण सुतार, भीमा सुतार, गुरय्या स्वामी, राजेश स्वामी टेलर आदि समाजबांधव उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिवानंद सुतार, मोनप्पा सुतार, निरंजन सुतार, सचिन सुतार, काळप्पा सुतार, अभिषेक पोतदार आदिंनी परीश्रम घेतले. सूत्रसंचालन सतीश सुतार यांनी केला, तर रमेश सुतार यांनी आभार मानले.

### पंढरपूरात आज बक्षिस वितरण व सन्मान भूमिपुत्रांचा कार्यक्रम

**पंढरपूर, दि.२३ मे-**

प्रदेश राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्यावतीने शनिवार दि.२४ मे रोजी सायंकाळी ७ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त अभिजीत जाधव व अम्मू जाधव प्रस्तुत शिवशंभो गर्जना हा सांस्कृतिक कार्यक्रम, पार्थ पवार यांच्या वाढदिवसानिमित्तच्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ तसेच पंढरपूरचे भुमिपुत्र असलेल्या चार आमदारांचा सत्कार संपन्न होणार असल्याची माहिती प्रदेश राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे सरचिटणीस श्रीकांत शिंदे यांनी दिली. युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष सुरज चव्हाण, मावळचे आमदार सुनिल शेळके, उमेश पाटील, चेअरमन कल्याणराव काळे, दिलीप धोत्रे , लक्ष्मण शिरसाट, अरुण कोळी, गणेश अधटराव, साईनाथ अभंगराव, बाबा अधटराव, अनिल अभंगराव, संतोष नेहतराव, महेश साठे, समाधान काळे, सुधीर अभंगराव, दिपक वाडदेकर हे उपस्थित असणार आहेत.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## सोनंद येथे छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२३ मे-**

धर्मवीर प्रतिष्ठान माळवाडी, सोनंद, ता. सांगोला यांच्यावतीने छत्रपती संभाजी महाराज जयंती सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी बाल व्याख्यानकार स्वराज शिंदे, नितीन बानगुडे पाटील यांचे व्याख्यान झाले. माजी आमदार शहाजीबापू पाटील, माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील, संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष अरविंद केदार, जयसिंग पाटील, प्रा.संजय देशमुख, धर्मवीर प्रतिष्ठानचे दादासाहेब काशीद, तात्यासाहेब देशमुख, हनुमान पाटील, आनंद काशीद, शिवप्रेमी व ग्रामस्थ उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.संतोष कांबळे यांनी केले. प्रास्ताविक चंद्रकांत इंगळे यांनी केले.



## महत्वाचे...

### अवकाळीने नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करून भरपाई द्या : आ. पाटील

**करमाळा दि.२३ मे**

अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करून हेक्टरी दोन लाखांची भरपाई शेतकऱ्यांना द्या, अशी मागणी करमाळा मतदार संघाचे विद्यमान आमदार नारायण आबा पाटील यांनी केली आहे. जिल्हाधिकारी यांना याबाबत एक लेखी निवेदन आमदार नारायण आबा पाटील यांच्या कडून पाठवले गेले आहे. याबाबत अधिक माहिती देताना आ. पाटील यांनी सांगितले की करमाळा मतदार संघात गेले दहा दिवस अवकाळी पावसाने थैमान घातले आहे.



यामुळे कांदा, केळी, डाळींब, द्राक्षे, आंबा यासह अनेक पिके व फळबागाचे तसेच भाजीपाला म्हणजेच तरकारीचेही सर्वात जास्त नुकसान झाले आहे. अचानक आलेल्या या पावसाने शेतातील उभी पिके हातातून गेलीच पण अनेक ठिकाणी वादळवाऱ्यामुळे फळबागांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे महसूल व कृषी विभागाने एकत्रित येऊन करमाळा मतदार संघातील नुकसान झालेल्या भागात पाहणी करावी. नुकसान झालेल्या पिकांचे जागीच पंचनामे केले जावेत व तसे अहवाल तथा नुकसानीचे प्रस्ताव शासनाकडे पाठवावेत. जेणेकरून शेतकऱ्यांना याबाबतची नुकसान भरपाई मिळत असताना अडचण येणार नाही व दिरंगाई होणार नाही. साधारणपणे करमाळा तालुक्यातील केळी व कांदा यासह इतर पिकांच्या उत्पादनात आता घट होईल असे दिसून येते. यामुळे शेतकऱ्यांना सरसकट दोन लाख रुपये प्रति हेक्टर नुकसान भरपाई दिली जावी, अशी मागणी आ. पाटील यांनी केली आहे. या निवेदनाच्या प्रति जिल्हाधिकारी यांच्यासह कृषी मंत्री, महसूल मंत्री, पालकमंत्री आदींना पाठवण्यात आल्या आहेत.

### कृषी सहाय्यकांच्या संपामुळे गावगाड्यातील कामकाज ऐन खरीप हंगामात ठप्प

**पिलीव, दि. २३ मे-**

कृषी विभाग हा खरेतर शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन काम करणारा महत्वाचा घटक आहे. परंतु गेल्या तीन चार दिवसापासून कृषी सहाय्यक संपावर गेल्यामुळे गावगाडयातील कामकाज अक्षरशः ठप्प झाले आहे. कृषी सहाय्यकांनी १५ मे पासुन ऐन खरीप हंगामात काम बंद आंदोलन सुरु केले आहे. ऐन खरीपात आंदोलनाचे हत्यार उपसल्यामुळे गाव पातळीवरील कामकाजावर मोठा परीणाम झाला आहे. सध्या खरीपाची तयारीच खोळंबली आहे. कृषी सहाय्यक यांच्या काम बंद आंदोलनामुळे मोठा परिणाम झाला आहे. शेतकऱ्यांना सरकारी योजनांची अमंलबजावणी थांबली आहे. बीजप्रक्रिया, बियाणे उगवण क्षमता तपासणी या कामावर परिणाम झाला आहे. १९ मे पासून जे आंदोलन सुरु झाले आहे. त्याला पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांनी पाठींबा दिला आहे. कृषी सहाय्यक यांच्या संपाला मंडळ कृषी अधिकारी व तालुका कृषी अधिकारी संघटना यांनी पाठींबा देऊन संपात उतरण्याची तयारी केली आहे. यामुळे शासनाने यावर ताबडतोब तोडगा काढुन शेतकऱ्यांना न्याय दयावा व ऐन खरीप हंगामात शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळावे अशी मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे.



### शिवाजी पॉलिटेक्निकच्या १५ विद्यार्थ्यांची कोलब्रोमध्ये निवड

**सांगोला, दि.२३ मे-**

सांगोला येथील शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजच्या सिव्हिल इंजीनियरिंग विभागातील अभय गायकवाड, अजित गायकवाड, अमोल बुधावले, दयानंद यमगर, घनश्याम वगरे, महेश चव्हाण, रणजीत पवार, साहिल धर्तीगे, समर्थ पवार, शर्विल अंकलगी, सुबोध सोलंकर, सुजल साळे, सुशांत काशीद, यश गावडे, युवराज दिघे या १५ विद्यार्थ्यांची कोलब्रो या नामवंत कंपनीत निवड झाली. संस्थेचे अध्यक्ष, सचिव, विश्वस्त मंडळातील सर्व सदस्य, प्राचार्य, सर्व विभागप्रमुख, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी या यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### सिंहगड कॉलेजच्या स्थापत्य विभागात फेअरवेल कार्यक्रम उत्साहात

**पंढरपूर, दि.२३ मे -**

येथील सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग स्थापत्य अभियांत्रिकी विभाग व स्थापत्य अभियांत्रिकी स्टुडंट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी फेअरवेल या निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना त्यांचे चार वर्षाच्या महाविद्यालयीन प्रवासासाठी शुभेच्छा देणे व त्यांच्या आठवणींना उजाळा देणे हे होते. समन्वयक प्रा. शेखर पाटील यांनी आयोजन केले. प्राचार्य डॉ. के जे करांडे, उपप्राचार्य डॉ. एस जी कुलकर्णी, ट्रेनिंग प्लेसमेंट ऑफीसर डॉ. समीर कटेकर व स्थापत्य अभियांत्रिकी विभागाचे विभाग प्रमुख डॉ. एस. एस. कदम यांनी मार्गदर्शन करत त्यांच्या उज्वल भविष्यसाठी शुभेच्छा दिल्या. अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. विविध सांस्कृतिक कार्यक्रम, गीत संगीत आणि मैत्रीच्या गप्पांनी संपूर्ण वातावरण आनंददायी झाले होते. अंतिम वर्षातील उत्कृष्ट विद्यार्थी म्हणून कुमारी सुमित्रा सांगोलकर यांना गौरविण्यात आले.

# पंढरपूर शहरातील सखल भागात पाणी

## पालिकेच्या कामाची पोलखोल, चिखलामुळे भाजी मंडईत दलदल

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२३ मे -**

पंढरपूर शहर आणि तालुक्यात गेल्या तीन दिवसांपासून कमी, अधिक प्रमाणात पावसाच्या सरी कोसळत आहेत. शुक्रवारी (ता.२३) तर सकाळ पासून सूर्यदर्शन देखील झाले नाही. या पूर्वमौसमी पावसामुळे शहर आणि तालुक्यातील फळबागांचे मोठे नुकसान झाले आहे.

पंढरपूर शहर आणि तालुक्यात गेल्या तीन दिवसांपासून पूर्व मौसमी पावसाच्या कमी, अधिक प्रमाणात सरी कोसळत आहेत. मुळातच हा अवकाळी किंवा पूर्वमौसमी पाऊस असून तो पावसाळ्या प्रमाणे सध्या बरसताना पहावयास मिळत आहे. अवकाळी किंवा पूर्वमौसमी पाऊस हा यापूर्वी एखादा दिवस किंवा दोन, तीन तास बरसल्याचा अनुभव आहे. यामध्ये गारपिट देखील झालेली पाहिलेली आहे. मात्र पावसाळ्या प्रमाणे दररोज हा पाऊस पडत असल्यामुळे त्याला अवकाळी किंवा पूर्वमौसमी म्हणायचे का? असा देखील सवाल आता उपस्थित होत आहे. या पावसामुळे पंढरपूर पालिकेच्या कामाची देखील पोलखोल झालेली दिसून आली. दरम्यान काल पासून पालिकेचे उपमुख्याधिकारी सुनील वाळूजकर यांनी पालिकेच्या कर्मचाऱ्यांसह शहरातील झोपडपट्टी तसेच सखलभागाची पाहणी केली. अनेक भागात पाणी साठत राहत असल्याने त्या भागातील ड्रेनेजची, नालेसफाईची कामे हाती घेतली आहेत. पावसामुळे येथील भादुले चौक परिसरातील उघड्यावर भरणाऱ्या मंडईतील व्यापारी, शेतकरी बांधवाचे देखील कमालीचे हाल होताना दिसत आहेत. रस्त्यावरच ही मंडई भरत असल्याने अक्षरशः चिखलातच शेतकऱ्यांना भाजीपाल्यासह आपला शेतीमाल विकत बसण्याची वेळ आली आहे. खरेदीदार ग्राहक देखील नाईलाजास्तव चिखलातच भाजीपाल्याची खरेदी करीत आहेत. चिखलामुळे या मंडईत अक्षरशः दलदल झाली आहे. शहरातील अनेक रस्त्यांवर खड्डे पडलेले आहेत. या बरोबरच शहर आणि उपनगरातील बऱ्याच रस्त्यांची कामे देखील सुरु आहेत. पावसाळ्याला सुरुवात होण्याअगोदर ही कामे पूर्णत्वास जाणे आवश्यक होते. मात्र अनेक रस्त्यांची कामे कईक दिवस रेंगाळल्याने त्याचा फटका आता शहरातील नागरिकांना बसत आहे. रस्त्यांच्या कामांमुळे अनेक भागात सतत वाहतूकीची कोंडी होताना दिसत आहे. त्यामध्येच पाऊस पडत असल्याने महिला, लहान मुले तसेच वयोवृध्द नागरिक यांचे कमालीचे हाल होत होते. या बरोबरच सायकल किंवा दुचाकी वाहन चालविणाऱ्यांना तर अक्षरशः कसरत करीत रस्त्यावरुन मार्गक्रमण करीत जावे लागत असल्याचे दिसत आहे. या पूर्वमौसमी पावसामुळे शुक्रवारी (ता.२३) एकादशी निमित्त परगावाहून आलेल्या भाविकांचे देखील हाल झाले. दर्शनासाठी दुपारी गल्लीबोळातून खड्डे आणि चिखलातूनच मार्गक्रमण करीत भाविकांना दर्शन रांगेतून पुढे मंदिरापर्यंत जावे लागत होते.



पंढरपूर - शहरातील भादुलेचौक परिसतील उघड्यावर भरणाऱ्या भाजी मंडईमध्ये पावसामुळे भाजीपाला विक्रेत्यांचे कमालीचे हाल झाले. या मंडळींना तात्पुरते प्लास्टिक पेपर लावून पावसापासून बचाव करीत आपला भाजीपाला विक्री करावा लागत होता.

## अकलूजमध्ये सरीवर सरी; सूर्यदर्शन नाही

### जनजीवन विस्कळीत; लग्नकर्त्यासह वऱ्हाडींची तारांबळ





**तभा वृत्तसेवा**
**अकलूज, दि.२३ मे-**

सलग ३ दिवसांच्या मोठ्या पावसानंतर शुक्रवारी सकाळपासून रिमझिम पावसाच्या सरीवर सरी येण्याने तालुक्यातील संपूर्ण जनजीवन ठप्प झाले. आज संपूर्ण दिवस सूर्यदर्शन झाले नाही संपूर्ण रस्ते ओस पडल्याने छोटे मोठे व्यवसाय, भाजी मंडईमध्ये व्यावसायिक ही जागेवर दिसत नव्हते. आज लग्नाची तिथी होती मात्र पावसामुळे लोकांना लग्नाला ही जाता आले नाही. लग्नकर्त्यासह वऱ्हाडींची तारांबळ उडाली.

तालुक्यात गेली ३ दिवसापासून जोरात पाऊस सुरू आहे. मात्र मोठ्या पावसाच्या सरीनंतर उघडीप होत असे. गुरुवारी दिवसभर उघडीप दिली होती. शुक्रवारी सकाळपासूनच रिमझिम पावसाने सुरुवात केली. त्यामुळे दिवसभरात सूर्यदर्शन झाले नाही. या संततधार पावसाने लोकांना घराबाहेर पडणे मुश्किल केले होते. त्यामुळे भाजी मंडई, छोटे मोठे व्यवसाय ओस पडलेले दिसले. या रिमझिम पावसाने सगळीकडे चिखलाची दलदल झाली, त्यामुळे तालुक्यातील यशवंतनगर, निमगाव, बोरगाव आदी गावातील आठवडे बाजारांना व्यापाऱ्यांनी ही तुरळक हजेरी लावली. ग्राहक तर सायंकाळी ६ वाजेपर्यंत बाहेर पडले नव्हते. शुक्रवारी लग्नाची मोठी तिथी असूनही लोकांना लग्नाला ही जाता आले नाही, वरदावा सारखे हौशेचे कार्यक्रम करता आले नाहीत. अनेक कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी ही उशिराच पोहोचले. एकूणच संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले होते. शुक्रवारी रात्री उशिरापर्यंत ही रिमझिम सुरूच होती. सलगच्या या पावसाने अद्याप ओढ्यांना नाल्यांना पाणी आले नसल्याने विहिरीच्या पाण्याची पातळी वाढलेली दिसत नाही. मात्र माळशिरस तालुक्यातील टँकर या पावसाने बंद होतील असे चित्र आहे. पावसाची उघडीप मिळताच शेतकरी खरीप पिकांच्या पेरणीची तयारी करणार आहेत. रात्री पावसाळी किड्यांनी नागरिकांना हैराण केले. सर्वत्र पावसाळी किडे मोठ्या प्रमाणावर दिसून आले. रस्त्यावर याचा थर पडलेला दिसत होता.







पंढरपूर तालुक्यात अवकाळी पावसामुळे जमीनदोस्त झालेल्या फळबागांसह माहिती देताना शेतकरी. यामध्ये आंबा, केळी, डाळींब, कांदा, शेवगा पिकांचे नुकसान झाले .

## अवकाळीने नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करा

### स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे माळशिरस तहसीलदारांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २३ मे-**

माळशिरस तालुक्यात अनेक भागात गेल्या आठ दिवसापासून वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस झाल्यामुळे शेती पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करून तात्काळ शेतकऱ्यांना मदत करावी या मागणीसाठी स्वामीमानी शेतकरी संघटनेच्या वतीने माळशिरस तहसील कार्यालय येथे निवेदन देण्यात आले. शेतामधील डाळिंब, आंबा, कांदा, ऊस या पिकासह अन्य पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. अवकाळी पावसाने तडाखा दिल्याने शेतकरी कोलमोडून गेला आहे. आंबा बागेतील आंबा उतरण्याचे प्रचंड नुकसान झाले आहे. कडवळ व इतर चारा पीके पाण्याखाली गेले आहेत. डाळिंबाच्या बागेलाही मोठ्या प्रमाणात फटका बसला आहे. शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. या संकटामुळे शेतकरी हातबल झाला आहे असे निवेदनात म्हटले आहे.



यावेळी अजित बोरकर, ज्येष्ठ नेते मगन काळे, सचिन शेंडगे, गोपाळ घार्गे, अमरसिंह माने-देशमुख, राष्ट्रवादीचे शामराव बंडगर, सोमनाथ पिसे, अशोक शिंदे, मुकुंद काळे, तेजस भाकरे, शिवाजी वाघमारे, विश्वजीत अडसूळ, विकास काळे, शंकर पवार, प्रदीप ठवरे, विजय वाघंबरे यासह संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## विधीच्या अंतिम परीक्षेतील चुकीच्या प्रश्नाचे गुण मिळावेत; अन्यथा आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२३ मे-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या विधी शाखा एलएलबी तृतीय वर्षाच्या अंतिम सत्राच्या (मार्च-२०२५) ५ मे रोजी घेण्यात आलेल्या शेवटच्या सत्रातील इंटरनॅशनल ह्युमन राइट्स या विषयाच्या प्रश्नपत्रिकेत प्रश्न क्रमांक २ मधील उपप्रश्न २ व ३ तसेच ६ व ७ या चार प्रश्न चुकीचे नमूद करण्यात आले आहेत.

विद्यार्थी हित लक्षात घेऊन त्या चुकीच्या प्रश्नाचे सरसकट गुण सर्व परीक्षार्थींना मिळावेत अशी मागणी विद्यार्थी सेनेचे (ठाकरे) बार्शी तालुकाध्यक्ष पांडुरंग घोलप यांनी परीक्षा नियंत्रकांना निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी विकास भोसले, अनिकेत घोलप, अमर कोळेकर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. विद्यार्थी हिताचा निर्णय न घेतल्यास विद्यापीठ प्रवेशद्वारावर दि. ३१ मे रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीदिनी ढोल वाजवून आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

## आषाढीच्या पूर्वतयारीची बुधवारी मुंबईत बैठक

### भाजपाच्या अध्यात्मिक आघाडीचे प्रमुख तुषार भोसले यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२३ मे-**

आषाढी वारीच्या पूर्वतयारी संबंधी दि.२८ मे रोजी मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक बोलावण्यात आली आहे. सर्व १० मानाच्या पालखी सोहळ्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहतील व त्यांच्या सूचना मुख्यमंत्री समजून घेणार असल्याची माहिती भाजपा आध्यात्मिक आघाडीचे प्रमुख आचार्य तुषार भोसले यांनी दिली.



यासंबंधी गेल्यावर्षीप्रमाणे यंदाही सह्याद्री अतिथी गृहात तातडीने बैठक घ्यावी अशा मागणीचे निवेदन शिवसेनेच्या धर्मवीर अध्यात्मिक सेनेचे अध्यक्ष अक्षयमहाराज भोसले यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले होते. यंदा राज्यातील मानाच्या पालखी सोहळ्याचे आषाढी वारीसाठी ५ जून पासून प्रस्थान होत आहे. परंतु अद्याप पालखी सोहळ्याच्या नियोजनाची प्रशासकीय बैठक झाली नाही असे निवेदनात म्हटले होते. यंदा संत मुक्ताबाई महाराज यांचा पालखी सोहळा श्री क्षेत्र मुक्ताईनगरहून दिनांक ५ जून रोजी प्रस्थान ठेवीत आहे. संत निवृत्तीनाथ महाराज यांचा पालखी सोहळा दिनांक १० जून रोजी श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वरहून प्रस्थान ठेवीत आहे. श्री क्षेत्र देहुहून संत तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा व श्री क्षेत्र पैठणहून संत एकनाथ महाराज यांचा पालखी सोहळा दिनांक १८ जून रोजी प्रस्थान ठेवणार आहे. श्री क्षेत्र आळंदीहून संत ज्ञानेश्वर महाराज यांचा पालखी सोहळा दिनांक १९ जून रोजी तर श्री क्षेत्र सासवडहून संत सोपानदेव महाराज यांचा पालखी सोहळा दिनांक २३ जून रोजी आषाढी वारीसाठी श्री क्षेत्र पंढरपूर कडे प्रस्थान ठेवणार आहे. अक्षय महाराज भोसले यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राज्यातील पालखी सोहळ्याचे प्रस्थान अगदी काही दिवसांवर येवून ठेपले आहे. मात्र अद्याप त्याची अंतिम प्रशासकीय बैठक लागली नाही. ज्याप्रमाणे सर्व पालखी सोहळा प्रमुखांना गतवर्षी सह्याद्री अतिथीगृह येथे बोलावून बैठक घेतली होती. तशीच बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत यावर्षी तात्काळ घेण्यात यावी. राज्यातील पालखी सोहळ्याच्या अनेक समस्या व प्रश्न आहेत. ते प्रशासकीय पातळीवर सुटणे गरजेचे आहे. बैठकीला विलंब झाल्यास अनेक कामांमध्ये अडथळा येतो. तात्काळ याची नोंद घ्यावी व आगामी काळात बैठक घ्यावी अशा मागणीचे निवेदन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले होते. त्याची दखल घेऊन बुधवारी २८ मे रोजी बैठक होत असल्याचे तुषार भोसले यांनी सांगितले. .

